नोंदणी क्रं. एफ.१६०९४(मुंबई)

महाराष्ट्र शासन
मराठी भाषा विभाग
राज्य मराठी विकास संस्था
एल्फिन्स्टन तांत्रिक विद्यालय, ३, महापालिका मार्ग,
धोबीतलाव, मुंबई - ४००००१ दूरध्वनी : (०२२) २२६३१३२५ / २२६५३९६६
संकेतस्थळ https://rmvs.marathi.gov.in इ-पत्ता rmvs_mumbai@yahoo.com

निवेदन

महाराष्ट्र राज्याचे सांस्कृतिक धोरण २०१० अंतर्गत मराठी भाषेतील प्रतिमुद्राधिकाराची (कॉपीराइटची) मुदत संपलेले दुर्मिळ ग्रंथ महाजालावर उपलब्ध करून द्यावे असे म्हटले आहे. त्यानुसार मराठी भाषा विभागाच्या आदेशाप्रमाणे (शासननिर्णय क्र. रासांधो १०१२/ प्र. क./२०१२/भाषा-३ दि. २८ मार्च २०१३) राज्य मराठी विकास संस्थेद्वारे असे ग्रंथ आणि नियतकालिके महाजालावर उपलब्ध करून देण्याचा प्रकल्प राबवण्यात येत आहे. त्याच बरोबर प्रतिमुद्राधिकाराच्या कक्षेत येणारी काही साधनेही प्रतिमुद्राधिकारधारकांची उचित अनुमती प्राप्त झाल्यास संस्थेद्वारे संगणकीकृत करून अभ्यासकांसाठी उपलब्ध करून देण्यात येत असतात.

सदर प्रकल्पांतर्गत **विदर्भ साहित्य संघ, नागपूर** ह्या संस्थेद्वारे प्रकाशित करण्यात येणाऱ्या **युगवाणी** ह्या नियतकालिकाच्या अंकांचे संगणकीकरण करून ते सार्वजनिकरीत्या आणि विनामूल्य उपलब्ध करून देण्यासंदर्भात उपरोक्त संस्थेला आवाहनपर विनंती करण्यात आली होती.

सदर विनंती मान्य करून विदर्भ साहित्य संघाद्वारे सदर अंक संगणकीकरणासाठी उपलब्ध करून देण्यात आले. हे अंक सदर संस्थेच्या सहकार्यामुळेच आपल्याला संगणकीय स्वरूपात उपलब्ध होत आहेत.

या अंकांच्या पीडीएफ प्रती आपण विनामूल्य उतरवून घेऊ शकता. असे करताना खालील सूचना लक्षात घेऊन त्यांचे पालन करावे.

१. सदर ग्रंथांच्या पीडीएफ प्रती या वैयक्तिक वापरासाठी विनामूल्य उतरवून घेता येतील तसेच इतरांनाही विनामूल्य देता येतील. पण कोणत्याही कारणासाठी त्याचा व्यावसायिक वापर करता येणार नाही.
२. सदर ग्रंथांचे दुवे इतरांना देताना त्यासाठी कोणतीही रक्कम आकारता येणार नाही.
३. पीडीएफ प्रतींवर असलेली राज्य मराठी विकास संस्था, मुंबई व विदर्भ साहित्य संघ, नागपूर यांची मुद्रा आपणास काढता येणार नाही.
४. आपल्या अभ्यासासाठी, संशोधनासाठी या सामग्रीचा उपयोग करताना आपण योग्य तो श्रेयनिर्देश केला पाहिजे.

वरील अटींचा भंग झालेला आढळल्यास कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

स्पष्टीकरण : सदर सामग्री ही केवळ ऐतिहासिक दस्तऐवज म्हणून उपलब्ध करण्यात आली असून या सामग्रीतून व्यक्त होणारी मते, विचारसरणी इ. त्या त्या लेखक, संपादक इ. कर्त्यांची आहे. त्यांपैकी कोणतेही मत, विचारसरणी इ. यांचा पुरस्कार महाराष्ट्र शासन, मराठी भाषा विभाग, राज्य मराठी विकास संस्था व विदर्भ साहित्य संघ, नागपूर यांपैकी कुणीही करत नसून त्या त्या मताचे वा विचारसरणीचे दायित्व उपरोक्त विभागांवर/ संस्थांवर असणार नाही.

सदर अंक केवळ अभ्यासकांच्या सोयीसाठी संगणकीय स्वरूपात उपलब्ध करण्यात येत असून अंकांतील सामग्रीचे (लेखन, मांडणी, छायाचित्रे, रेखाचित्रे इ.) प्रतिमुद्राधिकार त्या त्या लेखकांकडे अथवा प्रकाशकांनी त्या त्या वेळी केलेल्या व्यवस्थेनुसार आहेत ह्याची नोंद घेण्यात यावी. त्या सामग्रीसंदर्भातील कोणतेही अधिकार वा दायित्वे राज्य मराठी विकास संस्था, मराठी भाषा विभाग किंवा महाराष्ट्र शासन ह्यांच्याकडे असणार नाहीत.

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास

राज्य मराठी विकास संस्थेद्वारे
संगणकीकृत

अनुक्रमणिका

युगवाणी
१९८०


१९८९

१९८० - जाने.मा., एप्रि., जुलै, ऑक्टो., नोव्हें.
पूर्ण

युगवाणी

फेब्रुवारी – मार्च, १९७९.

अनुक्रमणिका



दि. ७-२-७९— वि. सा. संघाच्या खामगाव शाखेचा रौप्यमहोत्सव समारंभ



दि. २७-१-७९— वि. सा. संघाच्या वणी शाखेचा रौप्यमहोत्सव समारोह

' महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृति मंडळ ' पुरस्कृत विदर्भ साहित्य संघाचे मुखपत्र

युगवाणी

फेब्रुवारी-मार्च १९७८
माघ-फाल्गुन, १९००

संपादक :
वि. बा. प्रमुदेसाई

मूल्य तीन रुपये) (वर्ष ३४, अंक ११-१२

संपादकीय

श्री. आ. रा. देशपांडे यांचा साहित्य अकादमीकडून गौरव

मराठीतील एक नामवंत ज्येष्ठ साहित्यिक व मराठी साहित्य महामंडळाचे अध्यक्ष श्री. आ. रा. देशपांडे ऊर्फ कवी अनिल यांची दिल्लीच्या साहित्य अकादमीने नुकतीच 'फेलो' म्हणून निवड केली आहे. अप्पासाहेबांच्या या बहुमानाबद्दल वि. सा. संघाला सार्थ अभिमान वाटतो.

प्रा. सुरेन्द्र आ. गावस्कर यांचे देहावसान

मुंबईच्या 'मराठी संशोधन मंडळा'चे तरुण संचालक प्रा. सुरेन्द्र आ. गावस्कर यांचे दि. १३ जानेवारी, १९७९ रोजी हृदयविकाराच्या झटक्याने मुंबईला आकस्मिक निधन झाले. मराठीतील संशोधन-महर्षी प्रा. अ. का. प्रियोळकर यांच्या मार्गदर्शनाखाली संशोधन शास्त्राचे व पाठचिकित्सापद्धतीचे वस्तुपाठ घेण्याची संधी प्रा. गावस्करांना लाभली होती. गुरुवर्य प्रियोळकरांच्या प्रोत्साहनाने गावस्करांनी तयार केलेला 'मराठी दोलामुद्रिते' हा ग्रंथ ग्रंथालयशास्त्राच्या क्षेत्रात मान्यता पावले आहे. दि. १ जानेवारी, १९७६ पासून गावस्करांनी संशोधन मंडळाची सूत्रे हाती घेतल्यावर मंडळाच्या कार्यात विशेष रस घेतला. 'मराठी संशोधन-पत्रिके'च्या रौप्य महोत्सवी वर्षाचे विशेषांक हे त्यांच्या साक्षेपी संपादनकौशल्याची साक्ष देतात. 'प्राचीन मराठी हस्तलिखितांची बृहन्नामावली', 'तुकाराम पदकोश' इत्यादी प्रकल्पांना चालना देऊन प्रा. गावस्कर हे कै. प्रियोळकरांनी सुरू केलेली थोर संशोधन परंपरा निष्ठेने पुढे चालवीत होते. ते मुंबईच्या खालसा महाविद्यालयातील मराठी विभागाचे प्रमुखदेखील होते. सदा हसतमुख, मनमिळावू व कर्तव्यदक्ष अशा माझ्या या गुरुबंधूवर त्यांच्या वयाच्या अवघ्या त्रेचाळीसाव्या वर्षी निर्घृण काळाचा घाला पडावा याचे मनस्वी दुःख होते. प्रा. सुरेन्द्र गावस्कर यांच्या आत्म्याला वि. सा. संघाची व माझी स्वतःची अंतःकरणपूर्वक आदरांजली.

अनुक्रमणिका

अंतरंग

पंडित आवळीकर / **सावनेर..... अंधारयात्रेची अखेर**

२३ जानेवारी, १९७९. नागपूरला आल्यापासून मनात घोकत होतो : 'गडकऱ्यांची समाधी, ते वारले ते घर एकदा पहायचं', योग जुळून आला. चां-का-प्र समाज, विदर्भ साहित्य संघ आणि नागपूर विद्यापीठातील मराठी विभाग यांच्या वतीनं व्हायच्या हीरक महोत्सवी स्मृतिदिनासाठी प्रमुख वक्ता म्हणून मला बोलावलं गेलं. .आणि सकाळी सावनेरच्या दिशेनं आमच्या खास(गी)गाड्या धावूहीं लागल्यात.. मर्ढेकरांच्या 'न्हालेल्या जणु गर्भवतीच्या' सोज्वळतेचं स्मरण करून देणारी नागपूरची सकाळ आजकाल मोठी प्रसन्न. 'प्रसन्न प्रभात, नभात मनात' अनिलांचीही ओळ आठवतेय्. .गोठवणारा'गारठा' सरलाय्, सुखवणारा 'गारवा' उरलाय्. गडकऱ्यांच्या प्रेमकवितांची 'ऊब' (सुद्धा) पुरेशी वाटून मी गरम कपडे घातलेले नाहीत. नागपूर मागं पडतंय्. सावनेरची दुतर्फा झाडं असलेली वाट. .एवढ्यात आकाश झाकळून जातं. पावसालाही सुरुवात होते. अंधारावर पावसाचा अभिषेक व्हायलाच हवा. वारं झोंबतंय्. ते कानांत(!) शिरू नये म्हणून कुणीतरी मला आपला स्कार्फ देतं. पण मनात वारं शिरतंच. वादळ होऊन ते घोंगावायला लागतं.

आमच्या जीपमधली मंडळी रसिक, दर्दी. डॉ. प्रभुदेसाई, वसंतराव वरखेडकर, ॲड. पां. बा. गडकरी यांच्यासारखी. सावनेरमधील जुन्या कार्यक्रमांची उजळणी सुरू होते. गडकऱ्यांच्या एका अज्ञात प्रेयसीचा (तिचं नाव म्हणे 'चंपा'!) शोध एका वक्त्यांनी एकदा कसा 'मांडला' होता तो किस्सा कुणीतरी सांगतं. असले शोध ऐकून खुद्द गडकरीच 'वरून' खाली येतील आणि त्यांनाही अश्रुतपूर्व असलेल्या नावाचा ठावठिकाणा खास विचारतील असाही विचार आमच्या मनात येतो.

पाऊस वाढतोच आहे. मनात वादळ घोंगावतच आहे. अगदी काकडून गेल्यान एरवी मंगलारती प्रिय असणारा— मी गडकऱ्यांची जणू काकडारती करू लागलोय्. .कवितेची ऊब वगैरे वगैरे अलंकारिक म्हणून ठीक— पण अशा हवेत गरम वस्त्रंच हवीत. आमच्या गाड्या गावात शिरतात. .रस्त्यावरल्या एका घराकडं बोट दाखवून कुणीतरी सांगतं. "ते गडकऱ्यांचं घर!" जुनाट, दुमजली, उदास वाटणारं घर. तसं अनाकर्षक वाटणारंच. पण गडकऱ्यांच्या अंधारयात्रेची अखेर तिथं झाली. 'भावबंधन' ची अखेर तिथं झाली. ते घर शिरावर पाऊस झेलतच उभं आहे.

आधी मुख्य कार्यक्रम 'उरकायचा', समाधीचं दर्शन घ्यायचं आणि मग घर 'पहायचं' असं ठरतं. .गाड्या स्थानिक महाविद्यालयाच्या दिशेनं पळू लागतात. कॉलेजचे प्राचार्य आणि प्रा. भास्कर नंदनवार आमचं स्वागत करतात.. व्यासपीठावर आम्ही विराजमान होतो. हॉल त्या मानानं बराच भरलाय. विद्यार्थी-विद्यार्थिनींचा-(च) अर्थात भरणा आहे. .पाऊस पडतोचं आहे. गडकरी वारले तेव्हाही पाऊस पडतच होता म्हणे.. पुढंही पाऊस पडणारच आहे. .अंधारावर पाऊस ठिबकत राहायलाच हवा!

डॉ. प्रभुदेसाई सुरेल प्रास्ताविक करतात.. माझी ओळख करून देतात. आज मला माझी खरीखुरी ओळख पटायला लागलीय्. सूर सापडतोय् असं वाटतंय्. 'एकलाच आळवीन जो दिलास सूर' मी बोलायला उभा राहतो. गडकऱ्यांसंबंधी गडकऱ्यांच्या निधनस्थळी बोलायचं या कल्पनेनं मी विलक्षण भारावून गेलोय्. बोलतोय्.. समोरची मंडळी वाहव्वांनी आणि टाळ्यांनी 'दाद' देतायत. -(नाहीतर काही ठिकाणचे कुण्णालाच 'दाद' न देणारे विलंदर श्रोते!!) हा सारा गडकऱ्यांचा 'पुण्यप्रभाव' बोलता बोलता आज

अनुक्रमणिका

आपल्याला गडकरी वेगळ्याच तऱ्हेनं उमजायला लागले आहेत 'जाणवायला' लागले आहेत असं मला वाटायला लागतं..स्थानमाहात्म्य म्हणून काही असावंच!

भाषणं संपतात. आम्ही 'कोलार' नदी-काठच्या 'समाधी'कडं जातो. उंचावर बांधलेली कठड्यानं बंदिस्त केलेली ती गडकऱ्यांची समाधी पाहून जीव गलबलून जातो. जन्मभर जळत असलेल्या या कवीचं इथं 'दहन' झालं. .जन्मभर फुलत असलेल्या या कवीवर जरूर नसताना इथं फुलं उधळली गेली आम्हीही उधळली! पुढंही उधळली जातील!! माझ्या भाषणात मी उद्‌धृत केलेल्या मनमोहनच्या पुढील ओळींचा अर्थ समाधी-शेजारी माझा मलाच अधिक स्पष्ट होतोय्—

शव कविचें हें जाळुं नका हो
जन्मभरीं तो जळतच होता
फुलें तयावर उधळुं नका हो
जन्मभरीं तो फुलतच होता!

समाधीशेजारी मी श्रद्धांजली वाहावी असं मला सुचवलं जातं. सगळं बळ एकवटून मी एवढंच म्हणतो: "मराठीचा 'राजहंस' या ठिकाणी विसावला आहे. मराठीवर आणि महाराष्ट्रावर गडकऱ्यांचं एवढं ऋण आहे की ते फेडण्याऐवजी मनोमनी जागवणं तेवढं आपल्याला शक्य आहे. तेवढं आपण निष्ठेनं करू या!"

आमचे 'चिखलाचे पाय' घेऊन आम्ही गडकऱ्यांच्या घरात जातो. ओसरीवर एक दवाखाना थाटलेला. पहिल्याच उजव्या हाताच्या खोलीत. दोन जुनाट खुर्च्या...एक जुनाट टीपॉयवजा टेबल. आणि खिडकी-शेजारी लाकडी खाट. या खाटेवरूनच त्या खिडकीतूनच मराठीच्या या राजहंसाचा आत्महंस अनंतात उडून गेला. 'गेला उडून रावा'... अंतरिक्ष फिरलों, गेली न उदासी. असं तियंही तो म्हणत असेल काय?

त्या खिडकीत 'मृत्यू' 'मौत' बनून आला असेल ही मौत. 'सदय' बालेच्या, 'हृदयशारदेच्या' रूपात गोविंदाग्रजांजवळ आली असेल आणि 'मरण सोसावें। परि पहिलें चुंबन घ्यावें' या त्यांच्याच ओळी नाचत असलेले ओठ त्या महाकवीच्या ओठांवर टेकवून त्याला सांगाती घेऊन गेली असेल...

पण प्रत्यक्षात म्हणे गडकरी वारले तर त्यांचे माडीवर राहणारे बंधूसुद्धा खाली उतरले नाहीत! प्रेताच्या भीतीनं. .स्वत:च्या दोन मुली गेल्या तेव्हाही ते प्रेतांजवळ आले नव्हते... गडकऱ्यांचं शव वाहून न्यायलासुद्धा माणसं जमली नाहीत असं ऐकलं. तसं करण्यात काहींना 'जात' आडवी आली तर काहींना 'नीती'!!

गडकऱ्यांचं 'घर' माझ्या मनात 'घर' करून मात्र राहिलं.. सावनेरहून निघालो...सावनेर मागं पडलं. पाऊस थांबलाय्... नागपूर जवळ येत चाललंय्...सुरेख ऊन्ह पडलंय्... मध्यान्ह तर स्मिताननेलादेखील लाजवणारी.....

पण अजून तो पाऊस मनातून मात्र गेलेला नाही. ते सावनेर. ती अंधारयात्रेचो अखेर...मनाला विलगूनच आहे!

⊕ ⊕ ⊕

प्रल्हाद वडेर/कै. ना. सी. फडके यांची कलादृष्टी

श्री. ना. सी. फडके यांचे वयाच्या ८४ व्या वर्षी नुकतेच निधन झाले. आणि त्यांच्या जवळ जवळ पन्नास साठ वर्षांहून अधिक चाललेल्या लेखनावर नि जीवनावर काळाने कायमचा पडदा टाकला. येत्या 'अंजली'च्या दिवाळी अंकात 'अंबरी जोवरी शशिरवी' ही आपली ७५ वी कादंबरी लिहून ते मराठी वाङ्मयात एक विक्रम करणार होते. पुढील वर्षी दिवाळी अंक निघतील, पण त्यांची कादंबरी असणार नाही. आधुनिक मराठी वाङ्मयाच्या इतिहासात त्यांच्या नावाला एक विशिष्ट स्थान व महत्व आहे. त्यांच्या नावाशी मराठीत प्रदीर्घ चाललेला एक वाद निगडित झालेला आहे. कादंबरीसारख्या लोकप्रिय वाङ्मयप्रकारातली त्यांची लोकप्रियता वादातीत आहे. अर्धशतकाहून अधिक काळ त्यांचे लेखन सातत्याने चालले होते. कादंबरी, लघुकथा, टीका, गुजगोष्टी, प्रवास, आठवणी, क्रिकेट, संगीत इत्यादी अनेक वाङ्मयप्रकार त्यांनी हाताळले. मराठीप्रमाणेच इंग्रजीतही त्यांनी लेखन केले. वाङ्मयाप्रमाणेच वक्तृत्वाच्या क्षेत्रातही ते गाजले. त्यांचे रचनाकौशल्य, त्यांची तंत्रशुद्धता आणि मुलायम भाषा हे त्यांचे गुण त्यांच्या कठोरातल्या कठोर टीकाकारानेही कधी अमान्य केले नाहीत. त्यांनी सकारण-अकारण खूप प्रवास केला, त्यांचे जीवन असामान्य म्हणता आले नाही तरी सक्तीची बेकारी नि जीवनातले चढउतार त्यांनीही अनुभवले आणि त्या सर्वांना त्यांनी साहित्यरूप दिले. 'मराठी भाषेची दौलत उधळणारा जादुगार' असे त्यांचे वर्णन कै. शिवरामपंत परांजपे यांनी केले. त्यांच्या 'अल्ला हो अकबर', 'जादूगार', 'दौलत' इत्यादी कादंबऱ्यांनी मराठीत कादंबरीलेखनाचे एक नवे युग सुरू केले. त्यांच्या तंत्राचा, भाषेचा- त्यांच्यानंतर आलेल्या अनेकांना मोह पडला. फडके यांनी वाचकांना हवे होते ते दिले. आणि त्यामुळे त्यांच्या वाचकांनी त्यांना सतत डोक्यावर घेतले यावद्दलही वाद नाही.

पण असे असूनही रसिकांना व समीक्षकांना त्यांच्याबाबत एक असमाधान वाटत आले आहे. त्यांच्या सुरुवातीच्या कादंबऱ्याच त्यांना अधिक का आवडाव्या? सतत नव्या नव्या अनुभवाच्या पाठीमागे लागणाऱ्या या लेखकाने केवळ आपल्या एका आभासमय विश्वात वाचकांना क्षणभर गुंगविण्यातच का सार्थक मानले?

याचे कारण फडके यांच्या वाङ्मयीन व्यक्तिमत्वात व त्यांच्या वाङ्मयाकडे, जीवनाकडे आणि एकूण ललित कलांकडे पाहण्याच्या दृष्टिकोणात शोधावे लागेल. तसे ते जर शोधले तर त्यांचे व्यक्तिमत्व हे एक स्वतःतच मग्न झालेले, आत्यंतिक व्यक्तिवादी, व आत्मरत असेच दिसते. जीवनातील विविध अनुभवांचे दर्शन त्यांनी घेतले खरे. पण ते त्यांना मुळातून हलवून सोडू शकले काय, याचे उत्तर नकारार्थीच द्यावे लागेल. ते दर्शन केवळ मनोरंजक वाटावे, त्यावद्दल वाचकांत फक्त कुतूहलच निर्माण व्हावे व त्यापलिकडे त्याचा काही इतर (सामाजिक वगैरे) संदर्भ आहे वा असावा याची जाणीव त्यांना ठेवावीशी वाटली नाही. देशातील प्रक्षोभाच्या, चळवळीच्या बाजूला पण एका सुरक्षित अंतरावर उभे राहून त्यांची वर्णने करताना ते दिसतात. जी दुःखे येतात तीही अपरिहार्यपणे येताना दिसत नाहीत. केवळ विरोधाभासासाठी, सुखाची चव वाढावी म्हणूनच ती येतात. पार्श्वभूमीपलिकडे त्यांना अधिक महत्वाचे स्थानही नसते. आणि फडकेही ह्या चळवळी, प्रक्षोभ वा दुःखे यांच्याशी मनाने पूर्ण समरस झाले आहेत, असेही वाटत नाही. याचे कारण त्यांच्या वाङ्मयीन व्यक्तिमत्वातच आहे, असे वाटते.

आणि त्यांचे हे वाङमयीन व्यक्तिमत्वही फार आधीपासूनच बनलेले दिसते. त्याहून आश्चर्य म्हणजे पुढेही त्यात फारसा किंवा जवळ जवळ मुळीच बदल झालेला दिसून येत नाही. जीवनाकडे, कलेकडे वा वाङमयाकडे पाहण्याची त्यांची दृष्टी क्लेटन हॅमिल्टनच्या वाचनाने एकदा जी बनली किंवा त्यांनी जी निश्चित केली तीत काही बदल करावा असे त्यांना कधी वाटले नाही. आपल्यावर होणाऱ्या टीकेकडेही त्यांना लक्ष द्यावेसे वाटले नाही. उलट "ललित साहित्यांचे जे सिद्धांत आहेत त्यापासून मी कधी ढळलो नाही, ढळणार नाही आणि त्या सिद्धांताना अनुसरून माझं कादंबरी-लेखन चालू राहिलेलं आहे, राहणार आहे"[१], असे त्यांनी आपली सर्वात आवडती कादंबरी कोणती हे सांगताना १९७३ मध्ये टीकाकारांना बजावले आहे. आणि आपली मते नुसतीच स्थिर झालेली नाहीत तर ती अधिकच दृढ झाल्याचे ते 'कुहू ! कुहू !' या ५० व्या कादंबरीच्या प्रस्तावनेत सांगताना दिसतात.

लोकमान्य टिळक, म. गांधी यांच्या सारख्यांचा सहवास, १९३० च्या चळवळीत उडी घेतल्यावरची व तत्वनिष्ठेतून आलेली काही वर्षांची सक्तीची बेकारी व भटकंती, संस्थानी वातावरणातील काही संघर्षाचे क्षण व कौटुंबिक जीवनातील कसोटीचे क्षण असे विविध अनुभव त्यांनी घेतले. पण या सर्वांचा त्यांच्यावर कुठे खोल परिणाम झालेला दिसत नाही. यातही त्यांनी स्वतःची अलिप्तता कटाक्षाने जपली. 'जीविताकडे पाहण्याची माझी दृष्टी' या दि. १३–८–३८ रोजी मुंबई आकाशवाणीवरून केलेल्या भाषणात त्यांनी म्हटले आहे की, "मानवी सुखदुःखाकडं मी कलावंताच्या दृष्टीनं पाहायला शिकलो आहे. म्हणजे असं की सुखदुःखाचा तात्विक विचार करताना फार खोलात न शिरता दोहोंतलंही सौंदर्य अनुभवणं शक्य आहे असं मला वाटतं."[२] कलावंत आपल्या प्रतिभेच्या साहाय्याने सौंदर्य निर्माण करतो, तद्वतच माणसाने स्वतःच्या अंतःकरणाची प्रसन्न वृत्ती त्या त्या अनुभवात घातली की, त्या अनुभवात आनंद प्रकट होत असतो. जीवित पूर्ण आनंदमय नसले तरी त्यातल्या आनंदाचा भाग वाढविणे प्रत्येक व्यक्तीचे कर्तव्य आहे; ही कलावंताची दृष्टी प्रत्येकाने ठेवली पाहिजे हे त्याच भाषणातील फडक्यांचे विचार लक्षात घेतले तर त्यांची दृष्टी व तिच्या कक्षा ही दोन्ही स्पष्ट होतात. कोणत्याही अनुभवात स्वतःला झोकून न देता, त्यातील वैशिष्ट्यपूर्णता व सुखमयता वाढविण्याकडेच फडके यांनी लक्ष दिले आणि एका सुंदर पण आभासमय विश्वाची निर्मिती केली.

'साहित्यातील वास्तव आणि ध्येय' आणि 'साहित्याकडे पाहण्याची माझी दृष्टी' या त्यांच्या दोन व्याख्यानांतूनही त्यांची ही आनंद मिळविण्याची व तो वाढविण्याची वृत्तीच व्यक्त झाली आहे. ललित वाङमयाचे फडके यांनी सांगितलेले कार्यही याच दृष्टिकोणाशी सुसंगत आहे. "ऐहिकाच्या बंधनांनी जखडलेल्या आणि अपयशाचे व निराशेचे तडाखे खाऊन शिणलेल्या मनुष्याला आपल्या पंखावर घेऊन एका भरारीत सौंदर्यविलासाच्या रम्य वातावरणात नेऊन उभा करणे हाच साऱ्या कलांचा व म्हणून साहित्याचाही मूळ हेतू आहे,"[३] असे त्यांनी १९३१ मध्ये 'प्रतिभासाधन' मध्येच म्हटले आहे. त्याचबरोबर "All genius is unconscious" ही सर्वसामान्य समजूत खरी नसून तिच्यातील सौंदर्य कलावंताने हेतुपूर्वक, परिश्रमपूर्वक निर्माण केलेले असते असे त्यांनी 'वाङमय-विहार' या १९३२ मधील लेखमालेत सांगितले आहे. फडके यांचे समग्र साहित्य या दोन विधानांची जवळ जवळ प्रात्यक्षिकेच आहेत.

फडके यांनी 'कलेसाठी कला' या तत्वाचा पुरस्कार केला; पण सतत वाचकांचाही विचार आपल्या डोळ्यांपुढं ठेवला असे दिसून येईल. जे जे आपल्याला वाटले, समजले ते ते लोकांना सहज समजेल अशा प्रकारे सांगण्याची रमणीय पद्धत लेखकाला माहीत असते; कारण तो वाचाशून्य सामान्य माणसाचा प्रतिनिधी असतो आणि त्याची संवेदनाशक्ती त्यांच्यापेक्षा शतपटीने अधिक असते व विविध अनुभवांमागील कार्यकारणसंबंध

शोधून काढण्याचे त्याचे सामर्थ्यही मोठे असते हे फडक्यांना मान्य आहे. पण तरीही लेखकाकडे एक प्रकारची दुय्यम व खुपमस्कऱ्याची भूमिका घेताना ते दिसतात. वास्तववाद आणि ध्येयवाद यात भांडण खेळणं चुकीचं आहे असे म्हणूनही फडके पुढे त्या भूमिकेला अशी मर्यादा घालतात की; "कादंबरी किंवा नाटकात ध्येयाचं दर्शन असावं. परंतु त्या ध्येयाच्या व वास्तवाच्या मर्यादा एकमेकीला लागलेल्या वाटतील इतक्या बेतानं ते केलेलं असावं. गाढव आणि गाजर या गोष्टीतल्या गाजरासारखं ते असावं."[४] त्यांच्या या भूमिकेत लेखकाने वाचकाला गुंगवून भुलवून आपल्या तंत्राचे, रमणीय भाषेचे मुलामा दिलेले साहित्याचे गाजर वाचकांपुढे धरावे व त्याला आपल्यामागून यायला लावावे अशी वाचकांवर दृष्टी ठेवून लेखन करण्याची वृत्ती दिसते. त्यामुळे त्यांच्या साहित्यातला वास्तववाद हा प्रखर, निर्भेळ नसून त्यांच्या कालखंडातील विविध संघर्ष व चळवळी यांच्या पार्श्वभूमीचे पडदेच का वाटतात हे कळून येते. आणि विशेष म्हणजे खुद्द त्यांनाही पार्श्वभूमीपलीकडे महत्व द्यावे असेही वाटत नाही.

साहित्याकडे पाहण्याच्या त्यांच्या दृष्टीत वाङ्मयाच्या दोन शाखांपैकी 'शिकविणाऱ्या' शाखेपेक्षा 'रिझविणाऱ्या' शाखेला अधिक महत्व मिळाले आणि रिझवणे हाच तिचा प्रधान हेतू मानून अनुषंगाने इतर गौण हेतू साधणे अशक्य व अनिष्ट आहे असे नव्हे असे त्यांनी मानलेले आहे. रंजकता हीच साहित्याची मुख्य कसोटी व ती मान्य नसेल तर ललित वाङ्मयाचे 'ललित' हे विशेषणच व्यर्थ आहे असे त्यांनी म्हटले. ललित वाङ्मयापासून आनंद निर्माण होण्याचे मुख्य कारण त्यांच्या मते असे की, त्यात सत्याचा जबरदस्त आभास उत्पन्न केलेला असतो. तो निर्माण करण्यासाठी "जीवनाच्या कच्च्या मालालाच सुंदर आकर्षक आकार देऊन व आपल्या अपूर्व निवेदनशैलीचं गिलीट त्यावर चढवून कादंबरीकार आपल्या ललित लेखनाचा पक्का माल तयार करीत असतो. कच्च्या मालाच्या नव्या नव्या जाती कुठल्या कुठल्या खाणीत अगर उतारपेठेत मिळू लागल्या याकडे हुषार कारखानदाराचं लक्ष असावं तद्वतच भोवतालच्या जीवनात नाट्यमय प्रसंग उत्पन्न करण्यासारखी कोणती नवी स्थित्यंतरं होत आहेत याकडं जो आपली दृष्टी दक्षतेनं ठेवील त्या कादंबरीकाराचं लेखन लोकांस अधिक मोहिनी घालील हे उघडच आहे"[५] असे त्यांनी मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालयाच्या अध्यक्षपदावरून दि. १४ ऑगस्ट, १९३८ रोजी केलेल्या 'साहित्य सागरावरील लहानमोठी वादळे' या भाषणात म्हटले आहे. फडके यांनी स्वतः एखाद्या हुषार कारखानदाराप्रमाणे जीवनाच्या बाजारपेठेवर बारीक लक्ष ठेवले यात शंकाच नाही. महात्मा गांधींच्या चळवळीपासून सुभाषबाबूंच्या आझाद हिंद फौजेपर्यंत, सावरकरी विचारसरणीपासून काश्मीर हैदराबाद संघर्षापर्यंत आणि मानसशास्त्रीय समस्यांपर्यंत सर्वांचा त्यांनी आपल्या लेखनासाठी उपयोग केला. मात्र यातही त्यांनी सर्वप्रथम स्थान दिले ते नवलाईला व वैचित्र्याला. ललित लेखनाने नवीनपणावर नेहमी निशाण धरले पाहिजे याविषयी त्यांच्या मनात शंका नाही. तसेच 'काय सांगायचें' यापेक्षा 'कसे सांगावयाचे' यालाही त्यांच्या कलाविलासात अधिक महत्व आहे. "विषय तसा नवा असावा किंवा जुन्या विषयाचीच पण नवीन मांडणी केलेली असावी. या संकेतामुळेच त्याच त्या जुन्या विषयाकडं कादंबरीकाराचं लक्ष वळतं. त्या विषयाचं नवीन तऱ्हेनं चित्रण केलं की पुरे हे त्यांना ठाऊक असतं,"[६] असे त्यांनी जेम्स हिल्टनच्या (Time and Again) या कादंबरीचा परिचय करून देताना म्हटले आहे. स्वतःच्या लेखनात त्यांनी कधी विषय नवा घेतला तर जुन्याच विषयाची नवीन मांडणी केली. आपल्या नायक-नायिकांना निरनिराळ्या संघर्षातून व प्रांतातून फिरवून आणले. पण ते मनाच्या करमणुकीसाठी, जीवनाचा कंटाळवाणेपणा झडून जावा व वाचकांना रुचिपालट वाटावा एवढ्याच माफक हेतूने. यापलिकडे आणखी काही करावे हे त्यांच्या कलाविषयक दृष्टिकोणात बसतच

नसावे. आपली आधुनिकता, अगदी अद्यावत आधुनिकता त्यांनी सतत जपली. त्यानुसार साहित्यातले सिद्धांत त्यांनी जे एकदा निश्चित केले त्यांच्या फेरविचाराची त्यांना कधी गरजच भासली नाही.

पाश्चात्य वाङमयाच्या त्यांच्या वाचनातही त्यांना हेच आपले आवडते सिद्धांत सापडले. अक्षर वाङमयाचा गुणांवशेष सांगतांना कला-कृतींची आनंद देण्याची अविनाशी शक्ती त्यांना सापडली. पण त्या आनंदाची प्रतवारी ठरविण्याची आवश्यकता त्यांना वाटली नाही. "आशय आणि त्याचा अविष्कार या दोन भिन्न गोष्टी आहेत. आणि कादंबरीची किंमत ठरवावयाची असते ती आशयावरून नव्हे तर आशयाचा आविष्कार करताना लेखकाने किती कल्पकता व चातुर्य दाखविले आहे यावरून,"[७] असे त्यांनी अलिकडे आपल्या आवडत्या कादंबरीसंबंधीही म्हटले आहे. त्यांना सर्वात महत्वाची गोष्ट वाटते ती 'सुंदर लिहिणं', चित्रपटातल्या दिग्दर्शकाच्या 'टेकिंग'ला जे महत्त्व असते त्याच्याशी त्यांनी कादंबरीकाराने ठिकठिकाणी पेरलेल्या वारकाव्यांची तुलना केली आहे. त्यामुळे कादंबरीची रंजकता वाढते, ही गोष्ट त्यांना महत्वाची वाटते.

रंजकता, वैचित्र्य, आनंद देणे या सिद्धांतावरचा आपला विश्वास केवळ स्थिरच नव्हे तर दृढ झाल्याचे त्यांनी अगदी अलिकडेही पुनः पुन्हा सांगितले आहे. सुंदर कलाकृतीची व्याख्याही ते अशी करतात की, "सबंध कलाकृती तर मोहक असली पाहिजेच. पण शिवाय तिचा प्रत्येक भाग स्वतंत्रपणे आकर्षक असला पाहिजे."[८] या कल्पनेला अनुसरूनच फडक्यांनीही आपल्या कादंबरीची विविध अंगे स्वतंत्रपणे लक्ष्यात यावीत इतकी आकर्षक केली असेच दिसून येते.

वाचकांचे रंजन करणे, त्यांना आनंद देणे यावर फडक्यांनी अविचल श्रद्धा ठेवली. साहित्यक्षेत्रातले आपले खरे वैशिष्ट्य कोणते हे सांगताना त्यांनी आपल्या आत्मचरित्रात म्हटले आहे की "या आयुष्यात जे जे पाहिलं, ऐकलं, अनुभवलं त्याला त्याला मी साहित्यरूप दिलं. हेच माझं वैशिष्ट्य, हेच माझं कर्तृत्व आणि हेच माझं अक्षय आनंदाचं निधान."[९] 'जीवनासाठी कला' की 'कलेसाठी कला' या वादात सतत त्यांनी कलेचा पक्ष घेतला. पण आयुष्याच्या संध्याकाळी त्यात थोडा बदल झाला असल्याचे त्यांनी आपल्या आत्मचरित्रात म्हटले आहे याचा अर्थ त्यांनी मूळ सिद्धान्त सोडला असे नव्हे, तर उलट तो दृढ झाला. आणि त्यांमुळे त्यांची नवी भूमिका त्यांनी अशी मांडली आहे की, "मी जो जो उद्योग केला तो साहित्यनिर्मितीचा हेतू पुढे ठेवूनच. 'जीवनासाठी कला' की 'कलेसाठी कला' या वादात कलेसाठी कला या वादाचा मी नेहमी हिरीरीनं पुरस्कार करीत आलो. परंतु एक पाऊल पुढे जाऊन मी असं म्हणतो की, माझ्या साहित्यामागं 'कलेसाठी कला' एवढंच सूत्र नाही तर 'कलेसाठी जीवन' ही प्रेरणा अधिक अंशानं आहे. जे जे पाहिले, ऐकलं, अनुभवलं त्याला त्याला साहित्यरूप देण्यासाठी मी झटलो आहे."[१०]

फडके यांच्या 'कलेसाठी कला' या भूमिकेचे रूपांतर अखेर 'कलेसाठी जीवन' यात झाले यात आश्चर्य नाही. इथे त्यांच्या कलाविषयक भूमिकेचे एक वर्तुळ पूर्ण होते. किंबहुना सुरुवातीपासून जीवन व कला यांची त्यांनी जी कृतीत विभागणी केली त्याचीच ही अपरिहार्य परिणती म्हणावी लागेल. पण त्यांनी ही जी कलाविषयक भूमिका घेतली व विशेष म्हणजे सतत ती लढविली तिचा एक चांगला परिणामही झाला. आणि तो म्हणजे कलेच्या स्वायत्ततेवर साम्यवाद, गांधीवाद यांसारख्या प्रभावी विचारसरणीचे आक्रमण परतून लावण्याचे बरेचसे कार्य तिने केले. पुरोगामी साहित्याचा वाद, सत्यं शिवं सुंदरम वाद इत्यादी प्रत्येक वादांच्या वेळी फडके कलेच्या बाजूने ठामपणे उभे राहिले. त्यांमुळे त्यांच्या कलाविषयक भूमिकेला न कळत जरी साधनाचे स्वरूप आले तरी मराठी वाङमयाच्या दृष्टीने त्यांची भूमिका उपकारकच ठरली, यात शंका नाही.

त्यांच्या साहित्यदृष्टीचा परिणाम त्यांच्या टीकादृष्टीवर आणि वाङमयावरही अपरिहार्य-

(पृष्ठ २५२ वर पहा)

ज्योती कस्तुरे / 'संगमोत्सुक डोह': एक अनुभव

पिरेड-बेल झाली. अन् मी वर्गात पाऊल टाकलं. सत्तर-ऐंशी आनंदी चेहरे माझीच वाट बघत होते. सवयीनुसार मी खुर्ची ओढली. रोल-कॉल घेतला अन् शिकवणं सुरू केलं. कधी नव्हे ते आज मला विद्यार्थ्यांना शिकवणं अवघड वाटू लागलं. मला उलगडून दाखवायच्या होत्या विरहार्त डोहाच्या दारुण मनोव्यथा. मी एकवार संपूर्ण वर्गावर नजर टाकली. तारुण्याच्या उंबरठ्यावर उभे असलेले ते अल्लड किशोर, ती स्वप्नील फुलपाखरं! त्यांच्याकडे बघून वाटलं कोणत्या समर्थ शब्दांत सांगाव्यात यांना त्या 'व्यथाजर्जर डोहाच्या तीव्र वेदना? नुकत्याच उमलू लागलेल्या या फुलांना समजतील का अकाली कोमेजलेल्या फुलाच्या मनोभावना? विचारांचे उलट-सुलट प्रवाह वाहू लागले. तरीही मी निश्चयपूर्वक माझं शिकवणं चालू ठेवलं.

'संगमोत्सुक डोह' माधव-जूलियनांची एक नितांत करुणरम्य, रूपकात्मक प्रेमकविता. विरह-व्यथित प्रियकराचं उजाड जीवन सार्थ शब्दांत उभं करणारं एक समर्थ भावगीत. इथं रखरखीत वाळवंटातील एकाकी डोह आहे एकनिष्ठ नि मीलनोत्सुक प्रियकराचं प्रतीक! तर प्रियकराची प्रतारणा करणाऱ्या स्त्री-प्रेमाचं प्रतीक आहे चंचल नदी. खरं तर हा एक झिरझिरीत पडदाच आहे. चाणाक्ष रसिक तत्काळ जाणतात की कवीनं इथं स्त्री-पुरुषांच्या प्रेमभावनेवर खऱ्याखुऱ्या प्रेम-भावनेवर डोहाच्या निमित्यानं भाष्य केलं आहे. डोहाच्या माध्यमातून जीवनातल्या एका कटू वास्तवाला बोलक केलं आहे. यातला प्रियकर उध्वस्त झाला आहे. पार कोलमडून गेला आहे तो! त्याची प्रिया त्याला अर्ध्या वाटेवर सोडून निघून गेली आहे--दूर कुठं तरी, पुन्हा परत न येण्यासाठी. या उभ्या जगात तो अक्षरशः एकटा पडला आहे. प्रेमभंग झालेल्या, इतरांच्या दृष्टीनं सुखी पण तरीही सर्वस्व गमावलेल्या, विरहानं पोळून निघालेल्या या प्रियकराचं चित्र हृदय हेलावून सोडणारं आहे. आपल्या प्रियेच्या चिंतनात तो जगतो आहे. प्रेमविषयक त्याच्या कल्पना फार उदात्त, फार स्वर्गीय होत्या. 'लोपते का कधी प्रीति उदेली' हा त्याचा विश्वास. पण त्या विचाऱ्याच्या वाट्याला आल्या आहेत प्रेमभंगाच्या दारुण जखमा. आपल्या या भयाण अवस्थेचे वर्णन करताना तो म्हणतो, 'जीवनज्योत न माझिया गेही। म्हणून हे कृष्ण-वसन देही'.

या ओळींमधून कवीनं वास्तव जीवनातल्या एका विदारक सत्यावर प्रकाश टाकला आहे. स्त्री ही पुरुषाची प्रेरणा, त्याच्या मनोरथांचे, आकांक्षांचे स्फूर्तिस्थान. त्याच्या आशावृक्षाचा जीवनरस म्हणजे स्त्रीचं प्रेम! आपल्या प्रियकराची निर्विकारपणे वंचना करून, त्याची प्रचंड फसवणूक करून ती जर त्याच्या आयुष्यातून निघून गेली तर त्याचं आयुष्य वनतं रुक्ष, रेताड वाळवंट. तो पुन्हा वहरत नाही, फुलत नाही. विरहाच्या या मूक वेदना त्याच्या जीवनातील काव्यच संपवून टाकतात. त्याला चार-चौघांत मिसळावंस वाटत नाही. कुणाजवळ मन मोकळं करता येत नाही. ही प्राथमिक बेचैनी लोकनिंदेमुळे आणखीच बोचक बनते. विरहार्त जीव हा समाजातील कुचाळक्या करणाऱ्या लोकांचा खास आवडीचा विषय. 'भावना मेली, हासेना, बोलेना, करेना केली' यासारख्या खोचक उद्गारांनी त्याच्या व्यथेला वेगळीच धार प्राप्त होते. कुणी त्याला हिणवतात, कुणी टिंगल करतात, कुणी त्याच्याकडं बघून उपहासानं हसतात. तर कुणी त्याच्यावर सहानुभूतीचे दोन-चार वांझ शब्द उधळतात. अर्थात हे सारं त्या व्यथाजर्जर जीवाला फार टोचतं. आणि मग त्याची उरली-

सुरली प्रसन्नताही कायमची मावळून जाते. पुष्कळदा तो आपलं दुःख पचवून टाकण्याचा प्रयत्न करतो. उत्साहाचं उसनं अवसान आणण्याचा प्रयत्न करतो. पण तो केवळ बाह्य उपचार ठरतो. अंतरातली जडता भंग पावणं कदापी शक्य नसतं. एकांतात मनात कायमची ठाण मांडून बसलेली उदासीनता नव्यानं उफाळून येते. मनातला काळोख व्यस्त प्रमाणात वाढतच जातो. जगाच्या हेटाळणीचा विषय बनलेला तो व्याकुळ जीव मग रम्य निसर्गाच्या सान्निध्यातही खुलत नाही.

अशा या विरहार्त प्रियकराची संध्याकाळही तितकीच जीवघेणी आहे. संध्याकाळीच एकाकी जीवाला सर्वात जास्त खिन्नता येते. उभा दिवस कसा तरी निघून जातो. मग येते कातर संध्याकाळ. कुठं जाणार तो यावेळी ? कशात रमवणार आपलं मन ? कोण बघणार असते त्याची वाट ? प्रियजनांच्या ओढीनं लगबगीनं घराकडं परतणारी माणसं इतकंच नव्हे तर गुरेढोरे तो बघतो अन् मग मात्र त्याचं मन त्यांच्या ताब्यात राहत नाही. तो तरी आपल्या रक्तबंबाळ हृदयाला कुठवर बांध घालणार ? 'घरास वळती माणसे गुरे अन् माझे अंतर निःशब्द झुरे'. हे त्याचे उद्‌गार. तो नुसता झुरत राहतो. फक्त झुरतच. यावेळी त्याच्या मनाची कशी घालमेल होत असेल ? कशा सहन करीत असेल तो या मूक पण तितक्याच जहरी वेदना ? त्याच्या या अवस्थेचं वर्णन करताना माझे शब्द भुंडे पडले. वाणीला वाचाच उरली नाही. अन् मी मोठ्या कष्टाने पुढच्या कडव्याकडं वळले.

या प्रियकराच्या मनात तरीही एका आशेचं पाखरू भिरभिरत असतं. कधी तरी माझी प्रिया परत येईल. विरहाचा वैशाख संपेल. मीलनाचा वर्षाऋतू नक्की येईल. या आशेपोटी तो भविष्यातील निस्संग मीलनाची स्वप्ने बघू लागतो. वर्षाऋतूसारख्या प्रसन्न ऋतूत, आकाशाच्या मांडवाला इंद्रधनुष्याचं तोरण बांधलं असताना पाखरांच्या गोड किलबिलाटात आपलं मीलन होईल त्या धुंद क्षणी तरी तू मला दृढ आलिंगन देशील ना ? अशी मखमली, रेशमी स्वप्नं बघण्यात तो गुंगतो. पण बिचाऱ्याला लवकरच कळतं अजून वैशाख संपण्यास बराच अवकाश आहे. पण हा वैशाख कधी तरी संपणार असतो का ? सुकलेलं फूल सौरभ उधळू शकेल का ? विरहाचा वैशाख संपून मीलनाचा वर्षाऋतू कधीच येणार नाही हे जेव्हा त्याला पटतं तेव्हा त्याची व्याकुळता अंतिम टोक गाठते. 'अजून संपेना वैशाख हन्त'. या त्याच्या कमालीच्या आर्त उद्‌गारातील कारुण्य काळजाला स्पर्शून गेलं.

कविता संपली. पण शिकवता-शिकवता कवीच्या या दारुण, अनोख्या व्यथेनं माझंही मन चिंब भिजून गेलं. डोळ्यांच्या कडा पाणावल्या. मी विद्यार्थ्यांकडं बघितलं. ते तन्मयतेनं, जीवाचे कान करून ऐकतच होते. निघण्याच वेळानं त्यांना कळलं आपल्या मॅडम थांबल्यात पण संपूर्ण पिरेडभर कवी, मी आणि माझे विद्यार्थी यांची जणू एकमूस बनली होती. आपपरभाव उरलाच नव्हता असे हे उत्कट अनुभूतीचे दिव्य क्षण मला बरंच काही देऊन गेलेत. स्मृतिपरागांना वेदनेत भिजवून ते क्षण तर निघून गेलेत. पण गंध मागे दरवळत राहिला आहे, अजूनही.

⊕ ⊕ ⊕

सामाजिक प्रबोधनाला बंगाल आणि महाराष्ट्र ह्याच प्रांतांमध्ये प्रथमतः आरंभ झाला. सामाजिक अभिसरणाची प्रक्रियाही इथेच अधिक गतिमान राहिली. महात्मा ज्योतिबा फुले यांच्यासारखा कृति-तत्पर समाजसुधारक आणि गोपाळ गणेश आगरकर यांच्यासारखा पूर्ण बुद्धिवादी सुधारक ह्याच महाराष्ट्राने देशाला दिला. डॉ. आंबेडकरांची अभूतपूर्व धर्मान्तराची क्रांती ह्याच महाराष्ट्रात घडली. अव्वल इंग्रजी कालखंडात तर सांस्कृतिक सामाजिक परिवर्तनाचे महाराष्ट्र केन्द्र बनले होते. महाराष्ट्राच्या विचारसृष्टीत दोन प्रवाह दिसतात. (१) आपल्या देशातले जे जुने होते, ते गतार्थ झाले आहे असे समजून पाश्चिमात्यांनी केलेल्या वैज्ञानिक प्रगतीपासून बोध घेणारा नव्या प्रगतिपर विचारांचा प्रवाह. (२) आपल्या देशातील जुन्या वैचारिक भावनात्मक परंपरांना मानणारा विचारप्रवाह. महाराष्ट्रातील सर्वच समाजसुधारक हे या पहिल्या संप्रदायातील. राजा राममोहन राय ह्यांच्यापासून सुरू झालेल्या प्रबोधनयुगाचे ते पुरस्कर्ते होते.

आपल्या सर्वांगीण गुलामगिरीचे न्यूनगंड बाजूला सारून स्वातंत्र्यासाठी बंडाची, विद्रोहाची चेतना देण्याचे कार्य दुसरा संप्रदाय करीत होता. लोकमान्य टिळकांपासून स्वातंत्र्याकांक्षेला निश्चित सूर सापडला. पण टिळकांपूर्वी अस्मिताजागृतीचे कार्य विष्णुशास्त्री चिपळूणकरांनी केले. ह्या पूर्वसूरीलाच 'वाट पुसतु' लोकमान्यांनी स्वातंत्र्याकांक्षेचा यज्ञकुंड पेटविला. ब्रिटिश राजवटीविरुद्धचा पहिला वाङ्मयीन हुंकार चिपळूणकरांच्या निबंधमालेत प्रगटला. भारतीय स्वातंत्र्यपर्वाची ती नांदी होती. समकालीन इतर भाषांचा वाङ्मयेतिहास लक्षात घेऊन मी ह्या निष्कर्षाप्रत येऊन पोहचलो की, चिपळूणकर हे भारतीयांना पारतंत्र्याविरुद्ध लढण्याचा सूचक इशारा देणारे पहिले लेखक होत.

ब्रिटिश राजवट येण्यापूर्वीचे आमचे सर्वच वाङ्मय 'आपण काहीतरी तरावया गावें' ह्याच भूमिकेतून लिहिले गेलेले आहे. संतांचे 'नेत्र पैलतीरी' लागल्याने त्यांच्या वाङ्मयात 'परतत्त्व'-निरूपणच आहे. पंडिती काव्याची प्रेरणा, काव्यकारण व काव्यप्रयोजन यांबाबत वाद आहे. पण वरवर पाहता पंडितीकाव्यात परमेश्वराधनाच दिसते. शाहिरी वाङ्मयात शृंगार होता जीवनासक्ती होती. संत आणि पंडिती काव्याच्या तुलनेत ते अधिक लोकाभिमुख होते. पण सामाजिक वास्तवाचे भान व समाजमनाचा सर्वांगीण अविष्कार ह्या गोष्टीची उणीव ह्याही वाङ्मयात होतीच.

ब्रिटिश राजवटीनंतर आमच्या देशात सुधारणेचे वारे वाहू लागले. आमच्या समाजरचनेला, जीवनमूल्यांना आव्हाने मिळू लागली. सामाजिक विषमताविरोधी पडसाद देशभर उमटू लागले. बंगालमध्ये राजा राममोहन राय यांच्यासारख्या नेत्याने समाजप्रबोधनाचा अग्नी सिद्ध केला. ज्योतिबा फुल्यांसारखी क्रांतिज्योत त्यातून पेटून उठली. स्वातंत्र्य, समता आणि बंधुत्व ह्या विचारत्रयींच्या आधारे नवसमाजनिर्मितीची प्रस्तावना त्यांनी केली. लोकहितवादी, न्या. रानडे, गोविंद नारायण माडगावकर, विष्णुबुआ ब्रह्मचारी अशा लेखकांनी प्रामुख्याने समाज सुधारणापर निबंधलेखन केले.

१८०० ते १८७४ या कालखंडातील साहित्य हे वाङ्मयदृष्ट्या श्रेष्ठ नसले तरी ह्या काळाला वाङ्मयेतिहासातील 'तमोयुग' म्हणणे योग्य होणार नाही. ह्याच कालखंडात आमचा देश एका नव्या सामाजिक, राजकीय अभिसारणाच्या प्रक्रियेतून जात होता. त्या नवप्रवृत्तीशी नव-

मूल्यांशी जुळवून घेताना भारतीय मन गोंधळले होते. इंग्रजी वाङमयातील अपरिचित मूल्यांची ओळख व्हावी म्हणून भाषांतरित वाङमयनिर्मिती झाली. मात्र अशा संक्रमणावस्थेतही काळाचा संदर्भ लक्षात घेऊन, नवक्रांतीच्या बंडाचे निशाण घेऊन प्रगटलेली ज्योतिबांची ग्रंथसंपदा, पुरोगामी विचारांचा प्रभावी पुरस्कार करणारी लोकहितवादींची शतपत्रे ही सर्व तमोयुगाचे प्रातिनिधिक स्वरूपाचे वाङमयच ठरवायचे का ?

अव्वल इंग्रजी कालखंडातील भारतीय वाङमयाचा साकल्याने विचार करता ते प्रामुख्याने (१) अध्यात्मस्वरूप विचारांचे नव्या भूमिकेतून प्रतिपादन करणारे आणि (२) ब्रिटिश राजवटीच्या संपर्काने आलेल्या नव सामाजिक सांस्कृतिक मूल्यांचा पुरस्कार करणारे आहे. बंगाली, हिंदी, गुजराती, कन्नड, तामिळ या सर्वच भारतीय भाषांमधील वाङमय अव्वल इंग्रजी कालखंडात ह्या पद्धतीचे आहे.

साहित्य अकादमीने प्रसिद्ध केलेल्या भारतीय वाङमय समालोचनात्मक पुस्तकातही साहित्याचे हेच रूप दिसून येते. साधारणतः प्रत्येक भाषेतील वाङमयेतिहास आज हिंदीत लिहिला गेला आहे. त्या वाङमयेतिहासाचे अध्ययन करून मी ह्या निष्कर्षाप्रत येऊन पोहचलो की, चिपळूणकरपूर्व सर्व भारतीय वाङमय वर निर्देशित केल्याप्रमाणे आहे. मात्र हिंदीतील भारतेन्दु हरिश्चन्द्र व मराठीतील विष्णुशास्त्री चिपळूणकर ह्या समकालीन साहित्यिकांनी ह्या साहित्यप्रवाहापेक्षा सर्वस्वी वेगळ्या जाणिवेने वाङमयनिर्मिती केली.

भारतेन्दु हरिश्चन्द्र व विष्णुशास्त्री यांचा जन्म १८५० मध्ये झाला. दोघाच्याही वाट्याला अल्पायुष्य आले. भारतेन्दु हरिश्चन्द्र वयाच्या पसतिसाव्या वर्षी तर विष्णुशास्त्री हे बत्तिसाव्या वर्षी कालवश झालेत. नाट्य, काव्य, वृत्तपत्र अशा विविध वाङमयीन आघाड्यांवर भारतेन्दू कार्यरत होते. गीतगोविंदकार जयदेवांच्या गीतिकाव्याची परंपरा या कवीने चालविली. सुमारे दीड हजार पदे त्यांनी लिहिलीत. त्यात कृष्ण भक्तिपर पदरचना अधिक आहे. त्यात विनय, बाललीला आणि कृष्ण-गोपीशृंगार अशा त्रिविध भावांचे मनोज्ञ दर्शन घडते. त्यांनी काही स्वतंत्र, तर काही अनुवादित नाटके लिहिलीत. एवढेच नव्हे तर इंग्रजी व संस्कृत नाट्यशास्त्राचा तौलनिक अभ्यास करून 'नाटक' नावाचा स्वतंत्र समीक्षाग्रंथ लिहिला. मराठी भाषेचा 'शिवाजी' म्हणून विष्णुशास्त्री चिपळूणकरांचे स्थान जसे महत्त्वाचे आहे तसेच हिन्दी भाषेला वाङमयीन सौंदर्य बहाल करणारा बहुविध साहित्यिक म्हणून भारतेन्दु हरिश्चन्द्राचे स्थान महत्त्वाचे आहे.

एक सव्यसाची साहित्यिक म्हणून भारतेन्दूचे स्थान मोठे तर आहेच. पण स्वसंस्कृतीचा अभिमान जागृत करण्याचे महत्त्वपूर्ण कार्यही त्यांनी साहित्याद्वारे केले. ह्याबाबतीतही विष्णुशास्त्री व भारतेन्दु ह्यांच्यात साधर्म्य आहे. प्राचीन संस्कृतीचे व इतिहासाचे गोडवे गाताना भारतेन्दुजींनी पारतंत्र्यात अडकलेल्या दुर्दैवी भारताचे शब्दचित्र काव्याद्वारे उत्कटपणे रंगविले—

'रोम ग्रीस पुनि निज बल पायो ।
सब विधि भारत दुखी बनायो ।।'

आणि पुढे तर—

'कहा करी तकसीर तिहारी ।
रे विधना भारतहि दुखारी ।।
रोइ भारत की आज यह भई दुरदशा हाय ।
कहा करैं कित जायँ नहि सूझत कछू उपाय् ।।'

भारतेन्दु हरिश्चन्द्रांनी ब्रिटिश संस्कृतीला असा विरोध केला. पण हा विरोध 'उत्तरकर्तव्योन्मुख' करणारा नव्हता. ब्रिटिश राजवट हे एक दुर्दैव आहे हे त्यांनी सांगितले. पण जनतेला कार्यप्रवण करण्याचे सामर्थ्य त्यात नव्हते.

भारतेन्दु हरिश्चन्द्रांनी आपल्या वाङमयाद्वारे ब्रिटिश राजवटीविषयीची विरोधी प्रतिक्रिया व्यक्त केली. पण हा सूर निव्वळ प्रतिक्रियात्मक होता. प्रतिकाराचे सामर्थ्य, समाजाला 'उत्तर कर्तव्योन्मुख' करण्याची जाज्वल्यता त्यात नव्हती. विष्णुशास्त्री ह्यांनी निबंधमालेच्या द्वारे स्वातंत्र्याकांक्षेचा धगधगता अग्निकुंड पेटविला.

'देशस्थिती सुधारण्याचा राजमान्य मार्ग म्हटला म्हणजे लोकांस ज्ञानसंपन्न करणे हा होय.' ही संपन्नता सिद्ध करण्याची साधने म्हणजे रसना व लेखणी ही होत. (आमच्या देशाची स्थिती) अशा श्रद्धेने विष्णुशास्त्री चिपळूणकरांनी 'न्यू इंग्लिश स्कुल'ची स्थापना व 'केसरी', 'मराठा' यासारख्या वृत्तपत्रांची निर्मिती केली. ह्या संस्थांतून राष्ट्रवादी विचारांना गती प्राप्त झाली. राष्ट्रवादाचे बीज चिपळूणकरांनी महाराष्ट्राच्या विचारसृष्टीत लावले. त्यांनी स्वदेश, स्वभाषा व स्वसंस्कृती च्या अभिमानाला आवाहन करून महाराष्ट्रीयांच्या मनात स्वातंत्र्याकांक्षेची ज्योत पेटवली. त्यांचे वाङ्मय ब्रिटिश राजवटीने दिपून गेलेल्या शिक्षित पिढीच्या डोळ्यात अंजन घालणारे ठरले. त्यांनी स्पष्टपणे म्हटले आहे, 'आम्ही तीन चार हजार वर्षे या देशात नांदलो, एवढाली राज्ये चालविली, कायदेकानू केले, शास्त्रे निर्माण केली, कला उदयास आणल्या, ऐहिक व अध्यात्म विचार केले, ते सर्व या आंग्लभौम मंडळीच्याच जिवावर काय ? (आमच्या देशाची स्थिती).

भारतेन्दु रायसारख्या साहित्यिकाने ब्रिटिश राजवटीविषयी नापसंतीचा सूर काढला. दादाभाई नौरोजी, न्यामूर्ती रानडे यासारख्या नेत्यांनीदेखील राज्यकर्त्यांच्या संस्कृतीचे श्रेष्टत्व मान्य केले होते. पण विष्णुशास्त्री ह्यांनी आपला विचारपिंड इंग्रजी वाघिणीच्या दुधावर समृद्ध करूनही राजवटीचे वाभाडे काढले. शिवाय 'एकंदरीत पाहता आपल्या आतल्या शरीर प्रकृतीस काही धक्का पोहचलेला नाही' असा दिलासा, त्यांनी दिला.

स्वभाषाभिमान जागृतीचे कार्यदेखील त्यांनी यशस्वीपणे पार पाडले. 'मराठी भाषेची सांप्रतची स्थिती' ह्या निबंधमालेतील निबंधातून त्यांनी भाषेच्या न्यूनगंडाने पछाडलेल्या सुशिक्षितवर्गाला 'अमृतातेहि पैंजा' जिंकणाऱ्या मराठीचे अर्थवाही सौंदर्य आवर्जून सांगितले. 'जी भाषा बोलणाऱ्यांनी दिल्ली-अटकेपर्यन्त आपले झेंडे नेऊन लावले, जीत तुकाराम रामदासासारख्या भगवत्परायण साधूंनी आपले श्रुतिवंद्य अर्थ ग्रंथित केले, जीस मुक्तेश्वर, वामन पंडित, मोरोपंत इत्यादी कवींनी आपल्या रसाळ व प्रासादिक वाणीने संस्कृत भाषेचीच प्रौढी आणली, त्या भाषेत आवेश, गांभीर्य व सरसता या गुणांकरिता कोणत्याही अन्य भाषेच्या तोंडाकडे पाहण्याची खास गरज नाही, अशी आमची खात्री आहे.'

आमच्या देशाला काही झाले नाही. फक्त न्यूनगंडाची मरगळ झटकण्याचीच आवश्यकता आहे; आमची भाषा, आमची संस्कृती जेत्यांच्या सस्कृतीपेक्षा कोणत्याही बाबतीत कमी दर्जाची नाही. हे त्यांनी निबंधमालेतून सांगितले आणि त्यासाठी भारतातील स्त्री-पुरुष नररत्नांच्या कर्तृत्वाचे पोवाडे त्यांनी निष्ठेने गायिलेत. प्रत्येक आघाडीवर भारतीयांनी कर्तृत्व गाजविले आहे. व्यास, पाणिनी, आर्यभट्ट, भास्कराचार्य, शंकराचार्य, शिवाजी, यशवंतराव होळकर, महादजी, अहल्याबाई होळकर अशा कितीतरी वीरांच्या वीरगाथेचे संस्मरण त्यांनी केले. स्वदेश, स्वभाषा, स्वसंस्कृती ह्यांना थोडासाही धक्का दिलेला त्यांना सहन होईना. आणि ह्या आत्यंतिक आग्रही राष्ट्रनिष्ठेमुळे त्यांनी कित्येकदा सुधारकांवर निर्गल टीका केली. लोकहितवादी, ज्योतिबा फुले, दयानंद सरस्वती ह्या सुधारकांना त्यामुळेच त्यांनी टीकेचे 'लक्ष्य' बनविले. देशाभिमान हा केवळ निबंधमालेच्याच निर्मितीला आधारभूत असलेला मुख्य स्थायीभाव नसून तो विष्णुशास्त्र्यांच्या संबंध जीवनाचाच प्रेरक भाव होता. आणि त्यामुळे देशाभिमानाला अडसर ठरणाऱ्या विचारांवर त्यांनी आपल्या वाणीने आघात केला.

विष्णुशास्त्री चिपळूणकरांनी वाङ्मयाद्वारे व स्वनिर्मित संस्थांद्वारे राष्ट्रवादाची प्रेरणा शिक्षित पिढीला दिली. 'महाराष्ट्रातील राष्ट्रवादाचा विकास' या ग्रंथात डॉ. नलिनी पंडित म्हणतात, 'राजकीय स्वातंत्र्याची चळवळ म्हण्जे नोकरीधंदा सांभाळून, नेटका प्रपंच करून फावल्या वेळात करण्यासारखी गोष्ट नाही. देशाला ऊर्जितावस्था

आणावयाचो असेल, तर स्वार्थावर पाणी सोडून ख्रिस्ती धर्मोपदेशकाप्रमाणे एकेका कार्यास आजन्म वाहून घेणारे कार्यकर्ते आपण निर्माण केले पाहिजेत, अशी खूणगाठ त्यांनी मनाशी बांधली; आणि स्वत: उदाहरण घालून टिळक-आगरकरांसारखे नि:स्वार्थी ध्येयवादी तरुण आपल्या भूमिकेकडे आकर्षून घेतले.' (पृ.५०) चिपळूणकरांनी सार्वजनिक कार्यासाठी स्वत:ला वाहून घेणाऱ्या कार्यकर्त्यांचे युग निर्माण केले. लोकहितवादींचे विचार पुरोगामी होते. पण आयुष्यात ते एकांडे शिलेदार राहिलेत. चिपळूणकरांनी मात्र आपल्या विचाराने एक पिढी प्रभावित केली. स्वातंत्र्याकांक्षेची भावना महाराष्ट्राच्या सुशिक्षित वर्गात निर्माण केली· अंगीकृत कार्यासाठी चिपळूणकरांना फार मोठा त्याग करावा लागला.

आगरकरांनी कै. चिपळूणकरांवर लिहिलेल्या मृत्युलेखात सांगितले आहे— "कोणी एकदा शास्त्री बुवांना असा प्रश्न केला होता की, तुम्ही हे कसे करू शकता ? अगोदर तुरुंगात एक पाय ठेवून आम्ही देशोन्नतीसाठी आपली लेखणी हाती घेतली असे त्यावर त्यांनी उत्तर दिले." ह्यावरून चिपळूणकरांची जाज्वल्य निष्ठा दिसून येते. आपल्या प्रखर वाणीच्या 'समिधा' करून त्या त्यांनी स्वातंत्र्याचा अग्निकुंड पेटवून त्यात टाकल्यात. आपले बत्तीस वर्षांचे अल्पायुष्य त्यांनी देशाला अर्पण केले. 'न ढळणाऱ्या सूर्यासारख्या ब्रिटिश साम्राज्याला त्यांनी पहिल्यांदा सुरुंग लावला.' त्यांचे कर्तृत्व म्हणूनच अविस्मरणीय आहे.

⊕ ⊕ ⊕

(पृष्ट २४६ वरून)

पणे झाला. आणि काही काळ तंत्र व कला ही एकच आहेत असा समजही उत्पन्न झाला. वाङ्मयाच्या द्वारे जीवनाची विशालता, विविधता व तीव्रता अनुभवायची असते याचा विसर पडून केवळ वैचित्र्य आणि नाविन्य हेच परवलीचे शब्द बनले.

फडक्यांच्या वाङ्मयीन व्यक्तिमत्वाची वैशिष्ट्ये स्थूलमानाने अशी आहेत. सर्वसाधारण माणसाला आपल्या अनुभवाचा स्थलकालनिरपेक्ष व पुन:प्रत्ययाचा आनंद देणे हे त्यांनी आपले कार्य मानले. त्यामुळे त्यात निव्वळ रंजकतेवर व वैचित्र्यावर अकारण भर दिला गेला. आणि त्याची परिणती एक स्वप्नाळू, आभासमय विश्वाची निर्मिती करण्यात झाली. पण त्यातूनही कलेची स्वायत्तता अबाधित राखण्याचा महत्वाचा प्रयत्न झाला. हेच त्यांच्या वाङ्मयविषयक भूमिकेचे यश नि अपयशही !

फडके आज आपल्यात नाहीत. पण त्यांनी साहित्याच्या क्षेत्रात एक विशिष्ट दृष्टी रुजविण्यासाठी केलेल्या कार्याचे कधीच विस्मरण होऊन चालणार नाही.

टिपा

१. ना. सी. फडके **कटाक्ष**, १९७३, पृ. ४८.
२. ना. सी. फडके **गाजलेली भाषणे**, १९४०, पृ. ९६.
३. ना. सी. फडके **प्रतिभासाधन**, ९ वी आ. १९६५, पृ. १५.
४. ना. सी. फडके **गाजलेली भाषणे**, १९४०, पृ. ९६.
५. ना. सी. फडके **गाजलेली भाषणे**, १९४०, पृ. २१–२३.
६. ना. सी. फडके **कस्तुरीची लूट**, १९६०, पृ. १८१.
७. ना. सी. फडके **कटाक्ष**, १९७३, पृ. ५३.
८. ना. सी. फडके : **माझं जीवन एक कादंबरी**, १९६९, पृ. ३७५.
९. ना. सी. फडके **माझं जीवन एक कादंबरी**, १९६९, पृ. ५४५.
१०. ना. सी. फडके : **माझं जीवन एक कादंबरी**, १९६९, पृ. ५४८.

⊕ ⊕ ⊕

प्रयोग या शब्दाचे अनेक अर्थ कोशात दिलेले असून व्यवहारात आणि शास्त्रात हा शब्द अनेक अर्थांमध्ये वापरला जातो. वापर, उपक्रम, उच्चारण, आविष्कार, प्रात्यक्षिक, युक्ती, प्रारंभ, अनुष्ठान, अभिनयदर्शन इत्यादी अनेक अर्थ कोशकारांनी दिले आहेत. वेदात प्रयोग हा शब्द तसेच प्रयुज् हा धातू अनेक ठिकाणी येतो.

प्र युञ्जते प्रयुजस्ते सुवृक्ति । (ऋ. १.१८६.९)यावर सायण भाष्य असे— ते ज्ञातारः सुवृक्ति सुष्टुतीनां प्रयुजः प्रयोगान् प्रयुञ्जते ।

येथे स्तुतींचा प्रयोग करतात म्हणजे उच्चार करतात असा अर्थ आहे. 'प्रयोग' शब्दही पुढील मंत्रात विशेषणस्वरूपात येतो—

द्युभिर्हितं मित्रमिव प्रयोगं प्रत्नमृत्विज-मध्वरस्य जारम् । (ऋ १० ७.५) होत्याच्या वर्णनात आलेल्या या 'प्रयोगम्'चा अर्थ भाष्यकारांनी 'प्रयोक्तव्यम्' म्हणजे 'ज्याची योजना करावयाची तो' असा दिला आहे. खिलपर्वात मेधासूक्तात (४.८.८) प्रयोग शब्द येतो—

"महायशा धारयिष्णुः प्रववता भूयासमस्ये-श्वरया प्रयोगे ।।" शास्त्रग्रंथात विशेषतः व्याकरण-शास्त्रात प्रयोग शब्दाला विशेष महत्त्व आणि अर्थ आहे. त्याठिकाणी हा शब्द 'प्रक्रिया' या शब्दाच्या जोडीने येतो. वर्णांच्या आभ्यन्तर प्रयत्नांचे प्रकार देत असताना विवृत प्रयत्नांसंबंधी असे म्हटले आहे—

विवृतं स्वराणाम् । ऱ्हस्वस्यावर्णस्य प्रयोगे संवृतम् । प्रक्रियादशायां तु विवृतमेव ।[१]

येथे अवर्णाची प्रयोगदशा म्हणजे प्रत्यक्ष उच्चारण आणि प्रक्रिया म्हणजे शास्त्रविनियोग. काशिकावृत्तीत[२] हाच विषय अधिक स्पष्ट केला आहे. तेथे 'प्रक्रिया' या शब्दाऐवजी शास्त्र असा शब्द वापरला आहे—

ऱ्हस्वमवर्णं प्रयोगे संवृतम् । दीर्घप्लुतयोस्तु विवृतत्वम् । तेषां सावर्ण्यप्रसिद्ध्यर्थमकार इह शास्त्रे विवृतः प्रतिज्ञायते । तस्य प्रयोगार्थम् 'अ अ' इति शास्त्रान्ते प्रत्यापत्तिः करिष्यते ।

ऋलृक् सूत्रावरील वृत्तीतही 'प्रयोग' शब्द येतो—

अकारादयो वर्णाः प्रचुरप्रयोगविषयास्तेषां सुज्ञानमुपदेशे प्रयोजनम् । यावरील पदमञ्जरी व्याख्येत 'प्रचुर प्रयोगाविषयी' पुढीलप्रमाणे व्याख्यान केले आहे—

प्रयुज्यते इति प्रयोगः = धात्वादिः, प्रचुरः प्रभूतः प्रयोगो विषयो येषाम् ।

तसेच १.४.२५, २६, २७ या सूत्रांवरील का. वृत्तीतही प्रयोग शब्द येतो.

भीत्रार्थानां भयहेतुः — विभेत्यर्थानां त्रायत्यर्थानां धातूनां प्रयोगे . . .

पराजेरसोढः — परापूर्वस्य जयतेः प्रयोगे . . .

वारणार्थानामिप्सितः — वारणार्थानां धातूनां प्रयोगे . .

या सर्व ठिकाणी त्या धातूंचा प्रत्यक्ष संभाषणात किंवा वाग्व्यवहारात केलेला उच्चार अभिप्रेत आहे. महाभाष्यातही ठिकठिकाणी 'प्रयोग' शब्द येतो. अशी स्थळे खूपच आहेत. लोकतोऽर्थप्रयुक्ते शब्दप्रयोगे शास्त्रेण धर्म नियमो, अप्रयोगः प्रयोगान्यत्वात, प्रयोगे सर्वलोकस्य, शास्त्र-पूर्वके प्रयोगेऽभ्युदयस्तत्तुल्यं वेदशब्देन, या सर्व ठिकाणी भाष्यकारांनी 'शब्दप्रयोगाची' मीमांसा केली आहे. तिसऱ्या आह्निकात एके ठिकाणी 'सर्वस्य वा चेतनावत्त्वात्' (३.१.७.१५) यावरील भाष्यात शब्दप्रयोगामागील मर्म पतंजलींनी सांगितले आहे ते असे—

अर्थगत्यर्थः शब्दप्रयोगः । अर्थं संप्रत्या-ययिष्यमीति शब्दः प्रयुज्यते । तत्रैकेनोक्तत्वात तस्यार्थस्याऽपरस्य प्रयोगेण न भवितव्यम् । किं

कारणम्। 'उक्तार्थानामप्रयोग' इति।

संस्कृत कवींपैकी कालिदासाने प्रयोगाचा उल्लेख नाटचाच्या संदर्भात केला आहे तो महत्त्वाचा आहे--उदा. गणदासाचा मालविकेसंबंधी हा श्लोक--

यद्यत् प्रयोगाविषये भाविकमुपदिश्यते
मया तस्यै।
ततद्विशेष करणात्प्रत्युपदिशतीव मे बाला ।।
।।१.५।।

किंवा 'प्रयोगप्रधानं हि नाटचशास्त्रम्' (अंक १) हे वचन आणि इतरही प्रयोगासंबंधीचे कालिदासाचे उद्गार त्याचे उत्कृष्ट प्रयोगविज्ञानच दर्शवितात.

नाटचशास्त्रात 'प्रयोग' शब्दाला फार महत्त्व आहे. नाटचप्रयोग हा शब्द आता व्यवहारात अत्यंत रूढ झालेला असल्यामुळे त्यामागील पूर्ण नाटच शास्त्रीय संदर्भ, व्याप्ती आणि त्याचा पारिभाषिक अर्थ यांची अपेक्षा न ठेवताही तो आपण सर्रास वापरत असतो. ज्याला इंग्रजीत Performance म्हणतात तोच भरतांना अभिप्रेत असलेला नाटच-प्रयोग. नाटचाचा रंगमंचावरील हा अभिनय-साध्य आविष्कार अनेक गोष्टींच्या योगाने किंवा जोडणीने सिद्ध होत असतो. 'नाटचशास्त्रं प्रवक्ष्यामि' अशी प्रतिज्ञा ग्रंथारंभी करून हेच प्रयोगाचे विज्ञान भरतांनी मांडले आहे.

(१) प्रत्यक्ष प्रयोगार्ह वस्तू म्हणजेच दशरूपकां-पैकी कोणतातरी नाटचप्रकार, (२) प्रयोगाचे शास्त्र म्हणजेच नाटचशास्त्र आणि (३) या लक्ष्य-लक्षणांच्या जोडणीने प्रत्यक्षात नटांच्या द्वारा अभिनीत होणारे लिखित नाटचसंहितेचे प्रकटी-करण अशा तीन्ही अर्थामध्ये प्रयोग हा शब्द अभिनवभारतीत अध्याय १.२२ ते २५ यावरील विवरणात लावून दाखविला आहे.[४] अर्थात् काव्य, शास्त्र किंवा तंत्र आणि रस या तिन्हीचा हा समन्वय आहे. काव्य म्हणजे नाटचाचे पाठच, शास्त्र म्हणजे ते पाठच प्रत्यक्षीकृत करणारा जो अभिनय आणि संगीत (गीत नृत्य-वादित्र) त्यांचे शास्त्र आणि या दोहोंच्या साहाय्याने प्रकटीकरण होत असताना सामाजिकांची रसप्रतीती. प्रयोगाचे हे तीन घटक होत. कवी, नट आणि प्रेक्षक या तिघांच्याही संदर्भात नाटचप्रयोगाचा अन्वय भरतांनी लावला आहे. प्रयोग म्हणजे प्रत्यक्षीकरणाच्या वेळी होणारी ही जोडणीच.

देवांना मनोरंजन हवे होते म्हणून प्रत्यक्ष ब्रह्मदेवाने नाटचवेदाची रचना केली. देवांना दृश्य आणि श्रव्य असे दोन्ही प्रकारचे मनोरंजन हवे होते. तेव्हा ब्रह्मदेवाने ऋग्वेदापासून पाठच, सामवेदापासून गीत, यजुर्वेदातून अभिनय आणि अथर्वापासून रस घेऊन त्यांच्या मेलनाने--जोडणी-नेच हा नाटचवेद निर्मिला. तो आता कोणाला द्यावा असा प्रश्न उपस्थित झाला असता देवादिगण ग्रहण, धारण, ज्ञान आणि प्रयोग या सर्वच बाबतीत अशक्त आहेत असे इंद्राने सांगितल्यामुळे नाटच-कर्मासाठी अयोग्य ठरले. दैत्यांचा प्रश्नच नव्हता. म्हणून वेदगुह्यज्ञ आणि संशितव्रत अशा ऋषीं-नाच तो द्यावा असे ठरले, आणि भरतमुनींना ब्रह्मदेवाने हा नाटचवेद दिला व तू त्याचा 'प्रयोक्ता' हो अशी आज्ञा केली.[५] भरताने आपल्या शंभर पुत्रांना तो नाटचवेद आणि त्याचा प्रयोग तत्त्वतः शिकविला.[५] भरतासारखा संपन्न-परिवार आणि सर्ववित् प्रयोक्ता आणि ब्रह्म-देवासारखा कवी हाही एक प्रकर्षयुक्त योगच।

येथे प्रयोक्ता हा शब्द प्रयोगाचा प्रवर्तक, व्यवस्थापक किंवा दिग्दर्शक या अर्थी येतो. भरताने आपल्या मुलांना नाटचवेद शिकविला याचा अर्थ ज्याच्या त्याच्या शक्तीनुसार त्या त्या भूमिकांच्या ठिकाणी त्या शतपुत्रांची योजना केली.[६] नंतर प्रयोगासाठीच भारत्यादी वृत्तींची, कैशिकीसाठी अप्सरांची, आणि गायनासाठी नारदादींची योजना केली. अशा अनेकविध योजनेने जमवून आणलेला हा प्रयोग घेऊन भरत उपस्थित झाले. नाटचवेदाचे ग्रहण आता परि-पूर्ण झाले होते. 'नाटचस्य ग्रहणं प्राप्तम्' या भरतांच्या वाक्यावर अभिनवगुप्त म्हणतात--

एवं मेलनिकया (मेलनिकायां) नाटचमिदं एकबुद्धिग्राह्यं सम्यक् सम्पन्नमिति बुद्ध्वा... ब्रह्माणमुपस्थितः।

नाटयाच्या सर्व अंगांचे सम्मेलन किंवा मेलनिका करून प्रयोग प्रेक्षणीय करण्याचे कार्य भरतांनी केल्यामुळे त्यांचे प्रयोक्तृत्व सिद्ध झाले.

पुढे मात्र 'प्रयोक्तृ' हा शब्द 'नट' म्हणजे प्रत्यक्ष अभिनेता या अर्थी येतो. २५ व्या सामान्याभिनयावरील अध्यायात आलेला प्रयोक्ता हा शब्द नट याच अर्थी आहे—

एतान् विधींश्चाभिनयस्य सम्यग्विज्ञाय रङ्गे मनुजः प्रयुङ्क्ते ।
स नाटचतत्त्वाभिनयप्रयोक्ता सम्मानमग्र्यं लभते हि लोके ।।२५.१२४।

दिग्दर्शकासाठी भरत 'प्रयोगज्ञ' आणि 'बुध' हे शब्द योजतात—

एवमेते ह्यभिनया वाङ्नेपथ्याङ्गसम्भवाः ।
प्रयोगज्ञेन कर्तव्या नाटके सिद्धिमिच्छता ।। ।। २५.१२५ ।।

एवं कार्यं प्रयोगज्ञैर्भूमिकाविनिवेशनम् ।
स्त्रियो हि स्त्रीगतो भावः पौरुषः पुरुषस्यच ।। २६.१३ ।।

प्रयोगज्ञ शब्दावर भाष्य करताना अभिनव म्हणतात—

स एव हि प्रयोगं जानाति यः प्रयोज्यप्रयोजक स्वरूपवित् । 'बुध' हा शब्दही प्रयोगज्ञ या अर्थीच आला आहे— उदा.

एवं लोकोपचारेण स्वबुद्धिविभवेन च ।
नाटचोपकरणानीह बुधः सम्यक् प्रयोजयेत् ।। ।। २१.२२३ ।।

'प्रयोज्यप्रयोजक स्वरूपविद्' या वरील विशेषणातील 'प्रयोज्य' म्हणजे ती विशिष्ट भूमिका आणि प्रयोजक म्हणजे ती भूमिका वठविणारा नट या दोहोंचे स्वरूप जाणणारा तोच प्रयोजज्ञ किंवा नाटचाचार्य —

सुकुमारप्रयोगो यो राज्ञामामोदसम्भवः ।
श्रृङ्गाररसमासाद्य तन्नारीषु प्रयोजयेत् ।। ।। २६.९ ।।

प्रयोजयेदिति नाटचाचार्यः असे अभिनवगुप्त स्पष्टच म्हणतात. या नाटचाचार्याला असलेल्या भूमिकाभ्यासामुळे तो भूमिकाविकल्पन करू शकतो. भरतांनी ३५ व्या अध्यायात हेच भूमिकांच्या विन्यासाचे तंत्र विस्ताराने मांडले आहे. परंतु प्रथमाध्यायात म्हटल्याप्रमाणे भरताचे नाटचशास्त्र म्हणजे केवळ प्रयोगविज्ञानाचा ग्रंथ नसून, कवी आणि प्रयोक्ता (नट व नाटचाचार्य) या दोहोंसाठी हा उपदेश आहे. आत्रेयादी मुनी भरताला येऊन जे पाच प्रश्न विचारतात त्यावर अभिनवगुप्त म्हणतात—

एवं प्रश्नपञ्चकात् कवि प्रयोक्त्रोरुपदेशपरं शास्त्रमिति लक्ष्यते । १३ व्या अध्यायात लोकधर्मी व नाटचधर्मी यांच्या विषयानुरोधाने भरतांना अनुसरून काव्यभाग आणि प्रयोगभाग असे उघड विभाजन अभिनवांनी केले आहे. 'धर्मी या द्विविधा प्रोक्ता. ' (१३.७०) यावरील भाष्यात अभिनवगुप्त म्हणतात—

'यदा कविर्यथावृत्तवस्तुमात्रं वर्णयति, नटश्च प्रयुङ्क्ते, न तु स्वबुद्धिकृतं रञ्जनावैचित्र्यं, तत्रानुप्रवेशयंस्तदा तावान् स काव्यभागः प्रयोगभागश्च लोकधर्माश्रयः ।'

नाटक (अर्थात् रूपकांचे दहाही प्रकार) हा काव्यबंध आहे हे भरतांनी वारंवार सांगितले आहे. नाटक प्रयोगप्रधान असले तरी त्याचे पाठ्य किंवा संहिता हीदेखील तेवढीच महत्त्वाची आहे. पाठ्य म्हणजे केवळ वाचिक अभिनयाचीच नव्हे तर संपूर्ण प्रयोगाचीच आधारभित्ती आहे. त्यामुळेच पाठ्य सर्वदूर ऐकू जाईल असे नाटचवेश्म असावे असे म्हटले आहे—

प्रेक्षागृहाणां सर्वेषां तस्मान्मध्यममिष्यते ।
यावत्पाठ्यं च गेयं च तत्र श्रव्यतरं भवेत् ।।२.२१ ।।

तसेच अङ्गहारांच्या प्रयोगाच्या विवेचनातदेखील गीतानुसार, म्हणजे गीतातील पदानुसार नृत्त प्रवर्तित व्हावे, तत्सदृश हालचाली व्हाव्यात असे भरत म्हणतात—

गीतप्रयोगमाश्रित्य नृत्तमेतत्प्रवर्त्यताम् ।
प्रायेण ताण्डवविधिर्देवस्तुत्याश्रयो भवेत् ।।४.२६८ ।।

मालविकाग्निमित्रातदेखील मालविका आधी उपगान आणि चतुष्पद वस्तुगान करून नंतर त्या अर्थानुसार अभिनय करते असे वर्णन आहे. (मालविकाग्निमित्रम्–अंक २.४). नृत्य असो वा नाट्य, त्यातील सगळ्या अभिनयाला काव्याचा आधार असतो. नाटक हे प्रत्यक्ष रंगमंचावर अभिनीत केले नसताही, केवळ श्रुतिकास्वरूपात आपण ऐकतो तेव्हा किंवा एकटे वाचतो तेव्हाही हालचाली किंवा मुद्राभिनय यांची मुळीच जोड नसतानाही तो प्रसंग प्रत्यक्षीकृत किंवा साक्षात्कृत करण्याचे सामर्थ्य काव्यात असते. म्हणूनच—

वाचि यत्नस्तु कर्तव्यो नाट्यस्यैषा तनुः स्मृता ।।१४.२ ।।

असे भरत मुनी म्हणतात. एवढेच नव्हे तर वृत्तबद्ध रचनेने हा काव्यबंध सजवावा असेही ते म्हणतात—

एवमेतानि वृत्तानि समानि विषमाणि च ।
नाटकाद्येषु काव्येषु प्रयोक्तव्यानि सूरिभिः
।। १५.१९२ ।।

प्रयोगयोग्यतेबरोबर वाङ्मयगुण येण्यासाठीही नाटककाराचे प्रयत्न असतात कारण प्रयोगेतर अवस्थेत ते पाठ्यसामर्थ्यानेच साक्षात्कृत होत असते. नाटकाची प्रयोगक्षमता म्हणजे काय याची भरताला पूर्ण कल्पना होती. म्हणूनच नाट्याच्या इतिवृत्ताचा विचार करीत असता 'हीन प्रयोग' आणि 'दीप्तप्रयोग' असे प्रकार त्यांनी प्रयोगसाफल्यावरून केले आहेत (अ १९.५४,५५). प्रयोग पडला तरी मूळ काव्य उदात्त असेल तर वाङ्मयीन गुणांच्या दृष्टीने त्याचे श्रेष्ठत्व शिल्लक राहतेच. याचे उत्कृष्ट उदाहरण भवभूतीचे नेहमी देण्यात येते.

प्रयोगज्ञ किंवा नाट्याचार्य प्रयोगाच्या द्वारा अभिनयाच्या माध्यमाने कवीच्या मनातील अर्थाला सामाजिकांपर्यंत नेऊन जोडतो. त्यात वाचिक अभिनय म्हणजे आलाप-प्रलापादी द्वादश भेदांनी युक्त असा वाक्यांच्या उच्चारणाशी संबद्ध अभिनयही आला. जोडणीची ही कल्पना पहिल्या अध्यायातील जग्राह पाठ्यं (१.१७) या कारिकेवरील भाष्यात अभिनवांनी यज्ञ प्रक्रियेतील भिन्नभिन्न वेदमंत्रांच्या संबंधात विशद केली आहे. नाट्यवेदाचे पाठ्य, अभिनय, गीत आणि रस हे चार अंश अनुक्रमे ऋक्, यजुस्, साम व अथर्व यांपासून घेतले असे म्हणण्यामागे भरताच्या मनात नाट्यवेदाला प्रतिष्ठा मिळवून देण्याचाच हेतू होता असे नाही. तर त्या वेदांमध्ये हे नाट्य-गुण खरोखरच होते याचे मार्मिक विश्लेषण अभिनवगुप्त करतात. हा भाग अतिशय महत्वाचा वाटतो कारण त्यामुळे 'प्रयोग' शब्दाचा 'जोडणी' हा अर्थ अधिक पुष्ट होतो. ऋग्वेदमंत्र हे होत्याने म्हणावयाचे त्रैस्वर्यप्रधान असे पाठ्य तर यजुर्वेद हा आध्वर्यव कर्मप्रधान ! अध्वर्यूने करावयाच्या कार्यांमध्ये पाठ्यानुरूप आङ्गिक (अंगकर्म), आहार्य (नेपथ्य वेषभूषेशी संबंधित) आणि सात्त्विक अभिनयाचे दर्शन कसे होते याचे वर्णन करून यज्ञकर्मातील या 'प्रयोगाचे' व अर्थात् नाट्यमूलकतेचे स्वरूप अभिनवांनी स्पष्ट केले आहे—

आध्वर्यव कर्मप्रधाने तु यजुर्वेदऽङ्गकर्मणां प्रदक्षिणगमनादिक्रम एव, लोहितोष्णीषादेर्नेपथ्यस्य, तेषु-तेषु च कर्मसु विशिष्ट प्रयत्नपुरुष सम्पाद्य-मानोपष्टम्भात्मनः सत्त्वस्य सम्भवात् ततोऽभिनयानां ग्रहणम् । (प्रथमाध्याय–१७ अभिनव-भारती)

याठिकाणी प्रयोग शब्दाच्याच संदर्भात वेदवाङ्मयातीलच 'प्रउग' या शब्दाचे स्मरण होते. पूर्वीच दाखविल्याप्रमाणे प्रउग हे महाव्रत-विधीमध्ये होत्याने म्हणावयाचे शस्त्र.[८] तृतीय सवनानंतर सोमरसाचा हविर्भाग देवतेला अर्पण करतेवेळी अध्वर्यू होत्याला हे शस्त्र म्हणावयास सांगतो. अध्वर्यूच्या प्रत्यक्ष क्रियेला, अनुष्टानाला हे गायत्र्यादी भिन्नभिन्न छंदात म्हटले जाणारे शस्त्ररूपी पाठ्य जोडले जाते. म्हणूनच 'प्रउगं (शस्त्रं) कुर्यात्' असा वाक्प्रचार ब्राह्मण-आरण्य-कादी ग्रंथांमध्ये येतो—

गायत्रं प्रउगं कुर्यादित्याहुः, औष्णिहं प्रउगं कुर्यादित्याहुः (ऐ. आ. १.१.३) प्रउगं कुर्यात् आणि प्रयोग करणे यातील ध्वनिसाम्यही लक्षात घेण्यालायक आहे.

प्रउग शब्दाचा दुसरा अर्थ रथाच्या धुरेशी संबंधित आहे. उदा. रथं हिरण्यप्रउगं वहन्तः (ऋ. सवितृसूक्त–१.१.५) रथाला किंवा बैलगाडीला जोडावयाच्या जनावरांच्या मानेवरील आडवे जू ज्या दोन दांड्यांच्या द्वारा त्या गाडीला किंवा रथाला जोडले जाते त्या दोन दांड्यांना प्रउग म्हणतात. या दोन दांड्यांची दोन टोके एका बाजूला दोन बैलांच्या बरोबर मधोमध त्या आडव्या दांड्यावर एकत्र जुळलेली असतात. तर दुसऱ्या बाजूने गाडीच्या खाली दोन चाकांमधील छिद्रांमध्ये फसविलेल्या आडव्या आसाला जोडलेली असतात.[९] अशा रीतीने रथाला जे जोडले जातात त्या अश्वांना वेदात 'प्रयुज' म्हटले आहे—

> यूयं धूर्षु प्रयुजो न रश्मिभिर्ज्योतिष्मन्तो न भासा व्युष्टिषु ।। ऋ१०.७७.५ ।।
>
> आ त्वा हर्यन्त प्रयुजो जनानां रथे वहन्तु हरिशिप्रमिन्द्रम् ।। ऋ १०.९६.१२।।
>
> प्र यद्रथेषु पृषतीरयुग्ध्वं वाजे अद्रिं मरुतो रंहयन्तः ।।ऋ. १.८५.५ ।।

रथाचा एक अवयवरूप असलेले त्रिकोणी आकाराचे हे प्रउग पाहून त्या आकाराचे जे विशेष चयन यज्ञात केले जाऊ लागले त्याला प्रऊगचिती म्हणतात. (प्रउगचितं चिन्वीत पशुकामः). प्रउगचितीच्या या कल्पनेवरून याठिकाणी आणखी एक तर्क करावासा वाटतो. एकूणच नाट्यशास्त्र वेदवाङ्मयाने प्रभावित झाले आहे. नाट्यप्रयोगाचे पाठ्यादी चार अवयव जसे वेदांनी पुरविले तशी या प्रउगचितीवरून नाट्यप्रयोगासाठी उभारल्या जाणाऱ्या नाट्यवेश्माच्या किंवा नाट्यमंडपाच्या त्र्यश्र (त्रिकोणी) रचनेची कल्पना स्फुरली असल्यास नवल नाही.

प्रयोग-प्रउग यांमधील ध्वनिसाम्य एवढेच नव्हे तर दोहोंच्याही मूळाशी असलेल्या युजियोगे या धात्वर्थाचेही साम्य लक्षात घेतल्यास प्रउगचितीचा नाट्याच्या संपूर्ण प्रयोगभूमीशी— म्हणजे रंगपीठापासून तर पुढे त्रिकोणाकाराने विस्तारत जाणाऱ्या प्रेक्षागृहापर्यंत पसरलेल्या प्रयोगभूमीशी काही संबंध असेल काय? लेखाच्या आरंभी म्हटल्याप्रमाणे नाट्यप्रयोगात कवी–नट आणि सामाजिक हे तिघेही अपेक्षित आहेत, या तिघांच्याही जोडणीची ती क्रिया आहे. या तीन कोनांना जोडणारा तोच खरा प्रयोग म्हणजेच प्रकर्षयुक्त योग.

---

१. लघुकौमुदी–संज्ञा प्रकरण–सूत्र–तुल्यास्यप्रयत्नं सवर्णम् ।
२. काशिकावृत्तिः प्रथम अध्याय 'अइउण्' सूत्रावरील वृत्ती.
३. १. प्रयुज्यते इति प्रयोगी दशरूपकम् ।
२. प्रयुज्यते अनेन इति प्रयोगः नाट्यलक्षणशास्त्रम् ।
३. प्रयोगः पर्षदि प्रकटीकरणम् ।
४. श्रुत्वा तु शक्रवचनं मामाहाम्बुजासवः ।
त्वं पुत्रशतसंयुक्तः प्रयोक्तास्य भवानघ ।। ।। १.२४ ।।
५. आज्ञापितो विदित्वाऽहं नाट्यवेदं पितामहात् ।
पुत्रानध्यापयामास प्रयोगं चापि तत्त्वतः ।। १.२५ ।।
६. प्रयोजितं पुत्रशतं यथाभूमि विभागशः ।। १.४० ।।
७. योऽयं भगवता सम्यग् ग्रथितो वेदसम्मितः ।
नाट्यवेदः कथं ब्रह्मन्नुत्पन्नः कस्य वा कृते ।। १.४ ।।
कत्यङ्गः किं प्रमाणश्च प्रयोगश्चास्य कीदृशः ।।१.५ ।।
८. १. वैश्वदेवग्रहणादूर्ध्वं होत्रा शंसनीयं प्रउगनामकं यच्छस्त्रं तद्विषये. .ऐ. आ. १.१.३
२. प्रउगं नाम शस्त्रं होत्रा शंसनीयम् । अग्निष्टोमे प्रातः सवने वहिष्पवमानोत्तरं ऋतुयाजोत्तरं आज्यशस्त्रं भक्षान्तमनुष्ठाय ततःपरं प्रउगं शस्यते । मीमांसाकोषः पृ. २६५२, पञ्चमो भागः ।
३. प्रउग=उक्थ–ता अमुतोऽर्वाच्यो देवतास्तृतीय सवनात् प्रातः सवनभभि प्रायुञ्जत तद यदभिप्रायुञ्जत तत् प्रउगस्य प्रउगत्वम् । कौषीतकी ब्राह्मण ।
९. अत्र प्रउगं नाम शकटस्य वंशद्वयम् । यत् एकतः चक्रद्वयच्छिद्रगत–काष्ठमय–लोहमयान्तर–दण्डमध्ये बध्यते, अपरतश्च युगमध्ये बध्यते । एतादृश प्रयुगाकारं चयनं प्रउगचितम् ।—.
मीमांसाकोषः—पृ. २६५२, पञ्चमो भागः ।

⊕ ⊕ ⊕

गो. बं. देगलूरकर/ **प्राचीन भारतीय लिपिमाला**

जगातल्या इतर देशांतल्याप्रमाणे भारतातही लेखनमाला निर्माण झाल्यावर तीत उत्तरोत्तर वाढ होत गेली. भारतात तर अनेक लिप्या हळूहळू अस्तित्वात आल्या. आणि मौज अशी की प्राचीन इतिहास सांगणाऱ्या या लिप्यांचाच इतिहास कालांतराने लोक विसरून गेले. मध्ययुगात तर परिस्थिती अशी होती की प्राचीन काळच्या ब्राह्मी, खरोष्ठी इत्यादी लिप्यांचा उलगडा करणेही अशक्य प्राय झाले. या परिस्थितीवर प्रकाश टाकणारी एक बोलकी घटनाच नमूद करू या.

फिरोजशहा या तुघलक घराण्याच्या राजाने अशोकाचे लेख असलेले दोन स्तंभ दिल्लीत आणले होते. त्यावरील ब्राह्मी लिपीतील मजकूर त्यावेळी कुणालाच वाचता आला नव्हता. अकबराची त्यावाबतची जिज्ञासाही ते लेख वाचून दाखविणारा कुणी न मिळाल्यामुळे अतृप्तच राहिली. अशा प्रकारच्या अज्ञानाचा दुष्परिणाम असा झाला की अशा पद्धतीच्या लेखांचे ऐतिहासिक महत्त्व न कळल्यामुळे अगणित प्राचीन अवशेष लोकांनी नष्ट करून टाकले.

इसवीच्या १७८४ साली कलकत्त्याला विल्यम जोन्स यांच्या प्रयत्नाने 'एशियाटिक सोसायटी, बंगाल' ही संस्था स्थापन झाली आणि सुशिक्षित समाजाला भारतीय संस्कृती, इतिहास आणि पुरावशेष या सर्वांची गोडी लागली. पुढे जेम्स प्रिन्सेस, चार्ल्स विल्किन्स, पं. राधाकांत शर्मा, यति ज्ञानचंद्र, वाल्टर इलियट, डॉ. मिल आदी विद्वानांनी ब्राह्मी लिपी बहु प्रयत्नाने वाचली व तिच्यापासून गुप्त, कुटिल, नागरी शारदा, बंगाली, तेलगू, कानडी, तमिळ, कलिंग इत्यादी लिप्या निघाल्या असे निदर्शनास आणून दिले. यांपैकी प्रिन्सेप, नॉरिस, कनिंगहॅम या विद्वानांना खरोष्ठी लिपीची वर्णमालाही आकळली.

पुढे ताम्रशिला शासनातील मजकुराचा अभ्यास करण्यासाठी शासनाने स्वतंत्र विभाग उघडला आणि १८८८ मध्ये 'एपिग्राफिया इंडिका' हे इंग्रजी नियतकालिकही सुरू केले. पण या विषयावरील सर्व लेखन मुख्यत: इंग्रजी आणि जर्मन भाषेत आहे. सर्वसामान्य अभ्यासकांना उपयोगी पडेल असा एकही ग्रंथ भारतीय भाषेतून प्रसिद्ध झाला नाही. प्रस्तुत ग्रंथाचे लेखक रायबहादुर पंडित गौरीशंकर हीराचंद ओझा यांनी 'प्राचीन लिपिमाला' या नावाचे एक लहानसेच पुस्तक सन १८९४ मध्ये हिंदीतून प्रसिद्ध केले. या ग्रंथाने विद्यापीठ शिक्षण क्षेत्रात एक प्रकारची क्रांतीच केली असे म्हणावे लागते. कारण या पुस्तकामुळेच कलकत्ता आणि अन्य विद्यापीठांनी एम. ए. च्या अभ्यासक्रमात या विषयाचा अंतर्भाव केला.

पुढे सुमारे पंचवीस वर्षांनी सुधारून वाढविलेली पहिल्या पुस्तकापेक्षा आकाराने तिप्पट असलेली दुसरी आवृत्ती रायबहादुरांनी काढली. हिंदीतच लिहिण्याचा त्यांचा हट्ट असल्यामुळे हा ग्रंथ मुळातून वाचता येण्यासाठी पाश्चात्य विद्वानांनी हिंदी भाषा अवगत करून घेतली हे पाहिले की ग्रंथाच्या महत्त्वावर वेगळे भाष्य करण्याची अर्थातच आवश्यकता उरत नाही.

प्रस्तुत परीक्षणार्थ असलेला ग्रंथ म्हणजे या हिंदी ग्रंथाचा डॉ. लक्ष्मीनारायण भारतीय यांनी केलेला मराठी अनुवाद होय. या अनुवाद ग्रंथाचे प्रारंभी लक्ष्मीनारायणांनी 'ब्राह्मी लिपीच्या प्रवासाचे विहंगमावलोकन (१९१८ ते १९७७)' असा एक लेख देऊन एक मोलाची भर घातलेली आहे. या क्षेत्रातील भांडारकर, सरकार, बी. बी. लाल, महालिंगम्, दीक्षित, एस. आर. राव, वाकणकर इत्यादी अतिरथी महारथींचे म्हणणे

अनुक्रमणिका

प्रतिपादून त्यांनी लिपीसंबंधातली अद्ययावत माहिती करून दिलेली आहे. पण १९७६ साली प्रसिद्ध झालेल्या श्री. श्री. के. गोळेगांवकर यांच्या 'मोहेन्जोदरो: लिपी व समाज' या अमोल ग्रंथाकडे त्यांचे लक्ष गेले नाही असे दिसते. मराठीतील एतद्‌विषयक ग्रंथाकडे दुर्लक्ष व्हायला नको होते असे म्हणावेसे वाटते.

प्रस्तुत अनुवाद-ग्रंथात अर्थातच मूळ ग्रंथाप्रमाणे एकूण चोवीस प्रकरणे आणि चौतीस परिशिष्टे आहेत. लिपिपत्रेही सुमारे पंचाऐंशी आहेत. लेखनकलेच्या प्राचीनतेपासून ते ब्राह्मी व खरोष्ठी लिपींचा उद्‌गम तसेच गुप्त, कुटिल, तमिळ या लिप्यांच्या संबंधातली चर्चा वेगवेगळ्या प्रकरणांतून यात आलेली आहे. त्याचप्रमाणे प्राचीन व नवीन शैलीचे अंक, अक्षरी अंक व आंकड्यांनी अंक दाखविण्याची भारतीय शैली यांचाही सविस्तर विचार यात आलेला आहे. थोडक्यात म्हणजे प्राचीन भारतीय लिपी व अंक यांचा सविस्तर, शास्त्रशुद्ध आणि ऐतिहासिक दृष्टिकोणातून सर्वांगपरिपूर्ण विवेचन करणारा दुसरा ग्रंथ अजूनही उपलब्ध नाही. तेव्हा या परि हाच! अनुवादकाच्या शब्दांत या ग्रंथाचे महत्त्व विशद करता येईल ते असे "ग्रंथ प्रकाशनास आता साठ वर्षे होऊन गेली. त्यानंतर बरेच प्राचीन लेखनावशेष उपलब्ध झाले असले तरी पं. ओझा यांच्या या ग्रंथाचे महत्त्व चिरंतन आहे. उपलब्ध साधनांत पुष्कळ भर आता पडली खरी, पण ओझांच्या रचनेतील लहानसा चिरासुद्धा ढासळला नाही." आता अनुवादासंबंधी थोडेसे :

एखाद्या शास्त्रीय विषयावरील ग्रंथाचे भाषांतर करणे हे वाटते तेवढे सोपे कार्य नाही. पारिभाषिक शब्द, चपखल बसणारे वाक्प्रचार इत्यादी गोष्टींची पुरेशी माहिती भाषांतरकर्त्याला असावी लागतेच पण मूळ ग्रंथातील विवेचनाचा प्रवाहही जसाच्या तसा आणता यावा लागतो. डॉ. लक्ष्मीनारायण यांचे दोन्ही भाषांवर जवळ जवळ सारखेच प्रभुत्व जाणवते. तरीही काही शब्द मराठी वाचकाला खटकतील असे आहेत. उदा. कुशन (कुषाण), सुंग (शुंग) आणि शिलार (शिलाहार) इत्यादी. अनुवादकाने कुठे 'आर्चिऑ-लॉजिकल' (प्रस्ता. पृ. ११) तर कुठे आर्कि-ऑलॉजिकल (प्रस्ता. पृ. ५) असे लिहिले आहे, तेही खटकते. पण हे झाले अगदी किरकोळ दोष. यामुळे ग्रंथाचे मोल (मूल्य भरपूर आहे म्हणून नव्हे!) कमी होत नाही.

साहित्य अकादमी सारख्या शासन-नियंत्रित संस्थांनी अशा स्वरूपाच्या ग्रंथाचे भरमसाट मूल्य न ठेवल्यास भारतीय अभ्यासकांना हा ग्रंथ आवर्जून संग्राह्य करावा असे वाटेल.

प्राचीन भारतीय लिपिमाला

मूळ लेखक : रायबहादुर पंडित गौरीशंकर हीराचंद ओझा.,

अनुवादक : डॉ. लक्ष्मीनारायण भारतीय;

प्रकाशक साहित्य अकादमी, नवी दिल्ली;

प्रथम आवृत्ती, १९७७, पृष्ठे २३+१५२, लिपिचित्रे ८४, मूल्य रु. १३०।-

⊗ ⊗ ⊗

अनुक्रमणिका

प्रदीप भा. विटाळकर / **लोकसाहित्याचे स्वरूप**

'लोकसाहित्याचे स्वरूप' हा डॉ. प्रभाकर मांडे यांचा लोकसाहित्यावर प्रकाशित झालेला दुसरा ग्रंथ आहे. लोकसाहित्याचे मराठीत आजपावेतो संकलन, संपादन आणि प्रकाशन विपुल प्रमाणात झालेले आहे; मात्र शास्त्रीय चर्चेत शिरण्याचा कुणीही विशेष प्रयत्न केला नाही. याला अपवाद फक्त दुर्गाबाई भागवत व डॉ. प्रभाकर मांडे यांचा.

'लोकसाहित्याचे स्वरूप' या ग्रंथाचे अभ्यासाच्या दृष्टीने दोन भाग पाडता येतात. पूर्वार्धात म्हणजे पहिल्या भागात लोकसाहित्याचे विविध प्रश्न हाताळले आहेत. 'लोकसाहित्य' या संज्ञेचे स्पष्टीकरण, लोकसाहित्याची व्याख्या, लोकसाहित्याची उत्पत्ती व निर्मिती, लोकसाहित्याचे प्रयोजन, लोकसाहित्याची व्याप्ती, लोकसाहित्यविषयक अभ्यासाचे विविध संप्रदाय व लोकसाहित्याच्या अध्ययनाच्या विविध पद्धती, लोकसाहित्याचे संकलन आणि लोकसाहित्याचे वर्गीकरण या लोकसाहित्याचे अध्ययन करणाऱ्या अभ्यासकाला निर्माण होणाऱ्या प्रश्नांचे पाश्चात्य लोकसाहित्य–विशारदांच्या मतांचा आधार देऊन विवेचन केलेले आहे. आणि उत्तरार्धात म्हणजे दुसऱ्या भागात लोकसाहित्याचे जी विविध अंगे, उपांगे आहेत त्यांपैकी काही अंगांचा विचार त्यांनी या भागात केलेला आहे. लोककथा, लोकगीते, लोककथागीतें आणि लौकिक गीते या सर्वांचा सर्वांगीण विचार त्यांनी केलेला आहे. हे विवेचन करीत असताना त्यांनी अनेक इंग्रजी व हिंदी संदर्भ–ग्रंथांचा आधार दिला आहे. प्रस्तुत ग्रंथाची सांगता त्यांनी लोकसाहित्य आणि ललित वाङ्मय यांचा परस्पर संबंध दाखवून केलेली आहे. हा या ग्रंथातील अतिशय महत्वाचा भाग होय असे मला वाटते. डॉ. मांडे म्हणतात, "शब्दमाध्यमातून व्यक्त झालेल्या लोकाविष्काराचे आणि ललित वाङ्मयाचे स्वरूप वरकरणी शब्द हेच माध्यम असल्यामुळे सारखेपणा दिसत असला तरी त्यात मात्र भेदही आहेत. . तसेच या दोहोंच्या निर्मितीमागील प्रेरणांमध्येही भेद आहेत. लोकसाहित्य हा समाजजीवनाचा जगण्याचा एक भाग असतो. . .आत्माविष्कार ही ललित वाङ्मयाच्या निर्मितीची प्रेरणा असते. असे जरी असले तरी त्यात काही साम्येही आढळतात. इतकेच नाही तर कथा, नाटक, काव्य या वाङ्मयप्रकारांचा प्रारंभ हा लोकवाङ्मयातच शोधावा लागेल आणि त्यांचे परस्परांशी नातेही आहे. त्यांचे हे परस्परांशी असलेले नाते शोधण्यासाठी ललित वाङ्मयाच्या आस्वादन व आकलनासाठी लोकतत्त्वीय दृष्टीचा अवलंब करावा" याचाही निर्देश करावयास ते विसरले नाहीत. "लोकगीत व व्यक्तिनिर्मित वाङ्मयकृती एकमेकांतून जन्म घेतात त्याचप्रमाणे त्यांच्यावर परस्परांचा प्रभाव पडत असतो" हे त्यांचे चिंतन मूलगामी स्वरूपाचे वाटते.

'लोकसाहित्य' या विषयाला गेल्या १५-२० वर्षांपासून महत्व प्राप्त झालेले आहे. अनेक विद्यापीठांमध्ये यावर संशोधन सुरू आहे. काही विद्यापीठांमध्ये तर 'लोकसाहित्या'चे एक वेगळे अध्यासनही निर्माण झालेले आहे. अशाप्रकारे अत्यंत दुर्लक्षित अशा या विषयाकडे आज अभ्यासकांचे लक्ष वळले आहे. लोकसाहित्याचे स्वरूप विशद करून त्यासंबंधाने निर्माण होणाऱ्या प्रश्नोपप्रश्नांचे निराकरण करणाऱ्या ग्रंथांची नितांत आवश्यकता होती. ही उणीव डॉ. प्रभाकर मांडे यांच्या 'लोकसाहित्याचे स्वरूप' या ग्रंथाने भरून निघाली आहे. या ग्रंथाद्वारे अभ्यासकांना लोकसाहित्याच्या अभ्यासाची निश्चित अशी दिशा मिळते. लोकवाङ्मयाचे जे विविध प्रकार प्रचलित आहेत त्या सर्व प्रकारांची लेखकाने याच पद्धतीने जर ओळख करून दिली असती तर या ग्रंथाचे महत्त्व अधिक वाढले असते.

लोकसाहित्याचे स्वरूप
लेखक : डॉ. प्रभाकर मांडे
परिमल प्रकाशन, औरंगाबाद
किंमत तीस रुपये
पृ. ३३४, १९७८.

⊕ ⊕ ⊕

विलास जाधव / दलित साहित्य : वेदना व विद्रोह

दलित साहित्य वेदना व विद्रोह हे डॉ. भालचंद्र फडके यांचे दलित साहित्याच्या अंगांचा सर्व बाजूंनी परिचय करून देणारे पुस्तक आहे. हा समीक्षात्मक परिचय दलित लेखकांना व दलित साहित्याचा अभ्यास करू ईच्छिणाऱ्यांना निश्चितच लाभदायक ठरेल.

दलित साहित्य हे सामाजिक जाणिवेतून निर्माण झालेले आहे. शतकानुशतके माणुसकीचे हक्क नाकारलेल्या हीनयातीची दुःखे त्यातून उद्रेक पावली आहेत. त्यांनी आजवर जे पाहिले, जे अनुभवले, जे सोसले तेच शब्दरूप घेऊन त्यांच्या साहित्यातून प्रगट झाले आहे. जिवंत रानझऱ्या-प्रमाणे हे साहित्य रसरसलेले आहे. ते खडबडीत आहे पण निसर्गाइतकेच प्रामाणिक आहे. अशा साहित्याचा, त्यातील उणीवांचा, जाणिवांचा त्यामागील प्रेरणांचा शोध घेऊन मराठी सारस्वताच्या या नव्या प्रवाहाचा परामर्श घेण्याचा प्रामाणिक प्रयत्न, हे या समीक्षाग्रंथाचे स्वरूप आहे.

दलित साहित्य म्हणजे काय? इथपासून दलित साहित्याचे भवितव्य, अशा एकंदर ११ प्रकरणांतून फडक्यांनी आपले विचार विशद केले आहेत. "दलित साहित्य 'माणूसकीसाठी' लढणांऱ्याचे साहित्य आहे." "दलित साहित्य हे या देशाच्या मातीतून उदयास आलेले साहित्य आहे". "नव्याने जाग आलेल्या मनाची तीव्र संवेदनशीलता आणि मुक्त भावनाविष्कार या साहित्यात आहे," हे सांगताना वसंत पळशीकर, डॉ. वानखेडे, दया पवार, विद्याधर पुंडलिक, केशव मेश्राम इत्यादींच्या विचारांचा मागोवाही त्यांनी घेतला आहे.

"भावनांचे अधिष्ठान बदलले की नवे अधिष्ठान व्यक्त करणारे साहित्याचे नवे रूप अस्तित्वात येते," असे सांगून फडक्यांनी दलित साहित्याची आपली व्याख्या अधिक व्यापक स्वरूपात मांडली आहे. त्यांच्या मते दलित म्हणजे केवळ विशिष्ट जात, विशिष्ट वर्ग नसून त्यात बौद्ध-अबौद्धांपासून आदिवासींपर्यंत सामाजिक अन्याय, दारिद्र्य, अज्ञान इत्यादींनी ग्रस्त झालेला समाज असून दुष्ट परंपरा, अंधश्रद्धा, दैववाद, गुलामगिरी याविरुद्ध ज्या जाणिवेतून बंडाला उद्युक्त करणारे साहित्य निर्माण झाले आहे ते दलित साहित्य. अशाप्रकारे निर्माण झालेले साहित्य किंवा वाङमय केवळ दलितांसाठी नसून माणूस मोठा मानणाऱ्या सर्वांसाठी आहे. फडक्यांनी दलित साहित्याची केलेली व्याख्या आजचे दलित लेखक मान्य करतील की नाही याची शंकाच आहे.

दलित साहित्यातून व्यक्त होते ती युगानुयुगाची चिरवेदना! या वेदनेचे आदिरूप संत चोखोबांच्या अभंगरचनेत सापडते. 'दलितांच्या वेदनेचे आदिरूप' या प्रकरणात संत चोखोबांच्या शब्दाशब्दांतून दुःख झिरपणाऱ्या अभंगांचा परामर्श घेऊन दलितांच्या वेदनेचे आदिरूप शोधण्याचा प्रयत्न केला आहे, तर विद्रोहाचे आदिरूप 'मातीतून माणूस' निर्माण करणाऱ्या डॉ. आंबेडकरांच्या वाङमयात असल्याचे फडके सांगतात. स्वदेश व स्वजातीसाठी आंबेडकरांनी केलेल्या कार्याचे मूल्यमापन करून मराठी वाङमयेतिहासाने त्यांच्या विचारधनाची उपेक्षा केल्याचे त्यांनी निदर्शनास आणून दिले आहे.

डॉ. आंबेडकर हा दलित साहित्य-निर्मितीचा विराट मंत्र असून दलितांच्या मुक्ति-संग्रामाच्या नव्या पर्वाचा आरंभ करणारे ते एक महापुरुष होऊन गेले. दलितांना आत्मविश्वास, आत्मावलंबन आणि आत्मसन्मानाचा प्रकाश देण्यासाठी बाबासाहेबांनी वृत्तपत्र, शिक्षण संस्था ही बलस्थाने निर्माण केली, इतकेच नाही तर प्रस्थापित

धर्मसुद्धा त्यांनी नाकारला. शतकानुशतकांच्या अस्पृश्यांच्या वेदनेतून निर्माण झालेला विद्रोह त्यांनीच प्रथम जाणीवपूर्वक व्यक्त केला. विद्रोहाची ती ध्वजा हाती घेऊन अनेक दलित लेखक आज पुढे येत आहेत.

विद्रोह, नकार आणि दुःख असे दलित साहित्याचे स्वरूप स्पष्ट करून डॉ. फडक्यांनी भीमराव कुळकर्णी व प्रा. विद्याधर पुंडलिक या दलित साहित्यावर टीका करणाऱ्या समीक्षकांच्या विचारांतील चुकीची दिशा स्पष्ट केली आहे. दलित साहित्यिकांना मार्गदर्शन करताना डॉ. फडके म्हणतात, "दलित साहित्य केवळ सवर्णांच्याच समोर जात राहिले, स्वतःच्या समाजापासून दूर गेले तर ते त्या साहित्याच्या भवितव्याच्या दृष्टीने इष्ट नाही. दलितांच्या दुःखाकडे वेदनांकडे 'परदुःखशीतल' या न्यायाने पाहिले गेल्यामुळे आजपर्यंत या साहित्याचे चित्रण व्हावे तसे झाले नाही. मराठी प्राचीन कवितेची (पंडित कवी व शाहिरी कवी) त्या त्या कवीच्या संकुचित वृत्तीमुळे दलितांचे उपहास व उपरोधपर असे क्षीण व हीन चित्रण पहावयास मिळते.

अलीकडच्या पांढरपेशा लेखकाच्या मनालाही दलित मनाची व्यथा समजायला उशीर झाल्याचे फडके सांगतात. दलितांचे चित्रण ही साहित्यातील फॅशन होऊ नये तर त्या साहित्याने सर्वंकष क्रांतीचा उद्‌घोष करून सामाजिक परिवर्तनाच्या दिशेने वाटचाल केली आहे, हे फडक्यांचे विचार निश्चितच स्वागतार्ह आहेत. दलित लेखकांनी व दलितेतर लेखकांनी याचा सूज्ञपणे विचार करण्याची आवश्यकता आहे.

दलितांची कविता या प्रकरणात किसन फागूपासून नामदेव ढसाळ, नारायण सुर्वे या प्रथितयश कवींच्या काव्यनिर्मितीमागची मूलभूत जाणीव, प्रेरणा आणि स्वरूप समजून घेऊन प्रमुख कवींच्या कवितांचा समीक्षात्मक परामर्शही त्यांनी घेतला आहे. याशिवाय दलित साहित्याची समीक्षा, दलितांची कथा, दलितांची कादंबरी, दलित रंगभूमी या प्रकरणांतही त्या त्या साहित्याचा परिचय करून देऊन समीक्षात्मक परामर्श घेतला आहे. अगदी अखेरच्या प्रकरणात दलित साहित्याचे भवितव्य सांगतांना ते लिहितात, "दलित लेखकाने विभूतिपूजक बनता कामा नये, व्यक्तीपेक्षा विचारांची पूजा बांधली तरच हे साहित्य चैतन्यमय होईल."

दलितांनी जसे लेखक घडवायला पाहिजेत तसेच मातब्बर समीक्षकही घडविले पाहिजेत. समीक्षणासाठी दलित लेखकांना कुणाच्या दारी जाण्याची पाळी येऊ नये किंवा दलित साहित्याची समीक्षा आस्थेने करावी असे सांगण्याची आवश्यकताही पडणार नाही, आपले कुणी कौतुक करावे या भ्रमात न राहता 'स्वयंमेव मृगेंद्रता' या उक्तीप्रमाणे दलितांनी साहित्याच्या दरबारातील राजेपण स्वतःच मिळवायला पाहिजे. फडक्यांच्या विचारांची ही दिशा सुसंगत असून दलित लेखक समजून घेतील अशी अपेक्षा आहे. या समीक्षा-ग्रंथामुळे दलितांना, दलित लेखकांना आपल्या वेदनेला, विद्रोहाला निश्चित दिशा प्राप्त करून घेता येईल, अेवढे मात्र निश्चितपणे सांगण्यास हरकत नाही.

दलित साहित्य : वेदना व विद्रोह.

लेखक : भालचंद्र फडके,

श्री विद्या प्रकाशन, २५० शनिवार पेठ, पुणे-३०. पृष्ठे २२५, किंमत १८ रुपये.

⊕ ⊕ ⊕

मधु जामकर / बुद्धिवाद काही विचार

विनोबा भावे यांनी गोहत्याबंदीचा आदेश महाराष्ट्राच्या मुख्यमंत्र्यांना दिला. या संदर्भात 'महाराष्ट्र टाइम्स'ने कै. सावरकरांचा लेख छापून स्वतःचे मत नोंदविले. श्री. सुधाकर भालेराव यांनी 'कुंडली महात्म्य' या लेखात ज्योतिषशास्त्राचा परखड समाचार घेतला. बुद्धिवादाच्या नावाखाली आपण अनेक पारंपारिक श्रद्धेचे विचार उलट सुलट चिंतनातून बाजूला फेकीत आहोत ही गोष्ट स्वागतार्ह वाटते. परंतु हल्ली बुद्धिवाद तरी समाजात अचूक व रोखठोक पाळला जात आहे का? या प्रश्नाकडे पाहणे आवश्यक आहे. महाराष्ट्रातील बुद्धिवादाची परंपरा फार जुनी आहे. कै. ज्योतिबा फुले, लोकहितवादी, विष्णुशास्त्री चिपळूणकर, आगरकर आणि वि. दा. सावरकर या थोरांनी बुद्धिप्रामाण्यवादी विचारसरणीचे आजन्म आचरण केले. परंतु या थोरांतून जे आज वारसदार पुढे येत आहेत त्यांची सामाजिक कुचंबणा, आर्थिक कुचंबणा व व्यावसायिक कुचंबणा एवढी होत आहे की कोठून आपणास परमेश्वराने बुद्धी दिली यांचा या मंडळींना पश्चात्ताप व्हावा. परिस्थितीच्या गुलामचक्रात सातत्याने गर्क घेत ज्यांचे आयुष्य दुष्ट भोवऱ्यात सापडलेले आहे त्यांना शेवटी विरंगुळा कोणी म्हणून द्यावा?

विसाव्या शतकाच्या नांदीकडे पाहिले असता एका ध्येयधुंदीच्या प्रेरणेने सारा समाज ओढला गेला होता. आयुष्यातील प्राथमिक गरजांभोवतीच घुटमळत राहण्याशिवाय त्या पलीकडे जीवनाचा परिघ व्यापक करण्याकडे त्याला ओढ होती. पारतंत्र्याचे बाळकडू लहानपणीच मिळाल्याने स्वातंत्र्याचा सदोदित ध्यास त्यांच्या नसानसांतून ओसंडत असे. सहाजिकच मिळालेल्या आयुष्याचे सोने व्हावे या उदात्त भावनेने त्याची अविरत धडपड चालत असे. आपल्या वाटचाला आलेला शैक्षणिक संघर्ष हा आयुष्याचे सुवर्णकण तेजःपुंज करण्यासाठी आहे याची या वर्गास सुजाण असल्याने 'रात्रंदिन आम्हा युद्धाचा प्रसंग' या पालुपदातून तो आपली वाटचाल करीत असे. त्यातही पुनः विचार स्वतःच करण्याची तो तितकाच परखडपणे मांडण्याची त्याच्याजवळ कुवत असल्याने तडजोडीचा भाग त्याला कधीच स्पर्श करून जात नसे. मातीमोल जिणे आणि सुवर्णमय ध्येयासक्ती या द्वंद्वातून त्याचे जीवन धनधान्याच्या प्रवाहाने धो धो वहात असे. अशा वेळी बुद्धिप्रामाण्यवाद खऱ्या अर्थाने जिवंत राहताना दिसतो. कसदार बुद्धिमत्ता येथे आपले धारदार वळण अनेक आपत्तींवर मात करून पुढे नेत असते. आपल्या परंपरेचा वारसा हक्क अभिमानाच्या भूमिकेतून ती जगापुढे मांडत असते. येथे राजकीय, सामाजिक, आर्थिक आणि व्यावसायिक थरावरील बुद्धिवाद एकाच तत्वातून सर्वस्पर्शी झालेला असतो. तात्विक मतभेदातूनही एक निरोगी वातावरण दाही दिशांना वावरत असलेले दिसते. या चौफेर बुद्धिवादाने भावनेचा, श्रद्धेचा कधीच अव्हेर केलेला नसतो, उलट त्याची श्रद्धाही आपल्या बौद्धिक पातळीशी समांतरच असते. महाराष्ट्राने एक काळ असा भोगला आहे.

पारतंत्र्यातून आम्ही स्वातंत्र्यकाळात आलो. केवढी ही भाग्याची बाब! असंख्य हुतात्म्यांच्या बलिदानाने आम्हांपुढे सन्मुख असलेले हे अमोल स्वातंत्र्य खऱ्या अर्थाने आम्ही स्वागताने स्वीकारले का? स्वातंत्र्याने आम्हांला लोकशाहीतील व्यक्तिस्वातंत्र्याचा ब्रीदमंत्र दिला. आम्ही तो अर्थावाचून घेतला. राजकीय, सामाजिक, आर्थिक आणि व्यवसायिक स्वातंत्र्य आले. ते सर्व थरातून वहावू लागले. परंतु याच वेळी आम्हा-

एवढे कपाळकरंटे झालो आहोत की आम्हांला तपश्चर्येने अवगत झालेला प्रत्यक्ष परमेश्वर डोळे असून पाहता येत नाही. गंगा नदीचे आंदण घरात यावे आणि आम्ही सारी दारे बंद करुन मुक्त झोपावे यात दैवदुर्विलास कोणाचा आहे? डॉ. आंबेडकरांची बौद्धिक तत्त्वप्रणाली राजकीय स्वातंत्र्यापासून सामाजिक स्वातंत्र्याकडे नेणारी आहे. त्यांचा व्यापक बुद्धिप्रामाण्यवाद त्यांच्या दृष्टीपलीकडे जाऊच शकला नाही. कागदोपत्री सुवाच्य अक्षरात मांडलेला बुद्धिवाद आज ना त्यांचा ना आमचा राहिला नसून मध्येच त्रिशंकूप्रमाणे लोंबकळत आहे. विसाव्या शतकाचा पूर्वार्ध आणि उत्तरार्ध अशा परस्परविरुद्ध ध्रुवांनी व्यापला असल्याने आजच्या बुद्धिवादी वर्गाविषयी सखोल व निश्चित मत देणे धोक्याचे आहे. महानुभावी पंथाचा पुढे पुढे एवढा विपर्यास झाला की त्यातील व्यापक तत्त्वे बाजूला जाऊन 'मानभावी' ही शिवी मात्र शिल्लक राहिली. आज बुद्धिवादाची विटंबणा अशीच होत आहे. बुद्धिवादाने निर्माण केलेली परिस्थिती आणि परिस्थितीच्या दुष्ट चक्रात सापडलेला बुद्धिवाद दोन्ही क्रिया परस्परांना पूरक व विरुद्ध अशाच आहेत.

आजच्या समाजाकडे आम्ही जेव्हा साकल्याने निरखून पाहतो, तेव्हा खरी बुद्धिवादी माणसे किती म्हणून हाताशी येतील बरं! साक्षरतेच्या मोहिमेतून विद्यापीठातील पदवी घेईपर्यंत केलेल्या धडपडीचा निष्कर्ष बुद्धिवाद म्हणून स्वीकारता येईल काय? जेथे समग्र आयुष्यच मुळी बुद्धी गहाण ठेवण्यात खर्चले जात आहे तेथे दोष परिस्थितीला द्यायचा की माणसाला? हे सारेच प्रश्न उत्तर देण्याच्या कक्षेतील असूनही आज तरी अबोल आहेत. एकीकडे आपण समाजाचा गाभा म्हणून बुद्धिवादी वर्गाचा लौकिक करतो व दुसरीकडे याच वर्गाचे मूल्यमापन बुद्धीची कुवत खऱ्या अर्थाने ज्यांच्याजवळ नाही त्यांच्यामार्फत झालेले पाहतो. उदा. घ्यायचे झाले तर शिक्षणक्षेत्राचे घेता येईल. कारण बुद्धिवादाचा भक्ता आजपर्यंत तरी याच क्षेत्राने सांभाळला आहे असा एक गोड समज आहे. शिक्षणक्षेत्राकडे चारी बाजूने पाहिले तरी असे आढळून येईल की ते एका दुष्ट प्रवृत्तीतून मार्ग काढीत आहे. व्यापक शैक्षणिक दृष्टीचा अभाव, ध्येयवादाला मूठमाती तर आदर्शवादाला पूर्णविराम येथे नांदताना दिसतो. या उदात्त तत्वांची जागा राजकारण, वशिलेबाजी व गुलामगिरीची वागणूक या धंदेवाईक गुणांनी घेतली आहे. शैक्षणिक प्रेम इतिहासजमा होऊन अध्ययन व अध्यापनक्षेत्र अधिक अधिक गुतागुंतीचे होत आहे.

कै. चिपळूणकर, लो. टिळक, आगरकर, कर्वे आदी संचालकमंडळींचा आदर्श केवळ पुस्तकांत राहिला असून महाराष्ट्राला एकेकाळी या मंडळींचा शैक्षणिक हातभार होता हे सांगणेदेखील लज्जास्पद झाले आहे. आज समग्र अध्यापकवर्ग जो एकेकाळी समाजाचा 'बौद्धिक कस' म्हणून समजला जात होता तोचमुळी एका अनिष्ट गुलामगिरीत वावरत असल्याने त्याला बुद्धी गहाण ठेवण्याशिवाय गत्यंतर नाही. स्वाभिमान, विद्वत्तेचा परखड विचार, मानाने आयुष्य जगण्याची हमी या साऱ्या गोष्टी विसरून लाचारीस बळी पडावे लागते. एकीकडे संचालकमंडळीकडून बुद्धिवर्गाची ही कुंचबणा तर दुसरीकडे या शिक्षणक्षेत्रात वावरत असलेला संधिसाधू सोयीप्रमाणे बदलू पाहणारा बुद्धिवर्ग व त्याची किळसवाणी जगण्यासाठी असलेली धडपड. जसे बीज तसे फळ या तत्वाने हा बुद्धिवर्ग समाजात वावरत आहे. वस्तुतः या वर्गास बुद्धिवादी का म्हणावे? माझ्या मते या वर्गाची व्याख्या ज्यांच्या बुद्धीविषयी नेहमीच वाद आहे तो बुद्धिवादी अशी केल्यास अधिक योग्य होईल. बुद्धिवादी हा सातत्याने कठोर आत्मचिंतनाने आत्मपरीक्षक झालेला असतो. श्रद्धेचे त्याला जेवढे वावडे नसते तेवढेच त्याला विवेकाचे तारतम्यदेखील असते. बुद्धिवादी व्यवहारापासून कधीच अलिप्त नसतो. त्यालाही 'उदरभरण नोहे जाणिजे यज्ञकर्म' या तत्वाची योग्य ती जाणीव असावी लागते. इतिहासजमा झालेली थोर परंपरा इतिहासाच्या रुक्ष पदव्या

घेऊन थोडीच अवगत करता येईल? अगोदर आडात स्वच्छ पाण्याचा प्रवाह असावा लागतो तेव्हा पोहरा भरण्याची खात्री देता येते. आजच्या शैक्षणिक क्षेत्राविषयी थोडक्यात बोलायचे झाल्यास या नाण्याच्या दोन्ही बाजू पितळी धातूच्या असल्याने त्यातून सुवर्ण म्हणून कसे हाताशी येईल? संचालक वर्ग ना बौद्धिक थरावरचा ना त्या क्षेत्रातील अध्यापक वर्ग बुद्धिमत्तेचा. या क्षेत्राला जे खग्रास ग्रहण लागले आहे ते अद्यापी तरी सुटलेले नाही. कुठे तरी थोडा फार बुद्धिवादी वर्ग असेल त्याची सर्व बाजूंनी निर्भत्सना होत असल्याने बुद्धिवाद औषधालाही शिल्लक राहत नाही. आजच्या समाजातील सुशिक्षित, सुसंस्कृत म्हणवून घेणाऱ्या मंडळींनी संघटित होऊन एकीच्या व खेळीमेळीच्या वैचारिक देवाण घेवाणीतून या अपप्रवृत्ती बाजूला काढणे अगत्याचे आहे. पण संघटना करून उलट सुलट मतांतून एकी साधणे बुद्धिवादी वर्गाला कधीच खपत नाही. प्रत्येकाला स्वतःच्या बुद्धिमत्तेचे सामर्थ्य आहे ते दाखवावे वाटतेच. येथे या गोष्टीचा आपण नेहमीच विचार करावा की प्रत्येकास सामर्थ्याबरोबर काही मर्यादादेखील असतात. स्वतःच्या सामर्थ्य विवेचनातून आपल्या मर्यादा जाणून घेऊन सार्वजनिक हित अवलोकिल्यास ते योग्य नव्हे का? व्यक्तिस्वातंत्र्य, पर्यायाने, बुद्धिस्वातंत्र्य तेच आहे जे इतरांच्या स्वातंत्र्याचा स्वतःच्या जाणिवेतून विचार करते. 'स्व' कडे पाहून 'स्व' ला व्यापक करण्याची सवय आम्ही लावून घेतली पाहिजे. पण आज तरी या उदात्त वाटचालीने बुद्धिवाद जात नाही.

बुद्धिवादास नेहमीच वैज्ञानिक कक्षेने बांधले जाते. आज वैज्ञानिक प्रगती वेगवेगळ्या मार्गाने होत आहे ही जशी आनंदाची बाब आहे तशीच या प्रगतीने मानवी मन श्रद्धेवाचून संकुचित बनत असलेले दिसते. विज्ञानाने प्रथम माणसास 'माणूस' म्हणून जगण्यास शिकवावे 'भस्मासुर' म्हणून त्याने जगू नये. बुद्धिवादी मानव आणि वैज्ञानिक मानव केवळ बुद्धीवर किंवा विज्ञानावरच जगू शकतो अशी एकांगी वृत्ती ठेवणे धोक्याचे आहे. दोघेही 'माणूस' असल्याने व पर्यायाने दोघांनाही 'मन' नावाची चीज असल्याने श्रद्धा-भावना या गोष्टींना डावलून चालणार नाही. परंपरेची अंधश्रद्धा काढून टाकणे याचा अर्थ तिच्यातील 'आंधळेपणा'च बाजूला फेकणे असा आहे. बुद्धिवादी मूर्तिभंजक आहे तो यासाठी की त्याला तेथे नवी मूर्ती स्थापावयाची आहे. म्हणूनच पुराण शास्त्रे दूषण वगळून 'भूषण मात्रे' या नियमाने तपासायची आहेत. आज वैज्ञानिक दृष्टी या समन्वयातून वावरली पाहिजे. परंतु ज्या समाजात बुद्धिवादी वर्गाची भयाण अशी अवहेलना होत आहे त्याच समाजात वैज्ञानिक वर्गाला कोण आपलेसे करील? वस्तुतः हे दोन्ही वर्ग परम्परांना पूरक असल्याने त्यांच्या द्वंद्वास अलग करणे कठीण आहे. आज समाजाच्या एका दुष्ट चक्रातून वावरताना आपण पाहतो त्यात या दोन्ही वर्गाला कुठले स्थान मिळाले आहे, मिळत आहे याच्या परिशीलनातून आपल्या हाताशी काय येते याचा ताटस्थ्याने विचार करणे महत्वाचे वाटते.

मर्ढेकरी कवितेतून येणारी 'उगीचता' आणि 'जीव पैशाला पासरी' या तत्त्वाचा पुरस्कार सातत्याने आजच्या समाज आदर्श म्हणून पुढे ठेवत असल्याने आज बुद्धी नसलेला वर्ग एका अर्थाने सुखी वाटतो. परंतु या समाजात ज्याला खरो-खरीच बुद्धी नाही असा वर्ग आहे तरी काय याचा शोध घेतला पाहिजे. प्रत्येकास आपल्या कुवती-प्रमाणे बुद्धिमत्तेचा अंश हा असतोच. प्रश्न आहे तो प्रमाणाचा. अस्तित्वाचा नव्हे. ज्याप्रमाणे दारू पिल्याने शरीरातील सर्व विचार कुंठित होऊन मनुष्य एकाच नशेत आत्ममग्न होतो त्याप्रमाणे समाजातल्या सार्वजनिक गुलामगिरीपायी माणसाची बुद्धिमत्ता कुंठित होऊन तो एका वेगळ्या आत्ममग्नतेत आपला धुंद आहे. आत्मपरीक्षणा-तून ही धुंदी परवडणारी आहे का? बुद्धी नसणे हे भाग्यवंताचे लक्षण पण असलेली बुद्धी इतरांकडे गहाण ठेवणे हे कपाळकरंटयाचे लक्षण आहे.

याचा वारंवार विचार समस्त बुद्धिवादी वर्गाने करणे हिताचे आहे. आज आपण एका मोक्याच्या ठिकाणी उभे असल्याने वळणावर सिंहावलोकन करण्याची गरज आली आहे. निरीक्षण, आत्मपरीक्षण यातूनच आत्मसंरक्षण प्राप्त होईल. बुद्धिवाद्याच्या बुद्धीबद्दल उलटसुलट वाद निर्माण करून हा प्रश्न प्रश्न सुटणारा नाही. बुद्धिवादी वर्गास आग्रह मान्य असावा पण तो दुराग्रही नसावा. त्याची भूमिका तडजोडीची नसावी पण तिला समन्वय मान्य असावा. आपले नाणे बावनकशी आहे या आत्मविश्वासातून तिने कठोर परीक्षणाची सवय स्वतःस जडवून घ्यावी. कै. चिपळूणकर, आगरकर आणि सावरकर या थोर महात्म्यांचा अखेर बुद्धिप्रामाण्यवाद त्यांच्या अवती भोवती असलेल्या परिस्थितीचा परिपाक होताच ना? मग आजच्या परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर आम्ही बुद्धिवादाची परंपरा मान्य करताना आपल्या भोवती का पाहू नये?

समाजाची सर्वांगीण प्रगती खऱ्या बुद्धिवादी वर्गाच्या प्रगतीवरच अवलंबून असते. याचाच अर्थ बुद्धिवादी हा समाजाचा एक अंगभूत घटक आहे. आपल्या विद्वत्तेचे किते याच समाजातून त्याला गिरवावे लागतात. अशा वेळी 'दिव्याखाली अंधार' ही अपप्रवृत्ती निर्माण होण्याचा धोका भरपूर असतो. समस्त बुद्धिवाद्यांची शोकांतिका यामुळेच होते. आज तरी समाजात काचेच्या घरात राहणारी मंडळी इतरांच्या घरावर दगडफेक करताना दिसतात. स्वतःबद्दल विसर पडणे, किंवा सोयीप्रमाणे आंधळे होणे या प्रक्रियांनी आजचा बुद्धिवाद स्वतः बरोबर इतरांनाही दुष्ट प्रवृत्तीकडे ओढत आहे. खरे म्हटल्यास न पचलेला, अर्धवट कच्च्या अशा बुद्धिवादाने ही मंडळी वावरत असल्याने त्यांची अशी कुचंबणा होत आहे. केशवसुतांनी 'नरेच केला हीन किती नर' या सूत्रात माणसाची दुष्ट प्रवृत्ती सांगितली तर 'देव दानव वांनरे निर्मिले, या सूत्रात त्याची खरी हिंमत गौरविली आहे. केशवसुतांना प्रसंगाचे, आपल्या परिस्थितीचे भान होते म्हणून त्यांचा पृथ्वी आणि स्वर्ग यांना सांधणारा समन्वयवाद खऱ्या बुद्धिवादी जनतेच आदर्शवाद झाला. दुसऱ्या केशवसुतानेदेखील आपल्या अवती भवती चिंतनमग्न होऊन याच बुद्धिवादाचा पुरस्कार केला. आज बुद्धिवादी वर्गापुढे समस्या आहे ती समजून देण्याची नसून समजून घेण्याची आहे. शिक्षणक्षेत्रात द्रोणाचार्यांचा भरणा भरपूर होत आहे. एकलव्य मात्र दिवसेन्दिवस नाममात्र दिसू लागतात. एकमेकांना दोष देणे या प्रवृत्तीने दोष खड्याप्रमाणे बाजूला काढावे. अर्थात यालाही ताकद लागते. बुद्धिवादीवर्ग जेव्हा स्वतःकडे बुद्धीचा मक्ता घेऊन "सिनिक्' बनतो तेव्हा वेळीच त्याला भानावर आणले पाहिजे. अन्यथा समाजाने त्याला अंकूश दिल्यावर त्याने रागावू नये. कारण बुद्धीचा दर्प हा अभिमानाच्या गोंडस थराने अहंकाराकडे झेप घेताना दिसतो. यातून समाजातून तो अलगद फेकला जातो. आजच्या समाजात केवळ ही 'फेकाफेकी' चाललेली दिसते. सत्तेची धुंदी जशी उलटणारी तशीच बुद्धीची धुंदीदेखील उलटणारीच आहे. आजच्या धक्काधक्कीच्या जीवनात कोण बुद्धिवादी आहे याचा अंदाज कोणी द्यावा? कारण बुद्धी ही चीज नेहमीच पारखून घ्यायची आहे. म्हणून 'वाद' बाजूला ठेवून बुद्धीशी पिंजण घेत इतिहासाची पोपटपंची करण्याऐवजी त्याचे मूल्य जाणून, मापन करणे सर्वार्थाने हितावह आहे.

⊕ ⊕ ⊕

अनुक्रमणिका

म. शं. वावगावकर / वि. त्र्यं. शेटे यांची साहित्यसेवा–राजकीय समस्यांची चिंतनसुधा

श्री. दादासाहेब शेटे हे अनेकानेक सामाजिक व सांस्कृतिक संस्थांचे आधारस्तंभ व त्या क्षेत्रातील एक क्रियाशील अग्रणी म्हणून विख्यात आहेत. त्याचवेळी ते एक प्रवुद्ध राजकीय विचारवंत व प्राच्यविद्येपासून तो इतिहास, साहित्य व तत्त्वज्ञान अशा अनेक विषयांत अवगाहन करणारे एक व्यासंगी विद्वानही आहेत हे त्यांच्या 'स्वातंत्र्योत्तर राजकीय समस्या' व 'चिंतनसुधा' ह्या दोन नव्या ग्रंथांवरून प्रतीत होते.

'स्वातंत्र्योत्तर राजकीय समस्या' हा १९४७ ते १९६३ ह्या काळात महाराष्ट्र, प्रवुद्ध भारत, माधुरी इत्यादी नियतकालिकांत वेळोवेळी लिहिलेल्या लेखांचा संग्रह. ह्या चोवीस लेखांतून राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय घटितांमागील अंत:प्रवाहांचे विश्लेषण व त्यांच्या संभाव्य परिणामांची मीमांसा येते. जागरुक राजकीय औत्सुक्यातून निपजलेल्या ह्या विचारमंथनामागे असलेली लेखकाची देशहिताची जिवंत कळकळ ह्या लेखनातून सर्वत्र जाणवत राहते. 'भारताच्या प्राचीन संस्कृतीवरील प्रेमामुळेही भारताचे राजकारण हे लेखकाच्या प्रेमाचे व भक्तीचे लक्ष्य वनले' हे लेखकाचे 'मनोगत' बोलके आहे. एका सुवुद्ध नागरिकाचे संवेदनक्षम, जागरुक मन अवतीभवतीच्या राजकीय घटना घडामोडीविषयी केवळ देशहिताच्या जिव्हाळ्यापोटी किती मूलगामी, तलस्पर्शी व जिवंत प्रतिक्रिया व्यक्त करू शकते ह्याचा सुखद प्रत्यय ह्या ग्रंथात सर्वत्र येतो. त्यातही 'भारतापुढील यक्षसमस्या', 'सामर्थ्यसंपन्न राष्ट्राचे चतुरंगदल' व 'भारताचे भवितव्य' ह्या लेखांतून लेखकाची देशहिताची कळकळ व त्याची वैचारिक वैठक ही विशेषत्वाने दिसतात.

कृत्रिम भौगोलिक ऐक्याऐवजी हव्या असलेल्या अंत:स्फूर्त सामाजिक ऐक्याची मीमांसा करताना लेखक म्हणतो, 'समान विचारसरणींनी व राष्ट्रीय आकांक्षांच्या स्वप्नांनी भारावलेला हा समाज नसल्याने व त्यामुळे त्याच्या प्रेरणाही समान नसल्यामुळे आपले सामाजिक वळ विस्कळित झाले आहे. भौगोलिक फाळणी सन १९४७ मध्ये झाली. त्यापेक्षाही ही लोकांच्या मनाची फाळणी होत आहे हे फार वाईट आहे. आज दलित, पीडित व मागासलेल्या अशा लोकांना या देशाविषयी प्रेम वाटावे अशी त्यांना आपण वागणूक देत नाही'. 'पाश्चात्य राष्ट्रात यंत्रयुग निर्माण होऊन संपत्तीचे अफाट केन्द्रीकरण झाल्याने त्याविरुद्ध कम्युनिस्टांच्या रूपाने प्रतिकाररुपी आविष्कार स्वाभाविक होता. येथे मात्र औद्योगिक युगाची अरुण पहाटही झाली नसताना कम्युनिस्टांचा कोंवडा मात्र आरवला आहे; व वर्गविग्रहलढ्याचा त्यांचा पवित्राही सामाजिक विघटनेत भर घालणारा ठरत आहे.' म्हणून 'प्राचीन तत्त्वपरंपरेतून व अस्मितेतून सुसूत्रपणे निघालेली व आधुनिक यांत्रिक युगातील आर्थिक समतेच्या समस्यांची उकल करणारी व मानवाच्या स्वयंप्रज्ञ वुद्धीला व भावनेला त्यात स्थान असलेली अशी अभिनव विचारप्रणाली निघून तीविषयी सर्वांना जिव्हाळा वाटल्याखेरीज आपला सामाजिक ऐक्याचा प्रश्न सुटणार नाही' असे सांगून 'काही उच्च आध्यात्मिक अशा परोक्षवादी ज्ञानाचा धागा समाजात सतत गुंफत ठेवला नाही तर केवळ आर्थिक सुवत्तेच्या पायावर आधारलेले राष्ट्र व समाज म्हणजे युद्धास प्रोत्साहन देणारे असे ते एक यंत्र वनून ते पृथ्वीची धूळधाण करील. असा उच्च भावनात्मक अध्यात्मवादी दृष्टिकोनाचा धागा

अनुक्रमणिका

पुरविण्याचे कार्य हिंदूंनी आज सहस्रोसहस्र वर्षे केले आहे व तेच पुनः या नव्या युगातील स्वतंत्र बुद्धिवादी विचारवंतांनी करावे' असे आवाहन लेखक करतो. 'सामर्थ्यसंपन्न राष्ट्राचे चतुरंग दल' या लेखातही सुसज्य सेना, आर्थिक सुसंपन्नता, सामाजिक ऐक्य आणि परराष्ट्रीय राजनीती ह्या चतुरंग दलांपैकी आर्थिक प्रश्न व परराष्ट्र-राजनीती ह्या दोहोंकडेच पं. नेहरूंनी अधिक लक्ष पुरविल्याने सैन्य व संरक्षण आणि सामाजिक सुसंघटना यांकडे तेवढे लक्ष न पुरविल्याने राष्ट्रीय सामर्थ्यात राहून गेलेला उणेपणा लेखक दाखवितो. १९६१ साली प्रकाशित झालेल्या ह्या लेखात दक्षिण आशियातील व आग्नेय आशियातील लहान लहान राष्ट्रांचे स्वातंत्र्य व परराष्ट्रीय धोरण यांची जपणूक करण्यासाठी भारताने त्या राष्ट्रांना राजनैतिक आक्रमकांपासून दूर राखण्यास झटले पाहिजे असे लेखक म्हणतो तेव्हा व्हिएत-नामवर चीन ने केलेले (ज्यामुळे भारताचे परराष्ट्र मंत्री आपला चीन दौरा मध्येच संपवून मायदेशी परतले) ताजे आक्रमण आठवून लेखकाचे द्रष्टेपण एकदम जाणवून जाते. याच लेखात 'दक्षिण व आग्नेय आशियातील जनसमूहांच्या समान आकांक्षा व ध्येय आणि राजकीय आर्थिक व सामाजिक विचारप्रणाली एका पातळीवर आण-ण्यात भारतातील राजकीय विचारवंत जितके लवकर यशस्वी होतील तितके भारताचे परराष्ट्रीय धोरण यशस्वी होईल' असा निर्वाळा लेखकाने दिला आहे.

लेखकाचा असाच द्रष्टेपणा 'भारताचे भवितव्य' हा ह्या ग्रंथाचा शेखरीभूत कळसाध्याय शोभणाऱ्या शेवटच्या लेखातही दिसतो. 'या देशात सुसंस्कृतपणा व राजकीय शहाणपण परिपक्व अवस्थेत अद्याप पोचलेले नाही. एखादा गट वा पक्ष हिकमतीने सत्तेवर येऊन मनमानी कारभार करण्याची शक्यता नाकारता येत नाही. अशा वेळी 'न्यायालये व वृत्तपत्रे' यांच्यावर मोठी जबाबदारी पडते. आणीबाणीचे अंधारयुग येण्याच्या कितीतरी आधी लेखकाने हे लिहिले होते! राजकीय भवितव्याचा अचूक वेध घेऊ शकणारी त्याची पक्व राजकीय मीमांसाबुद्धी येथे दिसते. "आमच्या सर्व राजकीय संस्था पाश्चात्यां-च्या हुबेहूब नकला करीत आहेत, त्यामुळे सर्व-साधारण माणसाला अद्याप या सर्व बौद्धिक व राजकीय यंत्रणेबद्दल सहानुभूती वाटत नाही. भारतात धारदार बुद्धिमत्तेची जुनी परंपरा आहे. वैशिष्ट्यपूर्ण अस्मिता आहे. काही लोभनीय सांस्कृतिक परंपरा आहे, त्याशी सुसंगत परंतु आधुनिक युगातील विविध क्षेत्रातील प्रगतीची, कल्पनांची व विचारांची दखल घेऊन व त्यांना सामावून घेऊन आपली म्हणून काही विचार परंपरा, ध्येयवाद व त्या अंमलात आणणाऱ्या व सर्वांना न्याय देणाऱ्या संस्था भारतात यापुढे निर्माण होतील." वर्तमानाचे विश्लेषण व भविष्या-चा वेध यांतून निष्पन्न होणारा ह्या ग्रंथाचा हा इत्यर्थ होय. लेखकाच्या ह्या अभिमताशी कुणीही सुबुद्ध वाचक सहजच सहमत होईल. पण प्राचीन परंपरेच्या वारशाचे भान व वर्तमानकालीन नव्या युगसमस्यांचे समाधान ह्यांची सांगड घालणारी तत्त्वप्रणाली व तिचे आचरण प्रत्यक्षात उतरविणे हीच भारतापुढील खरी यक्षसमस्या आहे असे म्हणावेसे वाटते! भारतातील अनेक समस्या त्याही काळी अस्तित्वात असल्याने दीड दशका-पूर्वीचे हे लेखन असले तरी आजही ते शिळे वाटत नाही. अगदी न. चिं. केळकरांइतके लालित्य नसले तरी जटिल राजकीय समस्या सामान्यांनाही सुगम करून सांगण्याची लेखकाची सरळ, सुस्पष्ट व प्रवाही वक्तृत्वसंपन्न शैलीदार हातोटी हृदयंगम आहे.

स्वातंत्र्योत्तर राजकीय समस्या, वि. त्र्यं. शेटे; दास्ताने रामचंद्र आणि कं., ४५६, रविवार, फडके हौद, पुणे-२, पृ. १८४. मूल्य २० रु.

⊕ ⊕ ⊕

(१)

'काजळरात' हा प्रतिमा पैं या गोम्मतकीय तरुण कवयित्रीचा पहिलाच कवितासंग्रह. विशीच्या वेशीत उभ्या असलेल्या या मुलीच्या कवितांचे वडीलधारेपणाने नुसते कौतुक करणे : पाठ थोपटचा-सुरात तिच्यासंबंधी उत्तेजनपर काही लिहिणे हा तिच्या कवितेवर अन्याय होईल असे मला वाटते. कारण आयुष्याच्या उंबरठ्यावर उभ्या असलेल्या या कवयित्रीने आणि तिच्या कवितेने भल्या-भल्यांना कधी उशीरा जागवणारी / कधी कधीच न जागवणारी 'आत्म्याची काळी रात्र' (Dark night of the soul) जागून आणि जगून पाहिली आहे, याच्या काजळखुणा, तिच्या कवितेत उमटल्या आहेत. 'रात्र काळी घागर काळी' ही विष्णुदास नाम्याची 'काळी विराणी' आपल्याबरोबर काळी यमुनाजळे घेऊन आणि बुंथी-बिलवरादी काळी साज लेवून या कवितेच्या रूपाने जणू आपल्यापुढे उभी आहे.

प्रतिमाच्या कवितासंग्रहाचे हे परीक्षण नव्हे म्हणजे रूढ अर्थाने परीक्षण नव्हे. परीक्षणाच्या सदरात 'खपावे' असे नुसते एक टिपण ! व्यथा, वेदना, दुःख, अश्रू-आसवे, अंधार-काळोख हे तिच्या कवितेत वारंवार येणारे शब्द नाहीत. ते तिच्या अनुभवांचे कोरीव 'आकार' आहेत. ह्यात 'अंधार' हा शब्द ती क्वचितच वापरते उदाहरणार्थ,

> म्हणूनच ही अंधाराची अक्षरे घेऊन
> निसटते क्षण गुंफून
> मन कविता गाळू पहाते
> अंधार-यात्रिकाच्या पाऊलांची . . .

पण 'काळोख' मात्र सर्वत्र वापरलेला . . . तोही 'गच्च', 'दाट' असा. 'अंधार' आणि 'काळोख' यांतील अर्थच्छटांमधील अंतर प्रतिमाला एवढ्यात जाणवले असेल तर तेही लक्षणीयच म्हणावे लागेल. हे अंतर शब्दकोशाने नव्हे, तर मन:कोशानेच भावते.

> इथे पैल नाही व्यथेला कुणाच्या
> उभा ऐल गाण्यातुनी भंगता

अशा प्रकाशगर्भ ओळींची दिवेलागण करणारी ही 'काजळरात' क्वचित पहाटेची प्रतीक्षा करताना दिसते. 'पहाटेल' मधील या ओळी पाहा :—

> कुठल्यातरी क्षणी
> कुठेतरी अचानक
> पहांटेल.

त्याहीपेक्षा 'याद' मधील—

> आतां भरूं भरूं ये
> काळोख गच्च दाट
> तोलून घेतलेली
> प्राणांत मी पहांट . . .

या ओळी मला विलक्षण समर्थ वाटतात.

पण याचा अर्थ पहाट झालीच पाहिजे असा आहे काय ? काळोखामध्ये प्राणात तोलून घेतलेली पहाट 'फुटली'च पाहिजे असे नाही. जन्मभर ती प्राणातच तोलून घेत कवितेने काळोखाचे हुंकार देत राहणे हीही एक साधनाच आहे. पहाट 'फुटली' फुटू द्यावी. नाही. फुटली तर निष्ठेने 'उरीं' फुटावे' ! काळोख ह्याच जन्माचा सोबती असेल तर कोणी त्याच्याशी बेइमानी करू नये. काळोखाची गाणी हीसुद्धा इमानाने गायिली तर अखेर त्या तेजाच्या आरत्या ठरत असतात. 'अळंग', 'निळंग' सारख्या खास शब्दांनाही 'प्रतिमे' चे रूप देणाऱ्या प्रतिमेने वाजवीहून अधिक प्रतिमेच्या प्रेमात पडू नये ही मनापासूनची इच्छा 'इशारा' देणे (किंवा करणे) मला कधीच जमले नाही धोक्याचा लाल कंदील तर मी कधीच कुणाला (स्वत:लाही) दाखवलेला नाही.

(२)

अण्णाजी बोवडे हे नाव आणि त्यांचे व्यक्तिमत्व यांच्याकडे फार फार वर्षांपूर्वी माडखोलकरांच्या 'माझे आवडते लेखक' या पुस्तकाने लक्ष वेधल्याचे मला आठवते. अण्णाजींच्या संग्रहाच्या दुसऱ्या आवृत्तीच्या निमित्ताने त्यांची कविता नजरेखालून घातली.

कवितेच्या खऱ्याखुऱ्या अभ्यासकाने आस्वादकाने विस्मृतप्राय कवी आणि त्यांची कविता यांचे 'प्रसंगी' वाचन-मनन केले पाहिजे अशी माझी धारणा आहे. एखाद्या भाषेतील आपल्या डोळ्यांपुढे समग्र रूपात उभी राहणारी कविता ही काही एखाद्या दुसऱ्या किंवा मूठभर कवींची(च) निर्मिती नसते. एका अर्थाने ती एक सामूहिक (Collective) निर्मिती असते.

प्रमुख (Major) कवी आणि गौण (Minor) कवी अशी कवींची 'फळणी' करण्याची प्रथा असली तरी तिच्यातून फार मोठ्या गफलती झाल्याची उदाहरणे कुठल्याही भाषेच्या काव्येतिहासात आढळण्यासारखी आहेत. 'प्रमुख' असा मान्यतेचा शिक्का मारल्या गेलेल्या कवींची काही रचना त्यांना 'गौण' ठरवावी अशी असते तर 'गौण' हा छाप बसलेल्या कवींची काही कविता तेवढ्यापुरती त्यांना 'प्रमुख' कवी ठरवावे अशा योग्यतेची असते. कवितेच्या अभ्यासकाने/आस्वादकाने कवीच्या। कवितेच्या शोधात असावे 'शिक्केमारी'च्या नादात नसावे.

अण्णाजी बोवडे यांची वरीचशी कविता 'अनुकरण' या स्वरूपाची असली तरी त्यांच्या काही कवितांचे 'स्वतंत्रपण' ध्यानी घेतले तर नंतरच्या इतर 'प्रमुख (?) कवींना ती 'अनुकरणीय' सुद्धा वाटली असावी असे मानावयास जागा आहे.

अण्णाजींची 'जोगीण' ही कविता माडगूळकरांच्या 'जोगिया' शेजारी ठेवून पाहावी. (वाङ्मयचौर्याची उदाहरणे उत्साहाने दाखवणारी 'मनोहर' पद्धत माझ्याजवळ नाही!) हे वाङ्मयचौर्य नव्हे हे मी स्पष्ट करतो. पण अण्णाजींच्या ('सौभाग्यवती') 'जोगीण' व्यक्त करीत असलेली अनन्यसाधारण असा समर्पणभाव माडगूळकरांच्या ('अखंड सौभाग्यवती') 'जोगिया-' मध्ये आहे. माडगूळकरांनी अण्णाजींची कविता वाचलेली असो नसो, दोघींची जात ('कुळी' भिन्न असली तरी!) एक आहे.

अण्णाजींच्या लावण्यांचे ('नारी तरुणाची संपदा,' 'नको ग मारुंस मुरके', 'पिकली कवळी कळि चाफ्याची', आणि 'छुम छुम् छनछन पैंजण वाजति')—मराठी लावणीच्या संदर्भातील मोल लक्षणीय आहे. मराठीतील 'लावणी' ही इतिहास-जमा चीज नव्हे; ती एक 'वर्तमान' घटना आहे. पुन्हा माडगूळकर - खेबूडकर या अलीकडच्या। आजच्या लावणीकारांचा पूर्वावतार म्हणून अण्णाजी बोवडे यांच्याकडे बोट दाखवायलाच हवे. हीच गोष्ट अण्णाजींच्या पोवाड्यांची.

अरे! आला कवी! आता धावा!
धांवा पळा लपा!
पाठीराखे स्मरा! किंवा रामरक्षा तरी जपा!

या पंक्ती असलेली 'महाकवि व अरसिक' ही अण्णाजींची कविता 'झेंडूच्या फुलां'तील आद्य 'खोबरें'च ठरावी! एतिहासिकदृष्ट्या (उगीचच विसरल्या गेलेल्या) अण्णाजींच्या कवितेचे महत्त्व चित्य आहे. काही 'चितातुर जंतूं'ना ते 'चिंता-जनक' वाटण्याचाही संभव आहे!!

---

१. काजळरात प्रतिमा पै, सागर साहित्य प्रकाशन ८७; पणजी १९७८, मूल्य रुपये ६.

२. कै. श्रीनिवास नारायण ऊर्फ अण्णा बोवडे यांची कविता, आवृत्ती दुसरी, दिनकर वामन चितळे, नागपूर, १९७५.

⊕ ⊕ ⊕

कविता

चित्रा पांढरकर / आलेख

मनाच्या तळमहालातून निळी तहान
तशी;
चांदवेड्या लाडक्या स्वप्नांची गाणी
आकाशभोरली गळ्यातून
कळीकळीने मेंदीभिजल्या खुणा त्याही
कोंबांचे अलवार लेणे लेऊन
आलटून पालटून गात गेल्यात
कुसुंबती पहाट आणि पंखांचा निळा पक्षी
ओथंबलेल्या प्रकाशातून प्रकाशाची गच्च गाठ
सवयीने चिवचिमण्या चिवचिवल्या झुंजूमुंजू चोचींनी
स्पर्शपालवीतून अशी अनिवार बंदीश
मृद्‌गंधांनी रुमझुमलास ओठ घेऊन
अन् आलेखांनी मीही शिरशिरले. . .
सवंधशी.

चित्रा पांढरकर / अंगअंग मोगरा

निशीगंधी देठांचे स्वप्न पापण्यांनी ओथंबून
किसलयी स्पर्शांमधून झनझनून
तुझे असे फुलांच्या गर्भात खुणा वेचणे
निळी डूब येऊन अंगअंग मोगरा
महापूर गंधकोषांचे कळे झिरमिळून उठतात
तळव्यांशी मेंदी मंथून असते इथेतिथे
घुमटांच्या चांदणी ऋजुतेसाठी
रात्र होऊन यावी अन् माझीही
तुझे परागी डोळे डोळाभर
असे अन मस्त गाफील आभाळ.

जयश्री कुळकर्णी / आठवंत झाडा ?

आटलेल्या पाण्याच्या
काळ्या सावल्या—
मुळांमुळांतून हलत होत्या,
आठवतं झाडा ?

तरीही भिजलेल्या आशेचा दिमाख
तू पानांपानांतून उधळला होतास
चंद्र ढगाच्या नौकेत वसून,
आभाळप्रवास करीत होता.
अन आकाश पाण्यात हात सोडून,
तारकामासे कुरवाळत होता.
जख्मी पक्षाच्या—
एकाच पंखातील,
प्राण कसा धडपडत होता ?
आठवतं झाडा ?

थकून शेवटी—
तो तुझ्याच—
पानांच्या कुशीत शिरला होता.
काळोख रात्रीच्या शुष्क अंधारात
मी इथंच आले होते.
तुझ्या आशेचा पोपटी कण घेऊन
जगात पुन्हा गेले होते
आठवतं झाडा ?
तेव्हांपासून.
तुझी माझी दोस्ती आहे.
या वारशावरच—
रहस्यं काही
अजूनही खोलायची आहेत.

प्र. ल. कर्णिक / तेव्हां पाहूया

आता आपले पटेल असं वाटत नाही
तूही उंची मोजायला लागलीस
मीही मैलांच्या दगडाकडे कटाक्षाने पाहू लागलो
आपली भेट होईल असंही वाटत नाही आता
आणि समजा झालीच
तर—
उंची जेव्हा मैलात मोजतील तेव्हाच होईल. . .
तेव्हा पाहूया आपले पटते का ?

सूर्यकांत भावल / **वेळूच्या बनातून**

वेळूच्या बनातून सुसाट वहाणाऱ्या वाऱ्याने
तिला शीळ घातली तेव्हा
तिचं अंगअंग शहारलं
बावरल्या हरिणीसारखी
अनामिक संकोचाने
ती परसात धावली
आपल्या मोगऱ्याकडे, पारिजातकाकडे
जास्वंदीकडे.
पण प्रत्येकाची चोरटी नजर
तिला बोचू लागली,
असहाय्यपणे ती खूप रडली
अखेर जीवाच्या आकान्ताने
तिचा विवस्त्र, निराकार देह
बनाच्या दिशेने निघून गेला
आता जेव्हा वेळूच्या बनातून शीळ येते
तेव्हा तेव्हा तिचा प्रतिसाद ऐकू येतो.

सुषमा श्रीधर देशपांडे / **रेषा**

कवितेच्या भानगडीत पडू नये !
त्यापेक्षा एक सरळ रेषा ओढावी
तिच्यात अर्थ शोधीत बसावे.
ती अंहकारी पण बुद्धिमान असते.
इकडे तिकडे बघत नाही
सारखी पुढेच जात असते.
कठोर अशी की अडथळा उल्लंघून
उद्दामपणे पुढे सरकते.
तिच्या मार्गात येऊ नये.
कधी रेषा मागमोडी काढावी
कुठे बोचरे, कुठे लयदार वळण
मोहवणारी, खुणावणारी. पण
फशी पाडणारी कुर्रेबाज असते
तिच्या नादी लागू नये.
वर्तुळ आपले बरे असते
सगळीकडून सारखे असते
आतले आत, बाहेरचे बाहेर
स्वत:तच मश्गुल असते.
त्याला डिस्टर्ब करू नये.

मीनाक्षी कुळकर्णी / **घरटे**

बांधू नकोस घरटे ह्या अंगणात वेड्या
घेऊन जा परंतू ह्या दोन चार काड्या
उरली न ज्यात शक्ती, तुटलेत पंख माझे
घे उंच तू भरारी, आकाश सर्व तुझे
जाशील तू कुठेही, ठेवी जपून काड्या
आधार हाच अंती, वाटेत आज वेड्या
जरी कालचक्र फिरले, उलटे कधी चुकून
जरी एकलाच उरला, आलास वा थकून
उरणार मी न तेव्हा, तुज बाळ हात छाया
असतील ह्याच तेव्हा, तुज फक्त साथ छाया

प्र. ल. कर्णिक / **एका संध्याकाळी**

एका भिन्न संध्याकाळी
तो तिला देत होता पटवून
की ही संध्याकाळ आपली नाहीच म्हणून.
समोर भरलेला समुद्र परतताना
तिने त्याला असंख्य प्रश्न केले.
वाळूत खोल रुतत जावे
तसा तो त्या प्रश्नांत गुंतला
आणि त्यालाही ती संध्याकाळ आपलीच वाटू लागली.

रंजना विगम / **एकांत**

समुद्र नाहीच इथे
फक्त सूर्यास्त होतो आहे
माझे सगळेच प्रियकर मनात
थोडे थोडे भरून राहिले आहेत
रानात पानगळ सुरू आहे
पायवाट दिसतेय अस्पष्ट
पिवळ्यागार पाचोळ्यांनी किंचित
झाकलेली
डोळ्यात पाणी झरताहे
अल-अल्लद
पण सोडवत नाही मला
इथला जीवघेणा एकांत
मला गुंतवून काळोख होतोय !

नंदकुमार शेंडगे / **मांजरपंजे**

तू उगारलेले मांजरपंजे हरेकवेळी झेलत आलो काळजावर
तू फेकलेले दु:ख सारे मनाच्याही मनांत विपासारखे रुतलेले
पचवत आलो त्याचे जहर—

अशा वाटचालाच आलेल्या निवडुंग रात्री गेली सोलत
आणि रक्ताळल्या आयुष्याच्या साऱ्याच वाटा काजळी फेकत
तू मारीतच राहिलास सूर्यफणा त्वेषाने दिवसांचे कोष फोडत
माझे अस्तित्व चिरत गेले खरे; त्याने—

एखाद्या भुकेल्या सिंहाने पिंजऱ्यातल्या गुलामाला खेळवावे; तसा खेळ
पहात राहिलास टाळ्या पिटीत पीठावर निर्दयी राजाच्या करारीपणाने—

कत्तलखाने उभारलेल्या चंगेजखानाच्या चेहऱ्यावर
उठली असती एखादी पश्चात्तापाची मुग्धरेघ कदाचित
पण तुझ्या डोळ्यांतून फुलारलेले विषारी निखारे
विझता विझलेच नाहीत—

माझ्या अस्तित्वाच्या अणुगर्भातिल पोकळीत लाल लाल पुंजक्याचा
एक ढग शब्दांना जुळवत चाललाय पसरत
आत आत. .आता गलबलत आहेत साऱ्या संवेदना
त्यातून वीजेसारखे नुसते लोळ...माझ्या धमन्यांना चेतवित
कोसळत आहेत आसमंतात
उन्हाच्या झाडावर तुला हँग करायला ही कविता सज्ज आहेच
वेदनेचा गळफास अंथरून.
खाली ये !

⊗ ⊗ ⊗

फॉर्म—४

"युगवाणी" मासिकासंबंधी माहिती

१. प्रकाशन स्थळ	विदर्भ साहित्य संघ, झांशी राणी चौक, नागपूर-१२.
२. प्रसिद्धीचा नियतकाल	मासिक परंतु जोड अंक निघतात.
३. मुद्रकाचे नांव, राष्ट्रीयत्व व पत्ता	क. मा. सावंत, भारतीय, व्यवस्थापक, नागपूर विद्यापीठ मुद्रणालय, नागपूर.
४. प्रकाशकाचे नांव, राष्ट्रीयत्व व पत्ता	गो. स. देहाडराय, भारतीय, सरचिटणीस, वि. सा. संघ, झांशी राणी चौक, नागपूर-१२.
५. संपादकाचे नांव, राष्ट्रीयत्व व पत्ता	डॉ. वि. वा. प्रभुदेसाई, भारतीय, वि. सा. संघ, झांशी राणी चौक, नागपूर-१२.
६. वृत्तपत्राची मालकी	विदर्भ साहित्य संघ, नागपूर-१२.

मी, गोपाळ सदाशिव देहाडराय, सरचिटणीस, विदर्भ साहित्य संघ, जाहीर करतो की वर दिलेली माहिती माझ्या माहितीप्रमाणे व समजुतीप्रमाणे संपूर्णतः खरी आहे.

गो. स. देहाडराय
प्रकाशक,
सरचिटणीस, वि. सा. संघ, नागपूर.

अनुक्रमणिका

विदर्भ साहित्य संघ

(कार्यवृत्त २१-१२-१९७८ ते २८-२-१९७९)

गो. स. देहाडराय, सरचिटणीस

१. कार्यालय व्यवस्थापन :

१.१ दि. ३१-१२-७८ ला कार्यकारी मंडळाची सभा केंद्रीय कार्यालयात झाली. धनवटे रंग-मंदिराच्या एअर कुलींगच्या कामासंबंधी झालेल्या कामाची माहिती देण्यात आली. मागील सभेपासून झालेल्या जमाखर्चाची माहिती देण्यात आली. बजेटपेक्षा जास्त झालेल्या खर्चावर मान्यता देण्यात आली. नवरगाव व पुलगाव ह्या शाखांना मान्यता देण्यात आली. सौ. शुभदा आगलावे यांना "नाटकाकर **कोल्हटकर-गडकरी : स्त्रीचित्रणे**" या विषयावर लिहिलेल्या प्रबंधासाठी साहित्याचार्य ही उपाधी व कै. मामा वरेरकर स्मृतिपुरस्कार रु. १०१।- देण्यासाठी मंजुरी देण्यात आली.

२. आजीव सभासद

२.१ (१) सौ. कुळकर्णी शालिनीबाई कमलाकर गोंदिया (२) श्री. मामीडवार रमेश. आर. चंद्रपूर

३. मराठी साहित्य महामंडळ

३.१ दि. ५, ६, ७-१-७९ ला अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे ५३ वे अधिवेशन, चंद्रपूर येथे प्रा. वा. कृ. चोरघडे यांच्या अध्यक्षतेखाली, मोठ्या थाटाने साजरे करण्यात आले. त्याच वेळी महा-मंडळाची सभा दि. ५ जानेवारीला आलेल्या ठरावांवर व इतर बाबींचा विचार करण्यासाठी चंद्रपूर येथे घेण्यात आली.

४. स्मृतिदिन व जयंती

४.१ दि. १२-१-७९ श्री. अनंतराव शेवडे, संपादक, नागपूर टाईम्स् यांच्या अंत्ययात्राप्रसंगी वि. सा. संघ व म. सा. महामंडळातर्फे पुष्पमाला अर्पण करण्यात आली.

४.२ दि. २३-१-७९ राम गणेश गडकरी स्मृतिदिनानिमित्य डॉ. द. भि. कुळकर्णी यांच्या हस्ते छाया-चित्राला हार घालण्यात आला. त्याच प्रसंगी श्री. शिवाजी संदर्भ ग्रंथालयातर्फे 'गडकरी वाङमय दर्शन' हे गडकऱ्यांच्या ग्रंथांचे प्रदर्शन श्री. चंद्रकांत कुळकर्णी यांनी ग्रंथालयात आयोजित केले होते.

४.३ दि. ३०-१-७९ महात्मा गांधी यांच्या छायाचित्राला हार घालण्यात आला.

५. सांस्कृतिक कार्यक्रम

५.१ दि. २५-१२-७८ ५३ वे अ. भा. म. साहित्य संमेलनाचे नियोजित अध्यक्ष प्रा. वामनराव चोरघडे यांचा शाल व श्रीफळ देऊन डॉ. मधुकर आप्टीकर यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

अनुक्रमणिका

प्रा. श्रीधर शनवारे, कवि आ. रा. देशपांडे (अनिल), डॉ. वसंत वऱ्हाडपांडे, व श्री. अनंत अडावतकर यांची त्या प्रसंगी गौरवपर भाषणे झाली.

५.२ १३–१–७९ व १४–१–७९ वर्धापन दिन समारंभ

संघाच्या ५६ व्या वर्धापन दिन–समारंभाचे उद्‌घाटन दि. १३ रोजी 'तरुण भारत'चे संपादक आमदार श्री. मा. गो. वैद्य यांच्या हस्ते झाले. त्यानंतर सौ. सुनीती आफळे, सौ. आशा बगे, सौ. संजीवनी देशमुख, श्री. वसंत निगवेकर, श्री. वसंत चिंचाळकर व श्री. बाजीराव पाटील यांच्या कथाकथनाचा बहारदार कार्यक्रम झाला. रविवार दि. १४–१–७९ ला सायंकाळी, १९७८ मध्ये मराठी विषयात पी. एच्‌डी. मिळालेल्यांचा शाल व श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला. याच समयी सौ. शुभदा आगलावे यांना 'साहित्याचार्य" पदवी मिळाल्याबद्दल सत्कार करण्यात येऊन, कै. मामा वरेरकर स्मृति पारितोषिक रोख रु. १०१।- देण्यात आले. या नंतर संगीत सभेचा कार्यक्रम झाला. त्यामध्ये श्री. नानासाहेब देशपांडे, रांची, कु. ललिता फडणवीस, सौ. उषा धारप, व कु. विद्या हस्तक ह्यांनी भाग घेतला होता. तबल्याची साथ श्री. जाधव यांनी केली व हार्मोनियमवर श्री. श्रीराम सप्रे होते. तिळगूळवितरणानंतर कार्यक्रम संपला.

५.३ २६–१–७९ ला गणराज्य दिनानिमित्य डॉ. मधुकर आष्टीकर यांच्या हस्ते झेंडावंदनाचा कार्यक्रम झाला. त्याच दिवशी सायंकाळी ६.३० वाजता गडकरी सभागृहामध्ये 'युवापथ' संस्थेच्या सहकार्याने ग्रामीण कविसंमेलनाचा कार्यक्रम झाला. संयोजन श्री. जेमिनी कडू यांनी केले होते. अमरावती, खामगाव, अकोला, बोरीअरब, यवतमाळ, मेहकर, मोर्शी आदी गावांच्या सर्वश्री शंकर बडे, भगवान उग, माधुरी देशमुख, सुरेश गांजरे, वसंत वाहोकर, मीनाक्षी कुळकर्णी, मनोहर परिमल, सुखदेव ढाणके, नलिनी देशपांडे, हरीश गाडगे, सुभाष सावरकर, शिवा इंगोले, बबन सराडकर, भोलीनाथ सुर्यवंशी, श्रीमती सुषमा देशपांडे, आणि सुनिता झाडे या नवकवींनी यात भाग घेतला होता.

५.४ **नारदीय कीर्तने** श्री. प्र. वा. मोकाशी व त्यांच्या कुटुंबियांनी महाराष्ट्र बँक ट्रस्ट निधीतून २ नारदीय कीर्तने झाली. दि. २८–२–७९ रोजी कु. वसुधा मोडक व दि. १–३–७९ रोजी प्रा. घोंगे यांनी कीर्तन केले.

५.५ विदर्भ साहित्य संघ ग्रंथ प्रकाशन योजना

विदर्भ साहित्य संघाच्या ग्रंथ प्रकाशन योजनेंतर्गत आलेल्या कथांचा निकाल—

प्रथम क्रमांक सौ. सुनिति आफळे, नागपूर

कथा— १. सौदा,

२. हार,

३. ओटी.

दुसरा क्रमांक : सौ. आशा बगे, हिंगणघाट

कथा— १. विन चेहऱ्याची माणसे

घरटं

तिसरा क्रमांक : रमेश ललगुणकर

कथा— १. उन्हाई विदाम–तेन किंवा अटळ,

२. स्फुल्लिंग.

चवथा क्रमांक : १. अरविंद विश्वनाथ कुळकर्णी
कथा—तृतीय सावली,
२. वसंत चिचाळकर
कथा—रावे

कथांचे परीक्षक डॉ. इंदुमती शेवडे व श्री. भा. र. आठवले हे होते. याशिवाय काही उल्लेखनीय म्हणून ठरलेल्या कथा निवडल्या आहेत.

६. चित्रकला

६.१ भारतीय शिक्षण मंडळाच्या नवयुग विद्यालय, हनुमान नगर विद्यार्थ्यांच्या चित्रकृतीचे एक प्रदर्शन वि. सा. संघाच्या सहकार्याने कला दालनात दि. १२ ते १७ जाने., १९७९ ला भरविण्यात आले. प्रदर्शनाचे उद्घाटन डॉ. मधुकर आष्टीकर यांनी केले. चित्रकार भाऊ समर्थ यांनी या समयी भरलेल्या सभेत मार्गदर्शन केले. अध्यक्षस्थानी आमदार मा. गो. वैद्य, संपादक 'तरुण भारत' हे होते. प्रदर्शनाला उत्तम प्रतिसाद मिळाला.

६.२ दि. २१–१–७९ चित्रकार श्री. डिखोले महाराष्ट्र कला मंदिर, यांनी संघाच्या कला दालनात "तैल" ह्या माध्यमातून प्रात्यक्षिक आयोजित करण्यात आले.

६.३ दि. ११–२–७९ चित्रकार श्री. धनंजय वर्मा ह्यानी (Portrait) चे प्रात्यक्षिक करून दाखवले.

६.४ दि. १८–२–७९ कै. नलिनी जतकर शालेय स्पर्धा— सौ. कुसुम डोकस यांनी त्यांच्या बहिणीच्या स्मृति प्रीत्यर्थ दिलेल्या देणगीतून, नागपुरातील शाळेतील बाल चित्रकारांची एक स्पर्धा घेण्यात आली. ह्या स्पर्धेमध्ये १५ शाळांनी भाग घेतला होता. प्रत्येक शाळेतील ५ विद्यार्थी याप्रमाणे स्पर्धेस प्रतिसाद मिळाला. स्पर्धेची पारितोषिके पुढीलप्रमाणे घोषित करण्यात आली :—

फिरती ढाल नवयुग विद्यालय, हनुमान नगर, नागपूर

वैयक्तिक पारितोषिके

पहिले पारितोषिक— राजकुमार जैस्वाल, सेन्ट जोन्स हायस्कूल, मोहन नगर, नागपूर ह्या विद्यार्थ्याने पटकाविले.

दुसरे पारितोषिक— अशोक वाडेकर, नवयुग विद्यालय, हनुमाननगर, नागपूर ह्या विद्यार्थ्यास मिळाले.

तिसरे पारितोषिक— कु. शुभांगी सराफ, नवयुग विद्यालयाची विद्यार्थिनी हिला मिळाले.

चवथे पारितोषिक— राजेश नेरकर, नवयुग विद्यालय, नागपूर ह्या विद्यार्थ्यास मिळाले.

आणि **पाचवे पारितोषिक**—निरंजन मनोहरराव पावगी, धरमपेठ माध्यमिक शाळा, उत्तर अंबाझरी मार्ग ह्या विद्यार्थ्यास मिळाले.

परीक्षक म्हणून डॉ. श्रीकांत दाभाडे, प्रा. धनंजय वर्मा आणि प्रा. प्रकाश कावळे ह्यांनी काम पाहिले.

ह्या स्पर्धेचे संयोजन सौ. कमल आंबेकर ह्यांनी केले.

७. नाटयसमिती

७.१ कै. पद्‌माकर डावरे एकांकिका स्पर्धा जाने., १९ ते २७ पर्यंत धनवटे रंगमंदिरात घेण्यात आल्या यावर्षी एकंदर ३४ एकांकिचे अर्ज आले, त्यापैकी ३० एकांकिका सादर करण्यात आल्या. यावर्षी नागपूर शिवाय, अकोला, गोंदिया अमरावती, वर्धा येथील संस्थांनी पण भाग घेतला होता. एकांकिकेचे संयोजन सौ. कमल आंबेकर यांनी केले. एकांकिकेचे परीक्षक श्री. आनंद जोग, श्री नागेश देशमुख व सौ. आष्टीकर हे होते. श्री. राजीव रत्नपारखी यांनी त्यांचे वडिलांच्या प्रीत्यर्थ रु. १५१/- ची देणगी बक्षीसासाठी दिले. एकांकिका स्पर्धा निकाल खालीलप्रमाणे आहे. बक्षिस समारंभ अॅडव्होकेट मनोहर यांच्या हस्ते दि. २८–१–७९ ला करण्यात आला. बक्षिस समारंभानंतर सुभाषमंडळाने विनोदी एकांकिका सादरकेली. याच वेळी श्री. नागेश देशमुख यांनी आपल्या आईच्या कै. कमलाबाई स्मृति प्रीत्यर्थ ५१ रु. पारितोषिक दिग्दशकासाठी व जो दिग्दर्शक स्वतः कामामध्ये ६० टक्याहून अधिक गुण मिळवेल अशासाठीं जाहीर केले. सौ. आष्टीकर यांनी 'सावली हरविलेली' मधील म्हाताऱ्याच्या भूमिकेला २१ रु. रोख पारितोषिक दिले.

१. प्रथम क्रमांक— कै. पद्माकर डावरे फिरती ढाल व रु. १५१/- चे रोख पारितोषिक सुभाष मंडळ या संस्थेस –"अंधारवाडा"– ह्या एकांकिकेस.

२. द्वितीय क्रमांक— रु. १०१/- चे रोख पारितोषिक– धरमपेठ महाविद्यालय– "एका म्हाताऱ्याचा खून"– ह्या एकांकिकेस.

३. तृतीय क्रमांक— रु. ५१/- चे रोख परितोषिक मुक्तिवाहिनी— "विद्रोहाचे पाणी पेटले आहे" ह्या एकांकिकेस.

४. उत्तेजनार्थ प्रशस्तिपत्र –रंजन कला मंदिर– "अस्पर्श"– ह्या एकांकिकेस.

५. वैयक्तिक अभिनयासाठी प्रथम पारितोषिक रु. २५/- रोख – "अनिल कुळकर्णी" – भूमिका – "दाजी"– मर्चंट ऑफ आर्ट– ह्या एकांकिकेस.

६. वैयक्तिक अभिनयासाठी –द्वितीय पारितोषिक रु. १५/- रोख –"निलकान्त कुलसंगे"– भूमिका –"दाई"– विद्रोहाचे पाणी पेटले आहे.

७. अभिनयाचे प्रशस्तिपत्र— "विवेक भगाडे" –भूमिका– "जाड्या"– आर फार रेंगिंग–

८. अभिनयाचे प्रशस्तिपत्र— "संजय कोलते" –भूमिका –"तरुण"– प्रॉम्प्टींग–

९. वैयक्तिक अभिनय प्रथम पारितोपिक रु. २५/- रोख –"कु. वसुधा देसाई"– भूमिका –"ज्युली"– अस्पर्श – ह्या एकांकिकेस.

१०. वैयक्तिक अभिनय द्वितीय पारितोपिक रु. १५/- रोख –"कु. स्मिता पराडकर"– भूमिका– "नयना"– अंधारवाडा– एकांकिका.

११. अभिनयाचे प्रशस्तिपत्र— "कु. सुनीती मोहरील" –भूमिका– "अरुंधती"– कोळचाचं जाळ

१२. अभिनयाचे प्रशस्तिपत्र– "सौ. भुरके"– भूमिका – "दाओमा" मास्क– एकांकिका

१३. दिग्दर्शनाचे प्रथम पारितोपिक— रु. ५१/- रोख– "श्री. महेश पातुरकर"– एकांकिका– "अंधारवाडा" – सुभाष मंडळ ह्या संस्थेस.

१४. दिग्दर्शनाचे द्वितीय पारितोपिक— रु. २५।- रोख– "प्रा. शिरीष देशपांडे" – एकांकिका– "एका म्हाताऱ्याचा खून" – धरमपेठ महाविद्यालय.

अनुक्रमणिका

१५. दिग्दर्शनाचे प्रशस्तिपत्र— "सुनील जोशी" व "शारंग अभ्यंकर"– एकांकिका – आर फॉर रॅगिंग– नवरंग ह्या संस्थेस.

१६. लेखनाचे प्रथम पारितोषिक रु. ५१।- रोख – "पराग धोंगे"–रॅगिंग ह्या एकांकिकेस" – "स्नेहदीप"

१७. लेखनाचे प्रशस्तिपत्र–"अरविंद कुळकर्णी"– "सावली" हरवलेली ह्या एकांकिकेस – "प्रयोग– अकोला.

१८. फणसाळकर पारितोषिक रु. ५१।- रोख– "इसिकांत नारनवरे" – विद्रोहाचे पाणी पेटले आहे. ह्या एकांकिकेस.

८. परीक्षा समिती :— (प्रतिवृत्त)

ऑगस्ट, १९७८ आणि जानेवारी १९७९ या दोन्ही सत्रात मिळून एकूण ६०२+३६०२= ४२०३ परीक्षार्थी सम्मीलीत झाले. १९७७–७८ या वर्षी ही संख्या २५६२ असून तीत १६४१ ने वाढ झाली आहे.

गत वर्षीचे उत्पन्न रु. ११५८१-०५ तर या वर्षी सुमारे रु. १७६९८ गत वर्षीचा व्यय रु. १४७६३ तर या वर्षी सुमारे रु. १८२०८.

या वर्षी ७६ केन्द्रांत परीक्षा घेण्यात आली. मुंबई, नांदेड, गोवा इ. ठिकाणी केन्द्रे असून गतवर्षीपेक्षा २५ नवी केन्द्रे यावर्षी सुरू करण्यात आली आहेत. प्रतिसत्रात प्रत्येक परीक्षेत सर्व प्रथम येणाऱ्या परीक्षार्थ्यांस रोख पारितोषिक आणि सर्वाधिक परीक्षार्थी व परीक्षा शुल्क पाठविणाऱ्या केन्द्रांना पुरस्कार प्रदान करण्यात आला.

दि. १८–३–७९ रोजी समितीचा वासंतिक प्रमाणपत्र व पारितोषिक वितरण समारंभ नागपूर विद्यापीठाचे कुलसचिव श्री. बलराज अहेर यांच्या हस्ते संपन्न झाला.

पारितोषिक प्राप्तकर्ते द्वितीय सत्र १९७९

अनु.	परीक्षा	विद्यार्थी	केन्द्र	रक्कम रुपये
शासकीय				
१.	मराठी प्राज्ञ	श्री. श्यामसुंदर चम्पालालजी गुप्ता	शासकीय परीक्षा केन्द्र नागपूर	२५।-
विद्यालयीन				
२.	मराठी प्रवेश	कैलास दाजीबा पाटील कु. प्रेमला नारायणराव नरंगले	आंध्र समिती तेलगू हायस्कूल, नांदेड	५।-
३.	मराठी परिचय	शैलेन्द्रकुमार रामानंद वर्मा	मराठी भाषा प्रचार केन्द्र, नागराकटगी	५।-
४	मराठीबोध	महमद नजीरS/oमहमद अमीन	आंध्र समिती तेलगू हायस्कूल, नांदेड	५।-
५.	मराठी प्रबोधिनी	कु. अलका रामकृष्ण खेरडे	लक्ष्मीदेवी धीरन कन्या शाळा, नागपूर	५।-

अनु.	परीक्षा	विद्यार्थी	केन्द्र	रक्कम रुपये
६.	मराठी प्रबोध	पद्मनाभन नपेरूमल नायडू	कुर्वेज न्यू मॉडेल हायस्कूल, नागपूर	५।-
७.	मराठी प्रारंभ	बाबुराव पतिराम पडोळे	मराठी भाषा प्रचार केन्द्र, नागराकंटगी	५।-
८.	साहित्य विनीत	कु. साधना मधुसूदन ओक	सेवा सदन हायस्कूल, नागपूर कै. प्रा. ना. कृ. दिवाणजी पारितोषिक	१५।-
महाविद्यालयीन				
९.	भाषा परिचित-१	मोहन माणिक बैतुले	मोहता विज्ञान महाविद्यालय, नागपूर	५।-
	--,,--	विवेक कृष्णदास पाखमोडे	भारतीय भाषाध्ययन मंदिर, नागपूर	५।-
१०.	भाषा परिचित-२	श्री. दिलीप रामकृष्ण पेशवे	मोहता विज्ञान महाविद्यालय, नागपूर	५।-
११.	साहित्य परिचित-१	सुरेश श्रीहरीजी सोनुले	जिल्हा परिषद हायस्कुल, गुंजेवाही	५।-
१२.	साहित्य परिचित-२	साहेबराव सूर्यभानजी होळकर	यशवंत महाविद्यालय, वर्धा	५।-
१३.	साहित्य प्रबोध	कु. छबी गजानन गभने	मराठी भाषा प्रचार केन्द्र, नागराकटंगी	५।-
१४.	साहित्य स्नातक-३	जयन्त गणेश भिलकर	श्री. शिवाजी महाविद्यालय, गडचिरोली	१०।-
१५.	भाषा स्नातक-३	राम सेलोकर	जिल्हा परिषद हायस्कूल, गुंजेवाही	१०।-
१६.	साहित्य पारंगत-२	सौ. उषा हेमंत चाटी	भा. भा. मंदिर डॉ. सिंगणापूरकर सुवर्णपदक.	सुवर्णपदक
१७.	भाषा स्नातक (वाणिज्य)	कु. अंजली कृष्णराव आष्टीकर	जगदंब महाविद्यालय, अचलपूर सिटी	५।-
	केन्द्र पुरस्कार	**प्रथम सत्र**	**द्वितीय सत्र**	
१८.	सर्वाधिक परीक्षार्थी पुरस्कार	आन्ध्र समिती तेलगू हायस्कूल, नांदेड	सिंधी-हिन्दी हायस्कूल, पाटपावली, नागपूर	२५।-
१९.	सर्वाधिक परीक्षा शुल्क पुरस्कार	भारत विद्यालय, तापडिया नगर, अकोला	सिंधी हिन्दी हायस्कुल, पाचपावली, नागपूर	२५।-
२०.	विशेष पुरस्कार साहित्य विनीत	राजू बळीराम सोमकुवर	सुळे हायस्कूल, नागपूर	१०।-

जानेवारी १९७९ परीक्षा फल

(८) शासकीय परीक्षा

मराठी प्राज्ञ : उच्चस्तर

प्रथम श्रेणी

श्री. श्यामसुदर चम्पालालजी गुप्ता— सर्वप्रथम, पारितोषिक रु. २५/- रोख., श्री. किशोरकुमार मगनलाल व्यास, श्री. अब्दुल वहाब शेख, श्री. ओंकार प्रसाद, श्रीमती सरस्वती श्रीधरन नायर.

द्वितीय श्रेणी :

श्री. नरेन्द्रनाथ कालीपद घोराई.

सुविधा :

श्री. अर्काचार विश्वमूर्ती (प्रश्नपत्र-१ ला पुन्हा वसणे)

साहित्य पारंगत : एम् ए. समकक्ष उच्चपदवी परीक्षा :

द्वितीय खंड :

सौ. उषा हेमंत चाटी, प्रथम श्रेणी, सर्वप्रथम, डॉ. सिंगणापूरकर सुवर्ण पदक.

द्वितीय श्रेणी :

श्री. प्रकाश विश्वनाथ जिवने, कु. नलिनी के. झाडे, श्री. राजाराम पन्नालाल जयस्वाल.

तृतीय श्रेणी :

श्री. प्रमोद नारायणराव अंजनकर, मधुकर अंबादास वैतुले, सुधाकर तुकाराम दरेकर, रवींद्र कृष्णराव तायडे, नारायणदास नरसिंगदास लढ्ढा, मोतीराम तानबाजी आगाशे.

सुविधा :

अशोक अंबादास वैतुले (प्रश्नपत्र २ ला पुन्हा वसणे)

मोहम्मद अब्दुल हमीदखां (प्रश्नपत्र १ ला पुन्हा वसणे)

प्रथम खंड

कु. माणिक दत्तोपंत जोशी, कु. विजया बळवंतराव पांडे, विनायक मोरेश्वर देशपांडे, काशीनाथ बळीराम आमले, विजयकुमार नारायणराव इंगळे.

सुविधा

कु. सुंदर खंते (प्रश्नपत्र २ व ४ ला पुन्हा वसणे)

सौ. ज्योती धनंजय शोचे (प्रश्नपत्र २ ला पुन्हा वसणे)

साहित्य स्नातक (बी.ए. समकक्ष) पदवी परीक्षा :

प्रथम श्रेणी :

श्री. जयन्त भिलकर, सर्वप्रथम पुरस्कार रु. १० रोख. कु. अलका रघुनाथराव सराफ.

अनुक्रमणिका

द्वितीय श्रेणी :

गोपाल माणिक वैतुले, परशुराम सखाराम मुळे, कु. सुनीता मनोहर शुक्ल, प्रकाश बापुजी कटकुरवार, काशिनाथ चांगोजी नागोशे, सौ. कमल आनंद केळकर, तुळशीरामजी सोमाजी गेडाम, मधुकर गणपत भरडकर, सौ. अरूणा एस. भाकरे, हुम्मन पुंडलिकराव राऊत, कु. ज्योती सदाशिव काळी, कु. सविता पां. पराते, कु. लता महादेवराव निवर्ती, खेमराज शिवरामजी शेटे, कु. आशा तुकारामजी हेडाऊ, कु. मथुरा ओंकारराव डाहाके, गणेश संपतराव कडू, भगवान चंपाजी मुनघाटे, अशोक नत्थूसिंह पवार, कु. विजया झिंगर बनसोड, कु. नीलिमा ज्ञानदेव मुनघाटे, श्यामराव रतीरामजी पाखमोडे, सौ. सुचिता सुधाकरराव तडसे, कु. प्रमिला भिमराव सकरडे, साहेबराव महादेवराव महल्ले, केवलराम हरीजी सालोटकर.

तृतीय श्रेणी

जगदीश श्रीहरी मस्के, कु. शोभा सदाशिवराव देशमुख, सुनीता गोपाळराव सगदेव, कु. संध्या कृष्णराव देवपुजारी, सोपान फकीराजी बारसागडे, शालीकराम बुधाजी लांजेवार, देवराज उदाजी बिसने, पुरुषोत्तम गणपती निकोडे, कु. ज्योती श्रीपादराव कोठेकर, रूपक एकनाथ जांभूळकर, केशव माणिकराव मोरे, कमलाकर नामदेवराव पवनीकर, गुणवंत अजाबराव खडतकर, किशोर पुरुषोत्तमराव राऊत, कु. हेमलता श्रीहरी गर्गे, कु. संजीवनी मोरेश्वर खुरसवार, विनोद विश्वनाथराव शिंदे, कु. वासंती पोफळी, कु. नीलिमा सबनीस.

साहित्य स्नातक द्वितीय खंड :

कु. वीणा कृष्णराव वैद्य, कु. करूणा रामकृष्णराव दुरगकर, मंगला विनायकराव काटपाताळ, कु. निरूपमा हरिभाऊ रामटेके, कु. संजीवनी गंगाधर घाटोळे, गजानन विष्णूजी बोहरपी, शांताराम शामसुंदर काळबांडे, कु. लता तुळशीरामजी येरणे, परशुराम दसरुजी कुंडे, रामलाल शंकर रहांगडाले, घुलाराम वाळूजी तेलंग, श्रीनिवास दयाराम गेडाम, कांता महादेवराव खोडे, कु. प्रमिला शंकरराव खलोकार, कु. सुरेखा प्रभाकरराव उमाळकर, कृष्णा नत्थूजी डांगे, कु. चंद्रकला दौलतराव उगेमुगे, कु. सुषमा वसंतराव येरखेडे, कु. शोभा परशरामजी रघटाटे, कु. उषा विनायकराव उमक, कु. चारूशीला विठ्ठलराव वाकडे, राजेंद्र अनंतराव तेलंग, अशोक शंकरराव चरडे, देवराव चंद्रभानजी इंगोले, संजय विनायकराव वाठोडकर, कु. सविता लक्ष्मणराव मेहता.

साहित्य स्नातक प्रथम खंड

कु. रं. अ. कुळकर्णी, कु. कल्पना पत्की, दि. तु. हाडोळे, वं. मा. बांगरे, मा. टि. जांगी, व. ह. मलांडे, कु. ज्योती आखाडे, विजया गिरी, उषा ऊमके, अलका देव, आशा बोकडे, छाया शेंडे, शोभा भालेराव, मीना जोशी, सुनीता वडवे, रजनी बोटकावार, नं. पुं. गजपुरे, ओं. पं. निनावे, चं. वि. काळवांधे, ज. मा. ढोमणे, शं. आ. मस्के, रा. शु. उदासी, यो. व. वडवाईक, म. श्री. डोंगे, य. रा. राखुंडे, सु. ना. डहाके, कु. नंदीनी वऱ्हाडपांडे, चित्रा देशपांडे, मीना चन्ने, सुनीता अंजनकर, वंदना चौचकंठीवार, च. मी. चव्हान, र. दि. गिऱ्हे, के. बा. वराडे, हे. व. मुळे, दी. दि. ढोले, कु. सुनीता जोशी, प. का. घोडमारे, भा. ए. मस्के, मा. प. गेडाम, पं. ना. कुंभारे, संगीता अवथनकर, माधुरी किल्लेदार, रजनी पाटील, वसुधा डाफणे, संध्या महाकालीवार, प्र. ना. आगलावे, य. वा. गेडाम, अ. कृ. हनवंते.

भाषा स्नातक प्रथम खंड

अरुण भोयर, कु. माया भिरंगी, कु. निर्मला बोगावत, कल्पना तिवारी, सुदाम दाखणकर, कु. सुरेखा आकुलवार, संजय चौधरी, श्रीधर गोर्लेवार, कु. माया बोरले, सुभाष काळे, कु. माया नगरकर, कु. ज्योती देशकर, कु. अलका बानाबाकोडे, कु. चित्रा वेलमरे, कु. कल्पना कुवडे, किशोर किटकर, सतीश देशपांडे, लक्ष्मण साठवणे, नारायण जळगांवकर, कु. सविता माने, उषा माने, प्रेमदास शेंडे, कृष्ण इंगोले, सतीश जयपूरकर, अभिमन्यू हिवसे, शोभा समरीत, कुसुम माथने, निलांबरी जोशी, पुंडलीक शनीवारे, रामू विजवे, निर्मला तलमले, भूषण दडवे, कु. छोटू गुप्ता, अजय महाजन, निर्मलकुमार शाह, कु. कुंदा पुरोहित, दिलीप तेलमातरे, कु. जयश्री जीवतोडे, रेखा बावनकुळे, शारदा झाडे, दत्तात्रय देशमुख, विजय डोंमडे, कु. कल्पना पांडे, सुरेश अढाऊ, रमेश हटवार, अतुल भुसारी, मोहन वोकरडे, अनंत भोम्बे, आशा खोब्रागडे, संजय वझरकर, पद्मा राऊत, चंद्रकांत उमाठे, विजय सावरकर, विलास फडणवीस, नंदकिशोर धकाते, संजय जोशी, अशोक गोन्नाडे, नारायण व्यवहारे, अनिल पाठक, संजय गोंडे, तानाजी पाठणकर, कु. संध्या जोशी, सुधीर नागोशे, विलास कार्लेकर, कु. भारती रोडे, स्मीता रोकडे, दिलीप गुनरकर, कु. स्नेहलता खडेकर, कु. दर्शना लाखे, कु. साधना देशमुख, संजीवनी मंगरूळकर, शशीकला ढोबळे, मंगला मोरे, शीला कश्यप, सुनीता देशमुख, अल्का फासगे, अंजली भांडारकर, दिलीप मोकदम, ज्ञानेश्वर झाडे, रमेश फुलकर, श्रीधर लाभे, शिरीष पाटील, कु. पद्मिनी बेदरकर, सरोजिनी वेदरकर, कु. छायादेवी चावरे, रेखा भोरे, सुनंदा उभाले, मो. दे. बन्सोले, प्र. म. दुर्ग, संजय पां. खरावे, रा. व. ठुवरीकर, वं. म. हेमके, मुजफ्फर हुसेन, एताजुद्दीन अहमद, मुजफ्फरूल हसनैन, अ. गफूर, डॉ. मो. जुबेर अकरम, कु. ज्योती नथवाणी, संध्या देशमुख, साधना नेटके, जयश्री गोखले, नूरजहांबेगम काझी, सईदा बानो, विजय वाघमोडे.

भाषा स्नातक द्वितीय खंड

कु. सुषमा केळापुरे, शैला दंडाजे, शशीकला मिसाळ, अलका चिटणीस, ज्योती नक्षणे, साधना बेलखेड, गिरिधर भुरले, दीपक कुळमेथे, वीणा वैद्य, इंदिरा गुनानी, हरिचंद्र भेंडारकर, माधुरी पाठक, नंदिनी म्हैसकर, छाया ब्राह्मे, रंजना देशपांडे, अलका लाभसेटवार, नारायण चांदपुरकर, अलका सहारकर, सौ. उषा महांकाळ, मोरेश्वर राऊत, कु. प्रभा येवले, सौ. माला पारधी, सुनीता तेलपांडे, संध्या पाळोरकर, मेघःशाम उगेमुगे, पुष्पमाला रायपुरे, मीनाक्षी जोशी, सौ. मीता बडवाईक, कु. मंजिरी पांढरे, विजया धानोरकर, कु. प्रमिला बुरडे, माधुरी काळे, छाया पावडे, शकुंतला झोरे, चंद्रलेखा ढेंगरे, मंगला शुक्ल, सुधाकर कोवुलवार, वसंत मालापुरे, अरूण दांडेकर, सुरेश वैरागडे, कु. कुंदा जोशी, माणिक देसाई, सुवर्णा पटवर्धन, सविता पराते, प्रतिभा चरडे, ज्योती काळी, मीना खरे, रविकांत चोरघडे, दिनकर सुरकार.

भाषा स्नातक तृतीय खंड

प्रथम श्रेणी

शरद मडघे, राम सेलोकर.

द्वितीय श्रेणी

कुमुद कोराने, सौ. सुलभा फुलाडी, लिला पोकळे, अशोक कुमार काळे, परमेश्वर भिरकड, विवेक उमरे, गणेश अग्रवाल, कु. रेखा अणे, विठा केळापुरे, आशा गायकवाड, मंजुषा समर्थ, मंदा ताकसांडे, भास्कर नरुले, बबन वडेट्टीवार, सूर्यकांत गुंडपवार, पुरुषोत्तम मस्के, दिवाकर म्हशाखेत्री, माया डोंगरे, शेषराव तायडे, सुनंदा गोसेवाडे, लक्ष्मी तिवारी, नलदेव तडोसे, सुधाकर राणे, चरणदास बत्सोड, हिरामण झाडे,

रसुल शेख, मधुकर लाहावर, दिलीप गुनरकर, ववन गिरडकर, श्री. म. वाळके, ना. ड. दांडेकर, शां. म. बावरे, ज्ञानेश्वर खिचडे, अलिमुल्लाखान, महमुद सुहराब, मतीन अहमद खॉं, सौ. हलिमा बानो, सौ. मैनूना सैफी, महंमद कलंदर.

तृतीय श्रेणी

कु. शोभा वंडे, खुषाल पालटकर, गणेश घोडमारे, मदन गाडगे, नरेश सेनाड, पुष्पा फटकाडे, सं. म. रोडे, कु. बानो आजम खां, कु. सफिया फजली, कु. आफरोज आरा.

९. शाखावृत्त

९.१ मूर्तिजापूर— स्व. आमदार प्रतिभा तिडके स्मृतिव्याख्यानमाला १२ ते १६ जाने., १९७९ ला आयोजित करण्यात आली. या व्याख्यानमालेत श्री. वामनराव चोरघडे, प्रा. गंगाधर पानतावणे, प्रा. राम शेवाळकर, डॉ. आशा सावदेकर व श्री. यादव मु. पाठक यांची व्याख्याने झाली. ह्याच वेळी दि. १२ जाने. ला प्रा. वामनराव चोरघडे यांची अ. भा. मराठी साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदी निवडणूक झाल्यावद्दल सत्कार करण्यात आला.

९.२ नवरगाव— दि. २३–९–७८ रोजी वि. सा. संघाच्या शाखेची कार्यकारिणी-सभेची निवड करण्यात आली. अध्यक्ष– प्रा. सौ. उपाताई देशपांडे, उपाध्यक्ष श्री. निनावे, कार्यवाह प्रा. राजीव रा. घाटोळे कोषाध्यक्ष– श्री. वामन निकुरे, सदस्य – श्री. तामशेट्टीवार, श्री. वैरागडे, श्री. भीमराव नीरकर, प्रा. हंवर्डे.

दि. २४–१०–७८ प्रा. ना. सी. फडके यांच्या निधनावद्दल श्रद्धांजली वाहण्यात आली.

९.३ सावनेर— दि. १६–१–७९ वि. सा. संघाच्या शाखेचे पुनरुज्जीवन करण्यात येऊन वि. सा. संघाचे अध्यक्ष डॉ. मधुकर आष्टीकर यांच्या हस्ते नव्याने उद्घाटन करण्यात आले. संघाचे सरचिटणीस गो. स. देहाडराय हेही त्यावेळी हजर होते.

९.४ नागभीड— दि. ८/९–२–७९ ला बावासाहेब ठकार, पुणे, यांची "शिवपुत्र संभाजी राजे" या विषयावर व्याख्याने झाली.

दि. १०–२–७९ गडकरी पुण्यतिथीनिमित्ताने श्री. पंढरीनाथ निनावे आणि शंकरराव मांडवगणे यांनी गडकऱ्यांच्या नाटकातील नाट्यगीते म्हटली व त्यानंतर 'गडकऱ्यांची नाट्यसृष्टी' या विषयावर बावासाहेब ठकार, पुणे, यांचे व्याख्यान झाले.

९.५ भंडारा— दि. १६–१–७९ जिल्हाधिकारी श्री. जी. सी. त्रिपाठी यांचा वि. सा. संघाच्या प्राज्ञ परीक्षेत जिल्ह्यातून पहिला क्रमांक आल्यावद्दल व सौ. त्रिपाठी प्रथम श्रेणीत उत्तीर्ण झाल्यावद्दल जिल्हासत्र न्यायाधीश श्री. पिसोळकर यांचे हस्ते सत्कार करण्यात आला. ह्यानंतर तिळगूळ वाटप होऊन समारंभ संपला.

वि. सा. संघाची सर्वसाधारण सभा होऊन १९७८।७९ साठी कार्यकारिणीची निवड करण्यात आली. अध्यक्ष– श्री. राम अस्वले, उपाध्यक्ष– नि तु. रणदिवे, चिटणीस– श्री. आल्हाद फडके, सरचिटणीस– कु. माधुरी सुतोने, श्री. गोविंद लांजेवार, कोषाध्यक्ष– अरुण नवीन, सदस्य– सर्वश्री शामराव नंदुरकर, संजय गुप्ते, ना. सी. कातोरे, विनोद आकरे, मनोहरराव अग्निहोत्री, शरद हार्डीकर, अरुण गभने, प्रल्हाद पांढारकर आणि सौ. सुधाताई कापरे.

अनुक्रमणिका

९.६ **खामगांव**— खामगाव शाखेचा रौप्य महोत्सव दि. ७ ते १० फेब्रुवारी १९७९ पर्यंत साजरा करण्यांत आला. डॉ. मधुकर आष्टीकर यांच्या अध्यक्षतेखाली प्राचार्य राम डोके ह्यांनी उद्घाटन केले. सरचिटणीस गो. स. देहाडरायही उपस्थित होते. दि. ८ रोजी झालेल्या कविसंमेलनात श्री. शंकर बढे, नारायण कुळकर्णी, वसंत वाहोकर इत्यादी अकोला व बुलढाणा येथील एकंदर १८ कवींनी भाग घेतला होता. दि. ९ ला कथाकथनाचा कार्यक्रम झाला. यामध्ये सौ. वर्षा रेगे, वसंत निगवेकर व बाबा मोहोड यांनी भाग घेतला. दि. १० ला वि. सा. संघाच्या स्थानिक कलाकारांनी "वादळ" या नाटकाचा प्रयोग केला. दिग्दर्शन श्री. पु. म. पारसनीस यांनी केले होते. सर्व कार्यक्रम उत्तम रीतीने पार पडले. ह्यासर्व कार्यक्रमांचे संयोजन कार्यवाह श्री. प्रा. गो. ह. सावजी यांनी केले.

९.७ **वणी**— वि. सा. संघ वणी शाखेचा रौप्य महोत्सव संघाध्यक्ष डॉ. मधुकर आष्टीकर यांच्या अध्यक्षतेखाली साजरा करण्यात आला. याप्रसंगी सरचिटणीस श्री. गो. स. देहाडराय उपस्थित होते. 'नागपूर पत्रिके'चे कार्यकारी संपादक श्री. शांताराम वोकील हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. रात्री ९ वाजता शरच्चंद्र सिन्हा यांच्या अध्यक्षतेखाली कथा कथनाचा कार्यक्रम झाला. यात श्री. बाजीराव पाटील, श्री. नानासाहेब रेटर, व डॉ. व. कृ. न्हाडपांडे ह्यांनी भाग घेतला होता. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी प्राचार्य राम शेवाळकर, कार्याध्यक्ष माधव सरपटवार ह्यांनी खूपच परिश्रम घेतले.

अन्य शाखांचे कार्यक्रम हाती आले नाहीत.


अनुक्रमणिका

अनुक्रमणिका

साभार पोच

क्रमांक	पुस्तकाचे नाव	लेखक	प्रकाशन	पृष्ठे	मुल्य रुपये
१.	स्वप्नात चंद्र ज्यांचा	सौ. गिरिजा कीर	राजेन्द्र पब्लिकेशन्स्, नवी पेठ, पुणे-३०	१४०	८
२.	श्रेयसी	पंडित आवळीकर	नवसाहित्य प्रकाशन, वेळगाव	६४	१०
३.	तराणा	अमृत देशमुख	व्ही. आर. भुसारी, लेबर कॉलनी, नांदेड	८०	५
४.	मराठी संतांचा आध्यात्मिक विचार	डॉ. शं. कि. चतुरकर	पु. कि. चतुरकर, ६४, जीन प्लॉटस्, दर्यापूर, जि. अमरावती	३१२	३०
५.	धुरकट	श्री. सुभाष अवचट	अमेय प्रकाशन, रुईकर मार्ग, महाल, नागपूर	५८	१२
६.	दलितांचे प्रबोधन	गंगाधर पानतावणे	विचार ग्रंथमाला प्रकाशन, औरंगाबाद	१३४	१५
७.	तृप्ती	के. एन्. नांदूरकर	मंगल प्रकाशन, नाशिराबाद, जि. जळगाव	४४	५
८.	नाथ संप्रदाय-एक सांस्कृतिक विचार	प्रा. डॉ. इंदू म. लिमये	अनमोल प्रकाशन, पुणे	१३२	१०
९.	राजू प्रधान	शं. रा. देवळे ल. रा. गोडवोले	विजय प्रकाशन, सीतावर्डी, नागपूर	६२	४
१०.	दैव जाणिले कुणी	डॉ. प्रभाकर मंगरुळकर	—,,—	९४	७
११.	चित्तचोर	गं. श्री. सावळकर	—,,—	११२	९
१२.	मेघ, मोर आणि मथिली	डॉ. द. भि. कुळकर्णी	—,,—	१२८	१२
१३.	वाभुळ फुललं मनी	सौ. सुमन भडभडे	—,,—	१३४	१२
१४.	अस्पर्शी	एकनाथराव बिजवे	—,,—	१७०	१२
१५.	भाविकांचे बंड	मधुकर पाठक	—,,—	१८२	१७
१६.	काव्यशिल्प	कु. साधना ढोके श्री. द. ग. जोशी	काव्यशिल्प मंडळ, ६९५-(व), नवी सदाशिव पेठ, पुणे-३०	४०	३
१७.	काळा सूर्य	सुरेश कदम	सेंट्रल ग. स्टा. क्वार्टर्स, वडाळा, मुंबई-३१	१०	१
१८.	प्रबोधनातील पाऊलखुणा	संपादक निर्मलकुमार फडकुले	कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे	१४८	७
१९.	काजळरात	प्रतिमा पै	सागर साहित्य प्रकाशन, पणजी, गोवा	७२	
२०.	नागेशमाहात्म्य	संपादक पां. ना. कुलकर्णी	व्हीनस प्रकाशन, पुणे	३२+६४	७

युगवाणी (Yugwani) Regd. No. 1174 M. H.



कै. नलिनीबाई जतकर शालेय चित्रकला स्पर्धा, दि. १८–२–१९७९ अध्यक्ष व परीक्षक यांच्यासह सौ. कुसुम डोक्स बाल-चित्रांची पाहणी करीत असताना.



श्री. प्र. वा. मोकाशी व त्यांच्या कुटुंबियांनी ठेविलेल्या महाराष्ट्र बँक ट्रस्ट निधीतून नारदीय कीर्तने. दि. २८–२–१९७९ कु. वसुधा मोडक कीर्तन करीत असताना.

प्रकाशक : गो. स. देहाडराय, सरचिटणीस, विदर्भ साहित्य संघ, झांशी राणी चौक, नागपूर–१२.
मुद्रक : क. मा. सावंत, व्यवस्थापक, नागपूर विद्यापीठ मुद्रणालय, नागपूर.

अनुक्रमणिका